साप्ताहिक
# माणूस

शनिवार । २४ एप्रिल १९७६ । एक रुपया

अलेक्झांडर
सोल्झेनित्सिन
लिखित
फर्स्ट सर्कल
या गाजलेल्या
कादंबरीतील
काही भाग
गेल्या अंकात
दिला होता.
या अंकात
आणखी
काही भाग....

एका हुकूमशहाच्या
अंतरंगाचा
वेध घेऊ पाहणारा....

साप्ताहिक माणूस

वर्ष पंधरावे – अंक : सेहेचाळीसावा (७६)

२४ एप्रिल १९७६

मूल्य : एक रुपया

# त्याला आता ज्ञानाच्या क्षेत्रात आणखी काही महत्त्वपूर्ण भर घालायची होती....

स्टॅलिनच्या हातनं चांगली आणि विधायक कामं बहुधा रात्रीच्या भयाण वेळीच होत. पण दिवसाढवळ्या मात्र त्याचं संशयी मन सारखं धकाकत असे. दिवसाच्या उजेडात तो–

शांतपणे लोकांना लुटत असे,

अंदाजपत्रकात काटछाट करी,

अचानक एकाच वेळी दोन-दोन तीन-तीन खात्यांचं एकत्रीकरण करून टाकत असे.

या उलट रात्रीच्या अंधारात मात्र–

त्याचं वास्तववादी आणि कल्पक मन सरकारी खात्यांची मोड-तोड करून त्यांना नवीन नवीन नावं शोधण्यात मग्न असे.

ह्याच वेळी तो नव्या नव्या खर्चांना मान्यता देई आणि नव्या नेमणुकांवर शिक्कामोर्तब करत असे. त्याच्या सर्वोत्कृष्ट कल्पना मध्यरात्रीपासून पहाटे चारपर्यंतच्या काळातच जन्माला येत. उदाहरणार्थ, राज्य लॉटरी योजनेतल्या बक्षीसविजेत्यांना रोख रकमेऐवजी नव्या प्रकारचे रोखे देऊन कसं काय फसवता येईल,

गैरहजेरीच्या वाढत्या प्रवृत्तीला तुरुंगवासाची शिक्षा कशी देता येईल,

कामाचे तास आणि आठवडेही आणखी कसे वाढवता येतील,

सक्तीचा रोजगार आणि देहान्ताची सजा ह्याविषयींच्या नव्या कायद्यांची मांडणी कशी करता येईल,

साम्यवादी पक्षाची तिसरी आंतरराष्ट्रीय परिषद बोलावणे कसे टाळता येईल,

नोकऱ्या वरचेवर बदलण्याच्या प्रवृत्तीला कसा आळा घालता येईल,

सर्वच लोकांना सायबेरियात कसे काय हद्दपार करता येईल.

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
□
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
□
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
□
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
□
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
□
दूरध्वनी : ४३४५९
□



देशाच्या सर्वंच लोकसंख्येला सायबेरियात हद्दपार करण्याची कल्पना हीच मुळात एक मूलभूत सुधारणा होती ! त्याला एक धाडसी प्रयोगच म्हणायला हरकत नाही ! शिवाय त्याला दुसरा पर्यायही शोधून सापडला नसता. राष्ट्रीय अल्पसंख्याकांच्या समस्येच्या बाबतीत तर तो पक्षातला एक नाणावलेला तज्ज्ञच समजला जातो आणि ही गोष्ट तशी नाकारण्याचीही कुणाची हिंमत नव्हती !

तशा त्याच्या खाती इतर अनेक लक्षणीय सुधारणा कधीच जमा झाल्या होत्या. तथापि राष्ट्राच्या ह्या प्रचंड उभारणीत त्याला एक नवाच कमकुवत दुवा सापडला होता. ह्या साऱ्याला अनुलक्षून एक नवाच कायदा आता त्याच्या मनात आकार घेत होता. सर्व हालचाली त्यानं थांबवल्या होत्या. जीवनातल्या सर्वंच भरत्या आणि ओहोटचा त्यानं थांबवल्या होत्या. वीस कोटी लोकसंख्येतल्या प्रत्येकाला त्यानं आपल्या स्थानाची जाणीव करून दिली होती. फक्त–फक्त खेडी सोडून शहरांकडे धावणारी तरुण पिढी–तेवढीच काय ती याला अपवाद होती !

सामुदायिक शेतांवरची परिस्थिती साधारणपणे खूपच चांगली होती. याला पुरावाच द्यायचा असेल तर तो म्हणजे, 'कुबानकोझॅकस' हा चित्रपट आणि बॅबयेव्हस्कीची कादंबरी 'दि नाईट ऑफ दि गोल्डन स्टार' चित्रपट निर्माते आणि कादंबरीकार यांना प्रत्यक्ष सामुदायिक शेतावरच नेण्यात आलं होतं. तिथे पाहिलेल्या गोष्टीच ते आपल्या कलाकृतीतून दाखवत होते आणि सर्वत्र आबादीआबाद असल्याचंच त्यांनी दाखविलं होतं ! स्टॅलिननं तर स्वतःच निरनिराळ्या मेळाव्यांना हजर राहणाऱ्या तिथल्या शेतकऱ्यांशी वेळोवेळी बातचीत केलीच होती.

एखाद्या मुरब्बी मुत्सद्द्यासारखाच स्टॅलिन आत्मसंतुष्ट असा कधी नव्हताच. पुस्तकं किंवा चित्रपटांनी लोकांच्या मनावर ठसलेल्य मतांपलीकडे जाऊन आणखी भेदक भूमिका घ्यायला तो स्वतःच भाग पाडत असे. पक्षाचा एक प्रांतसचिव एकदा चुकून बोलून गेला (स्टॅलिनची ही आठवण जर अचूक असेल तर, त्याला नंतर गोळ्या घालण्यात आल्या !) की, सामुदायिक शेतांवर अडचण एवढीच होती की, तिथले वृद्ध लोक, जे तीस सालातच भरती केले गेले, मनापासून काम करत. पण तिथले तरुण (अर्थात जे मोजकेच बेजबाबदार लोक होते !) मात्र आपलं शालेय शिक्षण संपलं की, ह्या ना त्या मार्गाने ओळखपत्रे मिळवून शहरांची वाट धरत. जेव्हा हे सारं स्टॅलिनच्या कानांवर आलं तेव्हा त्यानं त्यावर सखोल चिंतन सुरू केलं.

सामुदायिक शेतांवरच्या सगळ्याच तरुणांना प्रथम माध्यमिक शिक्षण द्यायचं आणि मग त्या आचाऱ्याच्या पोरांना महाविद्यालयीन शिक्षणासाठी पाठवायचं, हा खरं तर एक मूर्खपणाच होता ! तसं पाहिलं तर, ह्या साऱ्या चुकांची जबाबदारी लेनिनवरच आहे ! अगदी असं आत्ताच जाहीरपणे म्हणणं थोडं उतावीळपणाचं असलं तरी ! लेनिनच म्हणाला होता, 'कुठल्या आचाऱ्यालादेखील राज्य चालवता आलं पाहिजे !' लेनिनला मनातनं म्हणायचं तरी काय होतं ? म्हणजे त्यांनी प्रत्येक आठवड्याला एक सुटी घेऊन स्थानिक सोविएटमध्ये काम करावं ? लेनिनची हीच का इच्छा होती ? खरं तर, आचारी तो आचारीच ! आणि त्याचं काम म्हणजे जेवण करणे एवढंच ! याउलट लोकांना मार्गदर्शन करणे म्हणजे केवढं कौशल्याचं काम आहे ! फार तर ते आधी निवडून मग खास प्रशिक्षण दिलेल्या, शिवाय वर्षानुवर्षे अनुभव घेऊन मुरलेल्या लोकांनाच फार तर करता येईल. आणि त्याचबरोबर ह्या साऱ्या लोकांच्या नियंत्रणाची जबाब-

दारी खरं तर एकाच माणसाच्या हाती सोपवायला हवी–आणि असा योग्य माणूस म्हणजेच व्यवहारकुशल 'नेता' हाच होय !

सामुदायिक शेतीसंबंधीच्या कायद्यात आणखी एका कायद्याची भर घालायला हवी. तो असा असेल की, ज्याअर्थी ही सारी जमीन अनंत काळपर्यंत सामुदायिक मालकीचीच राहणार आहे म्हणूनच तिथे जन्माला येणारा प्रत्येकजणच, जन्मतःच सामुदायिक शेती संघाचाच सदस्य बनेल ! हा कायदा अशाच भाषेत मांडला पाहिजे की, एकीकडे तो खास हक्क वाटेल, तर दुसरीकडे एखाद्याला या कायद्यातून वगळण्याचा अधिकार फक्त स्थानिक सोविएटकडेच ठेवला पाहिजे. आताच्या आता एक प्रचार मोहीम हाती घेतली पाहिजे आणि मग वृत्तपत्रात लेखसुद्धा प्रसिद्ध झाले पाहिजेत. वृत्तपत्रांतली शीर्षकंसुद्धा अशीच असावीत–

'तरुणांकडेच सामुदायिक शेतीची मालकी'

'ग्रामीण जीवनाच्या आधुनिकीकरणासाठी उचललेलं आणखी एक दमदार पाऊल !'

पण ह्या साऱ्या लेखांची भाषा कशी खुलवायची हे तर सोविएट पत्रकारांना सांगायला नकोच !

स्टॅलिनला आठवल्यासारखं वाटलं की, एका उजव्या विरोधकानं ह्या समस्येबद्दल आधीच इशारा देऊन ठेवला होता ! (खरं तर 'उजवे विरोधक' असली काही गोष्टच तिथे अस्तित्वात नव्हती. पण ह्या कल्पनेद्वारा स्टॅलिनला मात्र आपल्या साऱ्याच शत्रूंना एकाच घावात लोळवणं सोपं जाई !) आजवर त्यानं ज्यांना ज्यांना म्हणून ठार मारलं तेच नंतरच्या काळात कोणत्या ना कोणत्या बाबतीत खरे ठरत गेले. आणि नेहमी असंच तरी का घडावं ? इतकंच काय खुद्द स्टॅलिनदेखील त्यांच्या कल्पनांनी विचलित होत असे आणि मग त्याचे दक्ष कान थडग्यांमधून त्यांचं काही बोलणं ऐकू येईल म्हणून वेध घेत राहात.

हा नवीन कायदा ही अगदी तातडीची बाब होती. तसे इतर अनेक महत्त्वपूर्ण कायदे त्याच्या मनात आकार घेत होतेच. पण आता जेव्हा तो त्याच्या अभ्यासिकेत शिरला, तेव्हा त्याहून महत्त्वाच्या गोष्टींमध्ये लक्ष घालण्याची स्टॅलिनला निकड वाटू लागली.

आता तर त्यानं वयाची सत्तरीही ओलांडली होती. आता काही कामं लांबणीवर टाकणं ही एक घोडचूकच ठरली असती. त्याच्या चिरंजीवीत्वाची केव्हाच ग्वाही देण्यात आली होती. त्याला मात्र नेहमी असंच वाटे की, लोक जरी त्याला शहाण्यांतला शहाणा असं म्हणत असले तरी, त्याच्या कर्तृत्वाचं योग्य ते मूल्यमापन करायला ते तयार नव्हते. त्याला असंही वाटत असे की, लोकांचा उत्साह हा केवळ वरवरचाच आहे, शिवाय ते त्याच्या अलौकिक बुद्धिमत्तेचं कौतुकही करीत नसत. अलीकडे अलीकडे त्याला फक्त एकाच कल्पनेनं झपाटलं होतं. त्याला आता ज्ञानाच्या क्षेत्रात आणखी काही महत्त्वपूर्ण भर घालायची होती. इतिहास आणि तत्त्वज्ञान सोडलं तर, आणखी कुठल्यातरी एका विषयावर स्टॅलिनला आपल्या नावाचा एक कायमचा ठसा उमटवायचा होता. बायॉलॉजीत काम करणं त्याला सोपं गेलं असतं ! पण हा विषय त्यानं लायसेन्कोवर सोपवला होता. हं. तोच तो प्रामाणिक आणि धाडसी लोकप्रतिनिधी ! कदाचित त्याला गणिताचं किंवा पदार्थ–विज्ञानशास्त्राचं अधिक आकर्षण वाटलं असतं. कारण जेव्हा त्यानं 'निसर्गाचं तर्कशास्त्र' ह्या पुस्तकातले दोनच उतारे वाचून पाहिले, तेव्हा त्याला त्या लेखकाचा मनस्वी मत्सरच वाटू लागला ! तरीही किसेल्योव्हचं बीजगणित आणि सोकोलोव्हचं 'आधुनिक पदार्थ-विज्ञानशास्त्र' ही दोन्हीही पुस्तकं पुष्कळ वेळ खर्च करून वाचल्यानंतरही स्टॅलिनला ह्या दोन्ही विषयांत प्रेरणादायक असं काही आढळलंच नाही.

पण अलीकडेच, टिफलीस युनिव्हर्सिटीतल्या प्रोफेसर चिकोबावांच्या प्रकरणानं मात्र त्याच्या कल्पनाशक्तीला एक नवीनच चालना दिली. तरीही तो भाषाशास्त्रासारखा अगदी वेगळा प्रांत होता. प्रोफेसर चिकोबावा प्रथमदर्शनीच मार्क्सविरोधी वाटणारं असं एक थोतांड मांडायला पुढे सरसावले होते. त्यांच्या प्रतिपादनाप्रमाणे भाषा ही संस्कृती व समाजरचनेचाच केवळ एक भाग नाही, तर त्याहून अधिक काही आहे. भाषा ही जशी बूर्झ्वा नसते, तशीच ती नुसती श्रमजीवींचीही नसते. भाषेचं व्यक्तिमत्त्व हे राष्ट्रीयच असतं. चिकोबावानं दुसऱ्या कोणालाही सोडून मार्रशीच या विषयांत उघड उघड वाद मांडण्याचं धाडस केलं. आता मार्र आणि चिकोबावा हे दोघेही जॉर्जिअनच. म्हणूनच मग टिफलिस युनिव्हर्सिटीच्या 'जर्नल' मधून ह्या हल्ल्याला उत्तर देण्यात आलं आणि त्याच जर्नलची एक साधीच मळकटलेली, पण जॉर्जिअन अक्षरात छापलेली एक प्रत आता स्टॅलिनच्याच टेबलावर पडून होती. मार्रच्या काही अनुयायांनी त्या मगरूर चिकोबावाला आधीच उत्तर देऊन ठेवलं होतं पण भल्या पहाटे दार ठोठवून झोपमोड करणाऱ्याशी ज्या भाषेत बोलावं तशीच त्या उत्तराची भाषा होती ! चिकोबावा हा अमेरिकन भांडवलदारांचा हस्तक आहे हे कधीच सूचीत झालं होतं.

त्या वेळी जर स्टॅलिननं स्वतःच फोन उचलला नसता आणि त्याच्या वाटेला न जाण्याची आज्ञा जर दिली नसती ना, तर चिकोबावाला तेव्हा परमेश्वरसुद्धा वाचवू शकला नसता. स्टॅलिननं केवळ चिकोबाबाचा जीवच वाचवला नव्हता. त्यानं त्यापुढे जाऊन असाही निर्णय घेतला होता की, चिकोबावाच्या ह्या साध्यासुध्या मतांमध्ये सुधारणा करून त्यातून स्वतःचा एक विचारप्रवर्तक आणि तेजस्वी प्रबंध मांडायचा.

आता यामुळे वेव्ह मेकॅनिक्स किंवा रिलेटिव्हिटीसारख्या प्रतिक्रांतीवादी विचारसरणींचं खंडन होणार होतं आणि स्टॅलिनलाही त्याद्वारे समाजालाच एक जोरदार धक्का देणं शक्य होणार होतं. पण तो राज्यकारभाराच्या ह्या जंजाळातच इतका म्हणून गुंतला होता ! तिथे त्याला असल्या गोष्टीत लक्ष द्यायला वेळ तरी कुठे होता ? तसं भाषाशास्त्र हे तरी काय, दुसरं व्याकरणच की ! आणि मुळात स्टॅलिनला व्याकरण हे गणिताइतकंच अवघड वाटत असे.

स्टॅलिन लिहायला बसला. मनात एवढाच विचार घोळत होता की, हे लिखाण चांगलं दमदार आणि चेतनामय व्हायला हवं.

'सोविएट युनिअनमधली कोठलीही भाषा जरी विचारात घेतली–

रशिअन, युक्रेनिअन, बायलो-रशिअन, उझबेक, कझाक, जॉर्जिअन, आर्मेनिअन, इस्तोनिअन, लॅटीव्हीअन, लिथुआनिअन, मोल्दाविअन, तार्तर, बश्कीर, तुर्कमन,

–(मरू देत ! असल्या लांबलचक यादीपासन आपली सुटका करून घेणं त्याला नेहमीच कठीण होत असे. पण तसा विचार केला तर,

एवढ्या सगळ्या नावांना काय हरकत होती? एक तर त्यानं वाचकही प्रभावीत होतात आणि मग त्यांना त्याला उत्तर देणंही चांगलंच अवघडही होऊन बसतं!)–कोठलीही भाषा विचारात घेतली–तर हे उघडच आहे–हूं! इथे. इथेच असं काही, काही तरी लिहावं जे अगदी उघड आहे. स्पष्ट आहे.

पण स्पष्ट तरी काय आहे म्हणा? काहीसुद्धा स्पष्ट नाही. सगळंच अवघड होऊन राहिलंय!

आता मार्क्सच्या म्हणण्याप्रमाणेच अर्थशास्त्रीय घडामोडी हाच समाजरचनेचा पाया आहे आणि बाकीच्या सर्व गोष्टी त्यावरच्या उभारणीसारख्या आहेत. पण यापलीकडे दुसरी शक्यताही नाही. एवढ्या वर्षांच्या अनुभवानंतर एक गोष्ट मात्र स्टॅलिनला कळून चुकलीय की, यामध्ये आणखी काही मधला मार्ग असल्या-शिवाय तुम्हाला फारसं साध्यच करता येत नाही. समजा वीससालीच तो एखाद्या पक्ष बैठकीत म्हणाला असता, 'जो आपल्याबरोबर नाही तो आपल्याविरुद्धच असेल असं नाही' तर, तर त्याला त्यांनी व्यासपीठावरून खाली खेचलं असतं आणि लाथा घालून पक्षाबाहेरही काढण्यात आलं असतं. छान हेच त्यांचं तत्त्वज्ञान! आणि हीच त्यांनी विरोध आणि संघर्षातनं साधलेली प्रगती!

आता हेच तत्त्व इथंही लागू पडतं. प्रोफेसर चिकोबावाचा तो लेख वाचताना एक नवाच विचार स्टॅलिनच्या मनात उद्‌भवला. आता भाषा ही समाजाच्या वरच्या उभारणीचाच एक भाग असेल तर मग, समाजसुधारणेच्या प्रत्येक टप्प्याबरोबर ती बदलत का नाही? आणि जर ती, समाजरचनेचा भाग नसेल तर ती काय आहे?

का ती पायाभूत घटकासारखी असते? की ती उत्पादनाचीच एक पद्धत असते? पण उत्पादनाची पद्धत ही उत्पादक शक्ती आणि त्यांतले परस्परसंबंध या घटकांनीच बनलेली असते. आता भाषेला एक परस्परसंबंध म्हणणंही जरा कठीणच. तुम्ही म्हणाल तसं? मग ती काय एक उत्पादक शक्ती आहे? पण उत्पादक शक्तीमध्ये नेहमीच उत्पादनाची साधनं, उत्पादनाचे मार्ग आणि लोक यांचाच केवळ समावेश होतो. आणि लोक जरी भाषा बोलत असले तरी, याउलट भाषा म्हणजेच लोक असंही नव्हे. मरूं देत ते सारे!

'एखादं लेथ किंवा रेल्वे किंवा पोस्ट ऑफीस यांच्यासारखंच भाषा हे उत्पादनाचं एक साधन आहे.' निदान स्टॅलिनला तरी असंच म्हणायला आवडलं असतं. शेवटी भाषा तरी काय परस्पर-संबंध साधण्याचा एक मार्गच की. पण आता त्यानं असा दावा केला की, भाषा ही उत्पादनाच्या साधनासारखी आहे, तर लोक त्याला हसले असते. (अर्थातच. ह्या देशातले तर नाहीच म्हणा!) स्टॅलिनला सल्ला देणारंही कुणीच नव्हतं म्हणा! इतर सर्वच थोर थोर तत्त्वज्ञांप्रमाणेच तोही या जगात एकाकीच होता! काण्ट किंवा स्पिनोझा जरी हयात असते ना! किंवा त्यांच्याच योग्यतेचे कोणी! जरी ते बूर्झ्वा असते तरी चाललं असतं!–बेरियाला फोन करून पाहावा काय? पण छे! बेरियाला तर तत्त्वज्ञानातलं काहीच कळत नाही!

त्यानं अगदी काळजीपूर्वक जर वाक्यरचना केली–म्हणजे अशी की–तत्त्व म्हणून जरी भाषा ही समाजाच्या उभारणीहून वेगळी असली तरी ती उत्पादनाच्या साधनांपेक्षा वेगळी नसते. (जशी यंत्रं ही वर्गसंघर्षाच्या परिभाषेत, भाषेइतकीच तटस्थ असतात!)

त्यानं वाक्याला पूर्णविराम दिला. हात मागे मोडून एक प्रदीर्घ जांभईपण दिली. मग तो जरा सावरून बसला. त्यानं फक्त एकच वाक्य लिहिलं होतं आणि आता तो कंटाळला होता.

स्टॅलिन उठला. आपल्या अभ्यासिकेतच त्यानं एक फेरफटका घातला रात्री काम करण्यासाठी हीच जागा तो पसंत करत असे. तिथल्या एका लहानशा खिडकीपाशी तो गेला. खिडकीला पिवळसर रंगाच्या बुलेट-प्रूफ कांचा दुहेरी बसवल्या होत्या. खिडकीबाहेर सभोवार भितीनं वेढलेली एक बाग होती. माळ्यालासुद्धा फक्त सकाळीच आणि तेही संरक्षकांच्या कडेकोट पाहाऱ्यात बागेत प्रवेश मिळत असे. बाकी बहुतेक वेळ ती बाग निर्मनुष्यच असे. आता मात्र ती बाग धुक्यानं वेढली होती. सारं जग आणि विश्वच त्या धुक्यानं झाकून टाकलं होतं. त्याच्या कल्पनेचं अर्धविश्व त्याच्या जवळ अगदी मनातच होतं. आणि हे अर्धविश्व त्याच्या दृष्टीनं अगदी व्यवस्थित आणि आटोक्यातलंही होतं. पण ज्याला खरोखरीच वास्तववादी म्हणण्यात येतं ते अर्धविश्व तिथेच त्या धुक्याआड दडून बसलं होतं. त्याच्या त्या पोलादी भिंतीच्या संरक्षित अभ्यासिकेत असल्यावर स्टॅलिनला त्या वास्तव्यातल्या विश्वाची मुळीच भीती वाटत नसे. त्याला असाच विश्वास वाटे की, त्या अर्ध्याविश्वाला आपल्या मनाप्रमाणे वाकवण्याचं आणि पिळवटून टाकण्याचं सामर्थ्य त्याच्या स्वतःच्यात आहे! पण त्यालासुद्धा त्या वास्तव जगात पाऊल टाकण्याचं धाडस कधी कधी करावंच लागे! उदाहरणार्थ जेव्हा तो हॉल ऑफ कॉलम्समध्ये मेजवानीसाठी जात असे, तेव्हा प्रथमतः त्याला आपली मोटार आणि तिथला दरवाजा यामधली दोन फुटांची भयानक पोकळी पार करावी लागे. नंतर भव्य व्हरां-ड्यातून लाचार लोकांच्या प्रचंड जमावामधून आत चालत जावं लागे. अशा वेळी त्याला भयंकर दुर्बल आणि असुरक्षित वाटत राही. तेव्हा मग आपल्या हातांचा, आपल्या संरक्षणासाठी कसा उपयोग करून घेता येईल, हेच त्याला ठरवता येत नसे. खरंतर आपल्या मनगटांच्या बळावर स्वतःचंच संरक्षण करायला तो कधीच असमर्थ ठरला होता! म्हणून एकदा त्यानं आपल्या हातांची घडी घातली होती आणि हसला होता. तेव्हा जमावातील प्रत्येकालाच वाटलं की, सर्वश्रेष्ठ माणूस आपल्याकडे पाहूनच साहानुभूतीपूर्वकच हसतोय! पण खरं तर, ते हास्य त्याच्या मनाच्या गोंधळाचं प्रतीक होतं.

एकदा तो स्वतःच म्हणाला होता की, वस्तूच्या अस्तित्वासाठी पोकळी ही एक मूलभूत गरज असते आणि जगातल्या एक शष्ठांश कोरड्या भूमीचा स्वतः स्वामी बनल्यावर आता मात्र तो पोक-ळीला–अवकाशालाच, घाबरत होता. आपली अभ्यासिका त्याला फार आवडायची. कारण तिथे मोकळी जागा, अशी नव्हतीच!

पुन्हा एकदा दारावर हलकेच खुडबूड झाली. त्यानं दार उघडण्या-साठी बटण दाबलं. दार उघडलं. तो पॉस्क्रिओबिशेव होता. त्याचा आविर्भाव नुकतीच शिक्षा भोगून परतलेल्या, गांवढळाचा होता. तो हलक्या आवाजात म्हणाला,

'अबाकुमोव्हला मी घरी परत पाठवू काय? की तो थोडा थांबून राहिलेलाच तुम्हाला आवडेल?' हं बरोबर. अबाकुमोव्ह. स्टॅलिन आपल्याच लेखनात इतका गर्क झाला होता की, तो अबाकुमोव्हलाही पुरता विसरला होता. त्यानं जांभई दिली. त्याच्या मनात पडलेली प्रतिभेची ठिणगी आता विझली होती. आणि ते शेवटचं वाक्यसुद्धा तितकंसं जमलं नव्हतं. 'ठीक आहे. त्याला आत पाठव.' तो दुस-ऱ्याच एका मद्यपात्राजवळ गेला. त्याच्या लोखंडी झाकणाचं कुलूप त्यानं आपल्या पट्ट्यात अडकवलेल्या किल्लीनं उघडलं. मग त्यातलं एक ग्लासभर पेय तो प्याला. तो कधीच झोपू शकत नसे! ☐

# सोलकढी

## याला क्रिकेट म्हणतात

गेल्या काही वर्षांत कसोटी क्रिकेटमध्ये भारताला अधूनमधून विजय मिळू लागले आहेत. त्यामुळे आपण अधूनमधून फुश्शारून गेलो तर ते योग्य, उचित आणि स्वाभाविक म्हटले पाहिजे. पण आपले काही चॅपेलबंधूंच्या ऑस्ट्रेलियासारखे भलेशाबास नाही; आपल्याला हात्तुझी पराजयसुद्धा पुष्कळ मिळतात. मग स्वतःला खेळामधली हारजीत महत्त्वाची वाटत नाही. खरा महत्त्वाचा असतो खेळ. तो खेळासारखाच खेळायला हवा; महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकांसारखा नव्हे.

वेस्ट इंडीज आणि भारत यांच्यामधला, पोर्ट ऑफ स्पेनला झालेला तिसरा कसोटी क्रिकेट सामना बिलकुल खेळासारखा खेळला गेला. पहिल्या सामन्यात भारताचे धिरडे निघाले. दुसरा अनिर्णीत. दोन्ही सामन्यांतले पंच कसे म्हणे निमूट वेस्ट इंडीजला अनुकूल. त्याबरोबरच, आमची भुसभुशीत फलंदाजी, तीच तीच ती गोलंदाजी, टिचकुले क्षेत्ररक्षण, आणि वेस्ट इंडियाचे एकूण अबबब, या किरकोळ गोष्टीही होत्या. म्हणून हा तिसरा सामना सुरू होताना, दुबळ्यांना प्रोत्साहित करणाऱ्या दिलदार रसिकतेने भारताला विशेष हार्दिक शुभेच्छा दिल्या होत्या.

पहिल्या डावात वेस्ट इंडीजला एकशे एकतीस धावांची बख्खळ आघाडी मिळाली. दुसऱ्या डावात सहा गडी बाद दोनशे एकाहत्तर धावा झाल्यावर कर्णधार लॉईडने डाव घोषित केला, आणि भारताला विजयासाठी चारशे तीन धावा करायचे उमदे आव्हान दिले. आता उभयसंघांना वेळ हवा तेवढा होता. विजयाची आशा गोलंदाज–फलंदाजांना सारखीच वाटावी अशी नामी परिस्थिती या पोचट सामन्यात अकस्मात निर्माण झाली... आजवरच्या इतिहासात फक्त एकदाच सामन्याच्या चौथ्या डावात चारशेवर धावा काढून सामना जिंकला गेला होता. तेव्हा इतिहास लॉईडच्या पाठीशी खंबीर उभा होता. भारताच्या पाठीशी एकाहत्तर सालची विजयी मालिका होती.

तरीसुद्धा विजयासाठी बाजी लावण्याऐवजी सामना अनिर्णीत ठेवायची खबरदारी घेण्याची धडपडच भारतीय संघ करील, असा बहुतेकांचा अंदाज होता. तो साफच विस्कटला. गावसकर, मोहिंदर अमरनाथ, विश्वनाथ, पटेल या फलंदाजांनी वेळ आणि हिंमत राखून सामना जिंकला. खेळपट्टी निर्जीव होती. लॉईडचे गोलंदाज ठिसूळ ठरले. क्षेत्ररक्षक सैरावैरा झाले. असे दिसते की, सामना जिंकायचा विचार केल्यामुळे भारताने सामना जिंकला. याला क्रिकेट म्हणतात.

याला आणि लॉईडने जे केले त्याला. त्याबद्दल लॉईडला आता खवटखिजवट शिव्या मिळतील. (मागे गारफिल्ड सोबर्सने अशाच शिव्या मिळवल्या होत्या. आमच्या वाडेकर–पतौडींनी चुकूनसुद्धा कधी अशा शिव्या मिळवल्या नाहीत हो! मोठेच खेळाडू ते.) पण काही वेळा अशा असतात की, तेव्हा विजयासाठी पराजयाचा धोका पत्करावाच लागतो. लॉईडने आणि भारतानेही तो पत्करला. अशा शुभवेळी जिंकणाऱ्याच्या बरोबरीने हरणाऱ्याचाही जयजयकार करण्याचे भाग्य तुमच्या–माझ्यासारख्या रसिकांना लाभते. □

## □ लाव्हारसाने लिहिणारे पत्रकार

उमर खय्यामच्या जीवनात कवितेच्या वहीला, विनोबा भावे यांच्या जीवनात श्रीमद्भगवद्गीतेला, गोपाल नीलकंठ दांडेकरांच्या जीवनात ज्ञानेश्वरीला, गोविंदराव तळवलकरांच्या जीवनात लोकमान्य टिळकांच्या लेखसंग्रहांना जे स्थान आहे ना, तेच अनंतरावांच्या जीवनात रोजच्या वर्तमानपत्रांना आहे. मी रोजच्या रोज वर्तमानपत्र वाचतो. कार्यबाहुल्यामुळे काही दिवशी वर्तमानपत्रे वाचता आली नाहीत तर, मी ती काळजीपूर्वक साठवून ठेवतो आणि सवडीने, पण वाचतो. काही किचुंद्री इसमांना वर्तमानपत्रे (आणि भजी) ताजीच लागतात. अस्सल वर्तमानपत्रवाचक आणि भजीभक्षक असे कधीच म्हणणार नाही. असो. वर्तमानपत्रांनी माझ्या जीवनाला दिशा दिली आहे. वर्तमानपत्रांनी मला घडवला आहे. आज जो काही मी आहे त्याचे श्रेय, वाचकहो, मातेला नाही, जन्मगावाला नाही, शिक्षकांना नाही, निसर्गाला नाही, परिस्थितीला नाही, पुढाऱ्यांना नाही, वाचलेल्या आणि न वाचलेल्या प्रभावित करणाऱ्या पुस्तकांना नाही, खुद्द स्वतःला नाही–पत्नीलासुद्धा नाही; ते वर्तमानपत्रांनाच आहे.

'वर्तमानपत्र' असा मोघम शब्द मी आत्तापर्यंत योजत होतो. त्यामुळे एखाद्या भाबडभोपळ्या वाचकाला वाटायचे, मी म्हणजे कोणी 'टाईम्स ऑफ इंडिया' वाचणारा 'थँक्यू मिस्टर ग्लाड' आहे की काय? तर त्या वाचकासाठी सांगतो, मी तसा नाही. लहानपणी इंग्रजी सुधारण्यासाठी (शेजारून आणलेल्या 'टाईम्स ऑफ इंडिया' मधले अग्रलेख मी वाचले आहेत. 'शेजारून आणलेल्या' असे मुद्दाम सांगायचे कारण इतकेच की आमच्या घरी 'तो' येत नसे. वडलांचे इंग्रजी जाम स्ट्राँग होते. ते अग्रलेख वाचून माझे इंग्रजी मुळीच सुधारले नाही (माझ्या बरोबरच्या सगळ्यांचे सुधारले, असे म्हणतात.); त्यामुळे आजसुद्धा 'टाईम्स ऑफ इंडिया' मी वाचू शकत नाही. (विकत मात्र घेतो : किंमत ४० पैसे.) मी वर्तमानपत्रे वाचतो म्हणजे आपली मराठी; आणि आज जो काही मी आहे त्याचे श्रेय या मराठी वर्तमानपत्रांना आहे.

मळकट छापलेल्या मराठी वर्तमानपत्रांच्या मागे महाराष्ट्राची तेजस्वी पत्रकारिता उभी असते. आजच्या मराठी पत्रकारांनी, परंपराप्राप्त तेजस्वितेत, स्वकर्तृत्वाने इतकी भर घातली आहे की त्या तेजा(बा)त ते स्वतःच जळून जातील की काय, अशी भीती मला वाटते. अहो, आजच्या आमच्या मराठी पत्रकारांत, टिळक–आगरकरांचा झुंजारपणा, लोकहितवादी–विष्णुशास्त्रींचा स्वमताबद्दलचा जाग्रहीपणा, केळकर–खाडिलकरांचा बहुश्रुतपणा, परांजपे–कोल्हटकर–अत्रे यांचा शैलीदारपणा, माडखोलकर–परुळेकरांचा चिवटपणा हे सगळे 'पण' एकवटलेले दिसतील. त्यामुळे जगातल्या कुठल्याही देशीच्या पत्रकारांशी तुलना करू जाता मराठी पत्रकार उजवे ठरतील. कारण त्या पत्रकारांनी कितीही गमजा केल्या तरी ते शाईने लिहितात; आमचे पत्रकार लाव्हारसाने लिहितात. शिवाय लेखणीमध्ये तलवार, भाला, घण, तिरकमठा, वाघनखे, तोफ असली संहारक अस्त्रे लपवायची सवय मराठी पत्रकारांनी स्वतःला लावून घेतलेली आहे.

मराठी पत्रकारांपैकी मुंबईकर पत्रकारांनी लोणावळे या निसर्ग–रमणीय ठिकाणी कै. दि. गो. तेंडुलकर स्मृतिमंदिर उभारले आहे. हे दि. गो. ऊर्फ डी. जी. तेंडुलकर कोण हे समजून घेण्यासाठी वाचकांना एक तर त्यांनी लिहिलेले महात्मा गांधींचे चरित्र वाचावे लागेल, किंवा डॉम मोरा एस यांचे 'फादर ऑफ माय सन' हे आत्मचरित्र वाचावे लागेल, किंवा रवींद्र पिंगे यांच्या पारितोषिक–विजेत्या 'शतपावली'तले डी. जीं. चे व्यक्तिचित्र पाहावे लागेल. या स्मृतिमंदिरात एक सभागृह आहे. एक वाचनालय आहे, पत्रकारांना चारदोन दिवस विसावण्यासाठी काही आरामखोल्या आहेत. अशा या स्मृतिमंदिराचे उद्घाटन एखाद्या ज्येष्ठ पत्रकाराकडून होणार आहे, असे जेव्हा माझ्या कानांवर आले तेव्हाच ते अत्यंत अयोग्य, अनुचित आणि अस्वाभाविक होईल, अशी माझी प्रतिक्रिया झाली. सुदैवाने माझ्या पत्रकारबंधूंचीही प्रतिक्रिया यथाकाल माझ्या-

प्रमाणेच झाली. अखेर माननीय परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते स्मृतिमंदिराचे उद्घाटन झाले. यशवंतराव अर्थात परराष्ट्रमंत्री किंवा सरकारचे प्रतिनिधी म्हणून आलेच नाहीत; पत्रकारांचे जिव्हाळ्याचे स्नेही म्हणून ते आले. कराड्च्या साहित्यसंमेलनातल्या शारदेच्या दरबारातसुद्धा ते सरकारी बिरुदावली बाहेर ठेवून आले होते, हे वाचकांना स्मरत असेल.

या निमित्ताने यशवंतरावांनी एक फार्फार मोलाची गोष्ट सांगितली. ते म्हणाले, 'लोकमत बनवण्याची जबरदस्त शक्ती पत्रकारांजवळ आहे ! पत्रकारांचे शब्द हे एक जबरदस्त सामर्थ्य आहे ! अण्वस्त्रातसुद्धा ते सामर्थ्य नसेल ! सध्याच्या परिस्थितीतही पत्रकारांचे सामर्थ्य नष्ट झालेले नाही ! ...' आमचे पत्रकारबंधू उगाचच आपल्या सामर्थ्याचा संकोच झाला आहे अशी हाकाटी करत होते. यशवंतरावांच्या सांगण्यामुळे मराठी पत्रकारांना केवढा तरी हुरूप येईल, असा अनंतरावांना विश्वास वाटतो.

समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून आलेल्या मा. मुख्यमंत्र्यांनी–शंकरराव चव्हाणांनी–तर असा इशारा दिला की, कितीही, कोणाच्याही मार्फत दडपण आले तरी पत्रकारांनी वस्तुनिष्ठता सोडली तर मराठी पत्रकारांनी सामर्थ्य घालवले असे होईल ! !

कोणत्याही लोकशाहीत पत्रकारांना विशेष जबाबदारीची भूमिका पार पाडावी लागते. कारण लोक स्वभावतः पडखाऊ असतात. अशा परिस्थितीत लोकशाहीच्या विधायक कार्यासाठी लोकांना उभारी द्यायची आणि राज्यकर्त्यांना लगाम घालायची कामगिरी लोकशाहीतल्या ज्या घटकांवर येऊन पडते त्यात पत्रकार अग्रगण्य होत.

ज्या लोकशाहीत पत्रकार आणि राज्यकर्ते परस्परांचे जिव्हाळ्याचे स्नेही आहेत तिथल्या लोकांना आपला अंगठा चोखत मोठ्या सुखात राहावे लागते. ◻

## ◻ प्रायोगिक प्रयत्नांचा पाठीराखा

आपण अगदी कलमी रसिक आहोत (बाकीच्यांसारखे रायवळ रसिक नाही), असे सर्वांनी म्हणावे, असा माझा खटापिटा चाललेला असतो. हा खटापिटा कोणाच्याही लक्षात येणार नाही, यासाठीही, एका वेगळ्या पातळीवर, माझा आणखी एक खटापिटा चाललेला असतो. पुन्हा चारदोन विषयांतच आपली रसिकता चालते असे मानले जाऊ नये म्हणून आपली रसिकता सर्वस्पर्शी सर्वकष आहे, हे सुद्धा मला सारखे सिद्ध करावे लागते. त्यात देखील इतरेजनांपेक्षा काही आगळेच आपल्या रसिकतेला रुचते असा लौकिक होणे मला फार्फार आवडते. या वर्णनावरून हे सगळे अवघडकानडे असेल अशी तुमची समजूत झाली तर ते योग्य, उचित, आणि स्वाभाविकच होय. पण बाकीच्या नव्व्याण्णवरावांना जे अवघडकानडे ते माझ्यासारख्या शंभररावाला सहजसोपुडे असते, असे माझे मी एक पाहून ठेवले आहे. असो.

त्यामुळे प्रायोगिक प्रयत्नांचा पाठीराखा ( व्वा व्वाः काय भाषाशैली! ) असा माझा नावलौकिक अणि दर्रारा. जीवनाच्या सर्वक्षेत्रात पसरून राहिला आहे. प्रायोगिक साहित्य, प्रायोगिक रंगभूमी,प्रायोगिक संगीत प्रायोगिक चित्रकला, प्रायोगिक शिक्षणशास्त्र, पाककला, शिवणकला, आणीबाणी, पर्यटण, ग्राहक चळवळ, सागरशेती, जाहिरातविद्या इत्यादी एकानेक क्षेतातला प्रयोग्यांचा पुंजावळा माझ्याकडे आशेने पाहात असतो. माझ्यापाशी आणखी एक बिनतोड कसब आहे. त्या त्या प्रयोगाचे कोणालाही शरण आणील, अशा भाषेत मी अस्खलित गुणवर्णन करू शकतो. हे सगळे मी काही कोणावर उपकार करण्याकरता करत नाही, याचा मला कध्धीही विसर पडत नाही. ते माझे कर्तव्यच नव्हे काय ? होयच मुळी. आणि कितीही संकटे आली तरी आपल्या कर्तव्यात चुकायचे नाही असे वळण मला लहानपणापासून पडले आहे.

हे सगळे नीट ध्यानी घेतलेत तर पुढे सादर केलेल्या एका वृत्तान्तापासून शहाणे निष्कर्ष काढता येतील तुम्हाला. नाहीतर, सगळ्या वानरांना शेपूट असते / मारुती वानर आहे / ∴ मारुतीला शेपूट आहे असले तर्कर्ष काढाल आणि फसाल. वरच्याच उदाहरणार्थ असे दिसते की मारुतीला चाके आहेत, हे त्यात कोठेच निष्पन्न होत नाही. असो. लंडन शहरात टेट गॅलरी नामे एक अप्रतिम चित्रसंग्रहालय आहे. येथील चित्रे साऱ्या जगात प्रसिद्ध आहेत. पण मुद्दा तो नाही. संग्रहालयाच्या छपराखाली मधूनमधून नव्या चित्रशिल्पकारांच्या कलाकृतींची प्रदर्शने भरत असतात. नुकतेच एका अमेरिकन शिष्पकाराने गॅलरीत आपल्या एका शिल्पाकृतीचे प्रदर्शन मांडले होते. एकशेवीस विटा ( दगडापेक्षा मऊ असलेल्या साध्यासुध्या विटा हो, ) लांबट चौकोनी आकारात एकत्र रचून हे शिल्प तयार झाले होते. तेवढेच ते शिल्प, बाकी कुछ काही नाही. कार्ल आंद्रे हे त्या शिल्पकाराचे नाव. अमेरिकेत एका प्रदर्शनात त्याने ही शिल्पाकृती प्रथम मांडली तेव्हा तिची किंमत बारा हजार डॉलर्स लावली होती. म्हणजे एका विटेला शंभर डॉलर्स. बेताचीच म्हणायची ही किंमत. पण गिऱ्हाईक कोणी मिळाले नाही. ब्रिटनच्या टेट गॅलरीत ती मांडली गेली तेव्हा बहुतेकांनी तिचे अगदी कुहूकुहूकौतुक केले. पण एक अरसिक साहेबसिंग निघाला. विटांचे हे शिल्प त्याला बघवेना. शिल्पकलेची ही विटंबनाच मांडली आहे, असे त्या मिस्टराला वाटले. मग त्याने निळ्या रंगाने भरलेली एक बाटली शिल्पावर भिरकावली आणि आपली प्रतिक्रिया रंगीत नोंदवली. काहीजणांनी या कृत्याबद्दल त्याची की–जय केली. माझ्यासारख्या काही ऐने रसिकांना मात्र त्याचे वर्तन निखालस असभ्य, वेडेपणाचे, गर्हणीय, लांछनास्पद, कठोर शिक्षेस पात्र, असे वाटले. ( शिल्पाकृतीच्या वर्णनावरून असे दिसते की अनंतरावांना तिच्यातून नक्कीच काही मौलिक अर्थ काढता आला असता : कारण लांबट चौकोन, आणि तोसुद्धा दगडांचा नाही, तर विटांचा, ही गोष्ट फार्फार महत्त्वाची आहे. शिवाय, लांबट चौकानाच्या आतल्या रिकाम्या जागांच्या परस्पर संबंधात सूचकता ठासून भरली असण्याची शक्यता नाकारणे युक्त नव्हे, एवढेच मी येथे म्हणून ठेवतो. एवढ्यानेसुद्धा, प्रायोगिक प्रयत्नांचा पाठीराखा म्हणून मी आपली जबाबदारी, किती शर्थीने पार पाडत असेन याची यथास्थित कल्पना यायला हरकत नाही. )

ह्या अरसिक साहेबसिंगाने हे काय म्हणून केले ? तो स्वतः याची दोन कारणे देतो : एक म्हणजे, कार्ल आंद्रेच्या विटक्या शिल्पात काही रंगीत भर घातल्यास ते अधिक कलात्मक होईल, असे त्याला वाटले. दुसरे म्हणजे, असल्या प्रदर्शनात जनतेचे पैसे नासण्याच्या छंदाचा त्याला निषेध करायचा होता. ही दोन्ही कारणे यत्किंचित पटण्यासारखी नाहीत : एक म्हणजे, कलाकृतीत बाहेरून अशी कोणी कसली भर घालू शकत नाही : ती स्वायत्त असते. ( आता कशी दातखिळी बसली ? ) आणि दुसरे म्हणजे कलाप्रयोगांना पैशाचे दरिद्री हिशेब लावायचे नसतात रे पिलांनो. ( आता कशी बसलेल्या दातखिळीवर चिकटपट्टी बसली ? )

या प्रसंगानंतर टेट गॅलरीच्या संचालकांनी कार्ल आंद्रेची शिल्पाकृती प्रदर्शनातून काढून टाकली. त्या विटांना थोडी विश्रांती देणेच बरे, असे परिस्थितीचा साकल्याने विचार करून त्यांनी ठरवले.

दोस्त, कार्ल आंद्रे, तू वाईट वाटून घेऊ नकोस.

सगळ्या विटा कोसळल्या ना, तरी
हा अनंतराव
तुझ्या पाठीशी उभा राहील.

—अनंतराव

# भारत-चीन संबंध

## चीनच्या दृष्टिकोनाचा मागोवा

वा. दा. रानडे

भारत आणि चीन यांच्या दरम्यान पुन: वकिलातीचे संबंध प्रस्थापित करण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला आणि पेकिंग-मधील भारताचे वकील म्हणून परराष्ट्र-खात्यातील सचिव के. आर. नारायणन् यांची नेमणूक केली! परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या लोकसभेतील घोषणेने या दोन देशांचे संबंध सुधारण्याच्या मार्गावर एक महत्त्वाचे पाऊल टाकले गेले आहे. भारत-चीन युद्धापासूनच नव्हे, तर त्यापूर्वी-पासून गेली सतरा-अठरा वर्षे या दोन देशांचे संबंध तणावाचे व संघर्षाचे होते. संबंध सुधारण्याच्यादृष्टीने भारताने काही प्रयत्न केले, पण चीनकडून काही प्रतिसाद मिळाला नाही. पण आता चीनचीही संबंध सुधारण्याची इच्छा दिसते, त्यामुळेच हा निर्णय घेण्यात आला आहे. वास्तविक या निर्णयाची दिल्लीहून एकतर्फी घोषणा होण्या-पेक्षा दिल्ली व पेकिंगहून एकाच वेळी घोषणा होणे आणि पेकिंगमधील भारतीय वकिला-बरोबरच, दिल्लीतील चिनी वकिलाचे नावही जाहीर होणे अधिक चांगले झाले असते. दिल्लीच्या घोषणेस दोन दिवस झाले तरी, चीनने त्याची बातमी देण्यापलीकडे अधिकृत प्रक्रिया काहीच व्यक्त केली नाही. हे पाहिले म्हणजे वाटते की, एकतर्फी घोषणेची घाई भारताने कशासाठी केली? संबंध सुधार-ण्याची अधिक गरज जणू भारताला आहे, चीनला नाही, असा ग्रह त्यातून निर्माण होण्याचा संभव आहे. रशिया, जपान, नेपाळ यांनी भारताच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. अमेरिकेने कोणतेच मतप्रदर्शन केले नाही. रशियाने भारताप्रमाणे चीनचे नवे पंतप्रधान हुआ कुओ-फेंग यांना अभिनंदनाचा संदेश पाठविला असून चीनशी संबंध सुधारण्याची तयारी दर्शविली आहे.


चीनला लागून असलेल्या भारताच्या दोन हजार मैल सीमेवरचा तणाव किती वर्षे चालू ठेवावयाचा? सीमा प्रश्न वाटाघाटीच्या मार्गाने सोडवण्याचा प्रयत्न करायला काय हरकत आहे? या विचारांतून भारताने हे पाऊल टाकले आहे. त्याला कितपत यश येते हे चीनच्या प्रतिसादावर अवलंबून आहे.

चीनच्या दृष्टिकोनातून या प्रश्नाचा विचार केला तर असे दिसते की, नेतृत्वाचा अंतर्गत संघर्ष आणि रशिया–चीन संघर्ष या दोन प्रश्नांनी तो देश ग्रस्त झालेला आहे. तेंग सियाओ पिंग यांची सर्व अधिकारपदांवरून हकालपट्टी करून, हुआ कुओ–फेंग यांना पंत-प्रधान नेमले असले तरी, अंतर्गत संघर्ष पूर्ण-पणे संपला असा त्याचा अर्थ नाही. माओत्से तुंग यांच्या निधानानंतर त्याला खरे तीव्र स्वरूप येणार आहे. हुआ यांचे नेतृत्व जहाल गटाला मान्य नाही, पण पक्षाची एकजूट टिकविण्यासाठी माओंनी तडजोड म्हणून त्यांचे नाव सुचविले व जहाल गटाला ते मान्य करावे लागले. पण माओंच्या निधना-नंतर जहाल गट, ही तडजोड पुढे चालू ठेवील-लच असे नाही. पक्षाचे अध्यक्षपद आणि पंतप्रधानपद ही दोन्ही पदे आपल्याकडे राख-ण्याचा या गटाचा प्रयत्न राहील. आणि या अंतर्गत नेतृत्वस्पर्धेचा निकाल लागेपर्यंत परराष्ट्रीय संबंधांच्या क्षेत्रात कोणताही मह-त्त्वाचा निर्णय चीन घेण्याची शक्यता नाही. भारताच्या निर्णयाला प्रतिसाद म्हणून भार-तात चीन वकिलाची नेमणूक करील. (हा लेख प्रसिद्ध होईपर्यंत कदाचित त्यासंबंधी बातमीही आलेली असेल.) पण वकिलाच्या नेमणुकीनंतर सीमा प्रश्नावर भारताशी वाटाघाटी करणे या ज्या पुढच्या महत्त्वाच्या हालचाली आहेत, त्याबाबत चीन एवढ्यात रस घेणार नाही. अंतर्गत सत्तास्पर्धेचा निर्णा-यक शेवट झाल्यानंतरच चीन या प्रश्नांकडे लक्ष देईल.

रशिया व भारताच्या उद्देशांबद्दल चीन-मधील जहाल गट अजून साशंक आहे. हुआ कुओ फेंग यांची पंतप्रधानपदी नेमणूक ८ एप्रि-लला जाहीर झाली. त्यांच्या नेमणुकीबद्दल अभिनंदनाचे औपचारिक संदेश भारत व रशियाच्या पंतप्रधानांना पाठवायचेच होते तर, ते लागलीच का पाठविले नाहीत? श्रीमती गांधींनी अभिनंदनाचा संदेश १३ एप्रिलला व कोसिजिन यांनी १५ एप्रिलला पाठविला. एकाच वेळी अशी समान हाल-चाल करण्यात, या दोन देशांचे औपचारिक अभिनंदनापेक्षा काही निराळे उद्देश आहेत काय? अशी शंका पेकिंगमधील जहाल गटाच्या नेत्यांना वाटते. पंतप्रधान हुआ यांच्याशी मैत्रीचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापित करून चीनचे धोरण रशिया व भारतास अनुकूल बनविण्याचा प्रयत्न करावयाचा, चीनमधील सत्तास्पर्धेचा अंतिम निर्णय लागण्यापूर्वीच या हालचाली करून हुआ यांचे स्थान बळकट करावयाचे असे उद्देश या हालचालींमागे असल्याच्या जहाल गटाच्या शंका आहेत. माओ जिवंत असेपर्यंत जहाल गटाचे नेते त्यांना उघड विरोध करू शकत नाहीत, पण नंतर ते लागलीच हुआविरोधी मोहीम सुरू करण्याचा संभव आहे. हुआ यांचे स्थान बळकट होण्यापूर्वीच अशी मोहीम सुरू केली पाहिजे. एकदा त्यांचे स्थान बळकट झाल्या-वर, त्यांना हलविणे कठीण जाईल याची जहाल गटाला कल्पना आहे. रशिया व भार-ताशी संबंध सुधारून हुआ भांडवलदारी व प्रतिक्रांतिकारी मार्गाने जात आहेत असा त्यांच्या प्रचाराचा सूर राहण्याची शक्यता आहे, आणि अंतर्गत सत्तास्पर्धेचा निकाल लागेपर्यंत ते हुआ यांना परराष्ट्रसंबंधाच्या क्षेत्रात कोणताही महत्त्वाचा निर्णय घेऊ देणार नाहीत. तेव्हा वकिलातीच्या पातळीवर संबंध प्रस्थापित झाले तरी, तेवढ्याने भारत–चीन संबंध सुधारून वादग्रस्त प्रश्न सुट-ण्याच्या मार्गास लागेल, अशा अपेक्षा एव-ढ्यातच बाळगणे योग्य होणार नाही.

दुसरा प्रश्न रशिया–चीन संघर्षाचा. रशि-याच्या आक्रमणाची भीती चिनी नेत्यांना वाटते. त्याविरुद्ध दक्षता म्हणून चीनने अमे-रिकेशी तर मैत्रीचे संबंध जोडलेच, पण आशियातील जपान, मलेशिया या राष्ट्रां-शीही सहकार्याचे संबंध प्रस्थापित केले आहेत. रशियाशी व भारताशी एकाचवेळी सीमा-संघर्ष नको. भारताशी संबंध सुधारण्याच्या-मागे चीनचा हा उद्देश असण्याचीही शक्यता आहे.

□



# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

## पु. ल. इनामदार

### प्रकरण चार : सुनावणी : २२ जून ते १८ जुलैपर्यंत

२० जून १९४८ ला सकाळी मी दिल्लीला येऊन हिंदुमहासभाभवनामध्ये गेलो, तेव्हा मला हे आढळले की, माझ्या राहण्याची वेगळी पण सर्व व्यवस्था केली आहे. मला मुख्य भवनाच्या ईशान्य दिशेकडे असलेल्या एका चाळवजा दुमजली इमारतीत वरच्या मजल्यावर एक स्वतंत्र खोली देण्यात आली होती. दोन्ही इमारतींमध्ये मोकळे आवार होते. माझे सहयोगी मुंबईचे श्री. डांगे, ॲडव्होकेट व श्री. मेंगळे, ॲडव्होकेटही आले होते. दोघे क्रमशः विष्णू रा. करकरे व नारायण द. आपटे यांच्यावतीने काम करणार होते. गोपाळ गोडसेकरिता श्री. मणियार होतेच. आम्हा चौघांना वरच्या मजल्यावरच्या चार खोल्या दिल्या होत्या. प्रत्येक खोलीमधून एक नवारीचा पलंग, एक टेबल व खुर्ची होती. पाण्याकरता एक बादली व एक लोटा होता. खोलीमध्ये विजेचे फिटिंग होते. वरच्या मजल्याच्या पूर्वेच्या टोकाला दोन संडास व नहाणीघर होते. पश्चिमेकडे वर जायला जिना होता. खोल्यांसमोर लांबच लांब व्हरांडा होता. जिन्यावरून व्हरांड्यात जाताच पहिली खोली श्री. मणियारकरिता, दुसरी माझ्याकरिता, तिसरी श्री. डांगेकरिता व चौथी श्री. मेंगळे यांच्याकरिता होती. मी स्वतःच माझ्या शेजाऱ्यांची ओळख करून घेतली. श्री. ओक हे भवनाच्या दक्षिण बाजूच्या एका हॉलवजा लहान खोलीत राहात होते. सौ. भोपटकर आल्या होत्या. त्या व श्री. भोपटकर भवनाच्या ऑफिसजवळ असलेल्या एका कोपऱ्यावरच्या खोलीत राहात होते. त्यांच्या खोलीसमोरच एक दालन होते. त्या दालनात एक लांब टेबल, जेवायचे टेबल म्हणून ठेवले होते व त्याभोवती सुमारे डझनभर खुर्च्या होत्या. दुसऱ्या बाजूस न्हाणीघर होते. आमचा चहा आम्ही आमच्या खोल्यांमधूनच घेत होतो. सकाळ, संध्याकाळचे जेवण टेबलावर घेत होतो. एक मुलगेलासा नोकर आमच्या खोल्यांची साफसफाई करीत असे. तळमजल्यावर राहणारे एक पंजाबी निर्वासित गृहस्थ श्री. देवेंद्रजी आमची वरकड व्यवस्था बघत. स्वयंपाकाची व्यवस्था सौ. भोपटकरांच्या देखरेखीखाली एक आचारी करीत असे. सौ. भोपटकर आमच्या जेवणाची व्यवस्था आगत्यशील, दक्षतेने व स्वतः हजर राहून बघत. मला ते सर्व बघून २० जूनला फार बरे वाटले होते. मला वाटले त्यामानाने हे सर्व माझ्या अपेक्षेहून पुष्कळ अधिक नि निराळे होते. ते पाहून मी श्री. व सौ. भोपटकर पतिपत्नींचे मनापासून आभार मानले. कोर्टात जाण्यायेण्याकरिता नेहमीची एक प्रायव्हेट टॅक्सी ठरवली होती. इतर वेळी आम्हांला कुणाला हवी असेल तर, ड्रायव्हरला आधीपासून सांगून स्वतःच्या खर्चाने आम्ही ती वापरीत असू.

लाल किल्ल्यातील कोर्टाचे काम सकाळी दहा वाजताच सुरू होई. आणि कोर्टातून परत यायला आम्हाला संध्याकाळचे सहा–साडे वाजत. त्यामुळे सकाळी हिंदुमहासभा भवनातून कोर्टात जायची तयारी करायला आम्हाला जवळ जवळ आठ वाजताच सुरुवात करावी लागे. संध्याकाळी भवनात परत आल्यावर मला काम करायला फारच थोडा हुरूप असे, म्हणून मी दिल्लीलादेखील माझा नेहमीचा दिनक्रम चालू केला. पहाटे लवकर चारच्या पूर्वी मी उठून चहा वगैरे आटोपून टेबलाशी कामाला बसायला तयार होत असे. दिल्लीला माझ्याजवळ पाणी तापवायला पाण्यात बुडवून ठेवायचा विजेचा हीटर होता. त्याने किटलीमध्ये चहाचे पाणी, दूध व बादलीमध्ये स्नानाला पाणी तापवणे शक्य होई. आमचे न्याहरीवजा जेवण सकाळी ९ वाजेपूर्वीच आटपावे लागे. रीडिंग रोडवर नवी दिल्लीपासून

दर्यागंजमार्गे लाल किल्ल्यामध्ये जावयाला टॅक्सीमधूनदेखील अर्धा-तास लागत असे. लालकिल्ल्याहून परत आल्यावर मी संध्याकाळचा तास दीड तास माझ्या सहकाऱ्यांबरोबर घालवीत असे. कोणी भेटायला आले असले तर, त्यांच्याशी बोलण्यात वेळ जाई. कधीं कधी बिर्लामंदिर, रीडिंग रोडवरील भंगी कॉलनीच्या बाजूने किंवा गोल बाजारच्या बाजूने फिरायला जात असू. संध्याकाळचे जेवण आठ वाजता घेत असू. श्री. भोपटकर आमच्याबरोबर जेवायला बसत नसत. त्यांचे जेवण त्यांच्या खोलीतच होत असे. जेवण संपवून खोलीत आल्यावर पुढील दिवसाऱ्या कामाचा अंदाज घेऊन त्या दृष्टीने कागदपत्र जुळवून घेऊन टेबलावर ठेवीत असे नि झोपायला म्हणून अंथरुणावर १० वाजता आडवा होत असे.

सकाळी हिंदुसभाभवनातून ९–१५ च्या अगोदरच निघून लालकिल्ल्यातील कोर्टात आम्ही ९–४५ च्या अगोदरच पोचण्याची काळजी घेत असू. सकाळच्यावेळी नवी दिल्ली, दर्यागंज, जामा मसजिदच्या बाजूने लालकिल्ल्यात जाताना रहदारीची गर्दी असे. त्यातून वाट काढायला फार वेळ लागे. दिल्लीची रहदारी फारच अनियंत्रित असे. तसेच संध्याकाळी परत येताना होई. हिंदूमहासभा भवनाच्या ऑफिसमध्ये एक कानडी तरुण टाइपिस्ट होता. तो आमचे कागद टाईप करून देई. लवकरच ऑगस्टमध्ये मी स्वत: एक स्मिथ-कोरोना बनावटीचा टाइपरायटर विकत घेतला. ते मशीन मी दिवसा भवन ऑफिसमध्ये ठेवी. रात्रीकरिता माझ्या खोलीवर मागवीत असे. थोडयाच दिवसांत मला स्वत:ला बरेचसे टाईपिंग करता येऊ लागले. य स्वत:च्या केसचे कागद तयार करायला मला सोपे झाले. त्याच सुमारास एक मेस्टेरनरचे नकला काढणारे सायक्लोस्टाईल मशीन आमच्याकरिता आणले गेले. ते कसे, कोणी आणले होते, हे मला आठवत नाही. पण त्यावर आम्ही महात्मा गांधी खून खटल्याचे सर्व कागद व्यवस्थित टाईप करून घेऊन त्याच्या पुस्तकासारख्या प्रती तयार करायला सुरुवात केली. त्या कामाकडे बघायला आमच्यामधले श्री. ओकसाहेब सर्व लक्ष घालीत. त्यांनी केसचे पुस्तक इतक्या व्यवस्थित रीतीने बनविले की,आम्ही बनविलेल्या प्रती अभियोगपक्षाची मंडळीही आमच्याकडून घेऊ लागली. त्याचे पैसे अर्थात ते आम्हाला देत. श्री. ओक यांना असल्या कामांची हौसच होतीसे वाटले. ते स्वत: चांगल्यापैकी चित्रकार होते. तैलरंगामध्ये उत्तम श्रेणीचे तैलचित्र ते तयार करीत. तेथे असताना त्यांनी सौ. भोपटकरांचे एक तैलचित्र बनवले होते. फारच चांगल्यापैकी कलाकृती होती ती. शेजारी असल्यामुळे म्हणायचे, श्री. डांगे, श्री. मेंगळे व मी यांचे एक त्रिकूट जमले होते. श्री. डांगे बहुगुणी गृहस्थ होते. जादूचे खेळ, ज्योतिष, नकला, काव्य, संस्कृतसाहित्य, नाटचकला आणि जरासुद्धा स्वत: न हसता दुसऱ्याला पोट धरून हंसवणे हे त्यांना सहज जमे. त्यांच्या संगतीत आमचा वेळ चांगला जाई. आमचे चवथे शेजारी बॅ. मणियार आमच्यामध्ये फारच थोडे मिसळत. प्रकृती अस्वास्थ्यामुळे की स्वभावच तसा होता त्यांचा, त्यांनाच माहीत. मी स्वत: कामाच्या बाबतीत, श्री. भोपटकरांना, मी योजलेल्या मुद्यांबद्दल त्यांच्याशी सल्लामसलत करायचा. त्यांचे मार्गदर्शन मिळवायचा प्रयत्न करायचा असा क्रम चालू ठेवला. मी आमच्या सगळ्या सहकाऱ्यांमध्ये सर्वांत लहान होतो नि मी ज्या लॉ कॉलेजमध्ये पुण्याला शिकलो, तेथे श्री. भोपटकर हे अध्यापकही होते. त्यांनी मला शिकविण्याचा कधी योग आला नाही, तरी ते माझे गुरुजीच होते. माझे वागणे श्री. भोपटकरांनाही आवडायचे असेच म्हटले पाहिजे. कारण त्यांनी मला वेळोवेळी मोलाचा सल्ला दिला. योग्य ते मार्गदर्शन केले. ते बोलण्यात पुणेरी परखडपणा करीत. ते स्वत: लेखक–कादंबरीकार असून देखील इतके कठोर, शुष्क भावनेने कसे बोलू शकतात, याचे मला आश्चर्यही वाटायचे. कधीकधी रागही यायचा. पण त्यांनी मला पुष्कळ वेळी भावनात वाहवून जाण्यापासून वाचवले. माझ्या विषादाच्या, निराशेच्या वेळी मला योग्य तो धीर दिला. काम चालू ठेवायला उत्साहित केले. मी फार वाहवून जात आहे असे पाहून, ते निर्मळ शब्दांत माझ्या उत्साहावर थंड पाणी ओतीत नि आमची स्वारी लगेच ताळ्यावर येई. श्री. भोपटकर गुरुजींच्या सहवासात लाल किल्ल्यामध्ये काम करायला मिळाल्याच्या माझ्या आठवणी फार मोलाच्या आहेत असे मला वाटते. त्यांचे कृतज्ञ स्मरण करण्यात मला भूषण वाटते. नागपूरचे ऑल इंडिया रिपोर्टरचे श्री. वा. वा. चितळे हे भोपटकरांचे मित्र होते. त्यांनी आमच्याकरिता ए. आय. आर. चा १९१४ पासून १९४७ पर्यंतच्या अंकांचा एक संच हिंदुमहासभाभवनात पाठवून दिला होता ! अशा रीतीने बचाव समितीचे हे अभिभाषक कार्यालय सर्व तऱ्हेने सुसज्जित व संघटित झाले होते ! त्याचे प्रेरक नि संचालक होते पुण्याचे श्री. लक्ष्मण बळवंत तथा अण्णासाहेब भोपटकर ॲडव्होकेट !

असो. कहाणीचे सूत्र घेऊन सांगायचे म्हणजे २२ जून १९४८ ला आम्ही कोर्टात हजर झालो. तेथे जाताच वर्तमान कळले की, १७ जूनला जज्ज आत्मचरणजींनी अभियुक्त दिगंबर बडगेला माफीचा साक्षीदार व्हायची परवानगी दिली आहे ! अर्थात त्यासाठी जज्ज आत्मचरणजींना स्पेशल मॅजिस्ट्रेटना अधिकार देण्यासाठी भारत शासनाला वेगळी आज्ञा काढावी लागली होती. यामुळे २२ जूनला श्री. दिगंबर रा. बडगे अभियुक्तांच्या पिंजऱ्यात त्यांच्या जागेवर आले नव्हते. त्यानंतरही ते कोर्टात दिसले नाहीत. एकदाच दिसले ते,त्यांनी साक्ष दिली त्या आठवड्यात. दिल्लीला अभियोग चालू असताना ते लाल किल्ल्यातील आरक्षी कक्षेमध्ये पोलिसांचा पाहुणचार घेत असावेत.

२२ जूनच्या दिवशी कोर्टात प्रत्येक अभियुक्ताविरुद्ध जे आरोपपत्र लिहिले होते ते वाचून दाखवले. त्यावर प्रत्येक आरोपीने उभे राहून आरोपाचा इन्कार केला आणि न्यायालयात जाच व्हावी असे सांगितले. हे आरंभीचे आन्हिक संपल्यावर ॲडव्होकेट जनरल दप्तरी यांचे अभियोग कथन–स्टेटमेंट ऑफ प्रॉसिक्यूशन केसचे भाषण सुरू झाले. त्यादिवशी त्यांचे भाषण ऐकायला बरीच गर्दी होती. माननीय डॉ. भीमराव तथा बाबासाहेब आंबेडकर पतिपत्नी व माननीय श्री. नरहर विष्णु तथा काकासाहेब गाडगीळ कोर्टात हजर होते. तसेच श्री. आर. एन. बॅनर्जी, आय. सी. एस. भारत शासनाचे गृहखात्याचे सचिव आपल्या सचिवालयातील लव्याजम्यासहित हजर होते. त्यादिवशी श्रोतृवर्गात बरीचशी गांधी–टोपीधारी मंडळी दिसली. सुमारे ६०–७० असावीत. श्रोतृवर्गापैकी माननीय सज्जन व अधिकारीगण सुमारे तासभर कोर्टात बसले होते. नंतर आवाज न करता उठून बाहेर निघून गेले. मधल्या सुटीनंतर श्रोतृवर्गापैकी बरेचसे परत आले नाहीत.

ॲडव्होकेट जनरल दफ्तरी यांनी आपल्या निवेदनाच्या सुरुवातीस अभियोगामधील एक एक घटना कालक्रमानुसार सांगितल्या व त्या प्रत्येक घटनेच्या संदर्भात अभियोग पक्ष जो पुरावा देणार आहे, जे साक्षीदार आणणार आहे आणि ते काय सांगणार आहेत यांचे त्रोटक विवरण दिले. घटना सांगताना जेथे ती महत्त्वाची असेल व तिचा पुढील घटनांशी जो संबंध असेल त्याचाही खुलासा केला. डॉक्टर परचुऱ्यांच्या विरुद्ध अभियोग पक्षाचे जे म्हणणे होते, जे आरोप त्यांच्यावर लादले गेले होते, ते सांगताना श्री. दफ्तरींनी साक्षीदार मधुकर काळे याच्यावर बराच भर दिला आणि साहजिकच डॉक्टरांच्या कबुलीजबाबावरही. पण कबुली जबाबाच्याविषयी त्याजबाबत काय लिहिले आहे, त्या संबंधाने कोण कोण साक्षीदार येणार आहेत यांविषयी जवळ जवळ काहीच खुलासा केला नाही. मला स्वतःला ते विलक्षण वाटले. कोर्टासमोर अजून कबुलीजबाबाचे कागद दाखल झाले नव्हते. ते कागद दाखल झाले नसताना, त्याविषयी काहीसुद्धा बोलणे कसे योग्य होईल असा आक्षेप घ्यावा असे क्षणभर माझ्या मनात आलेही. पण मी गप्प बसलो. साक्षीदारांच्या सूचीत २७५ साक्षीदारांची नावे होती. श्री. दफ्तरींचे भाषण जवळ जवळ दिवसभर चालले होते. भाषणाच्या शेवटी श्री. दफ्तरींनी कोर्टाला प्रार्थना केली की, ज्या ठिकाणी २० जानेवारीचा 'बॉंबस्फोट' झाला व ज्या ठिकाणी गांधींच्या प्रार्थना मेळाव्याच्या वेळी त्यांच्यावर पिस्तुल झाडण्यात आले, त्या जागेचे निरीक्षण कोर्टाने करावे. जज्ज आत्मचरणजींनी घटनास्थल निरीक्षणाच्या वेळी तेथे कोण कोण अभियुक्त उपस्थित राहू इच्छितात याबद्दल विचारले. कोणी अभियुक्ताने जबाब देण्याच्या अगोदरच श्री. दफ्तरींनी कोर्टाच्या नजरेस आणले की, जर अभियुक्तांना घटनास्थळावर यायचे असेल तर, तेथे पोलिसांचा पुरेसा बंदोबस्त करावा लागेल. अर्थातच अभियुक्तांचे वकील घटनास्थळावर येऊ शकतीलच. त्यावर अभियुक्त आपटे, करकरे, मदनलाल आणि गोपाळ गोडसे यांनी उभे राहून सांगितले की, त्यांना आपल्या वकिलांना माहिती देण्यासाठी म्हणून, घटनास्थळी उपस्थित राहायचे होते. जज्ज महोदयांनी त्याला संमती दिली. घटनास्थल निरीक्षणासाठी दिवस व वेळ २४ जून १९४८ सकाळी १० वाजता ठरविण्यात आली. पक्षकार आणि त्यांच्या वकिलांना सूचना देण्यात आली.

२४ जूनला सकाळी श्री. डांगे यांच्याबरोबर घटनास्थळी मीही जाण्याचे ठरवले. तेथे जाण्यात माझे काही काम नव्हते. २० जानेवारी तारखेच्या किंवा ३० तारखेच्या घटनांशी बाह्यतः डॉ. परचुऱ्यांच्या पुरते बोलायचे तर, काही संबंध नव्हता. पण माझा अनुभव असा होता की, कोर्टासमोर काम करताना संदर्भित घटनास्थळाचे चित्र डोळ्यासमोर उभे असले म्हणजे दिवाणी काय, फौजदारी काय, कोणत्याही प्रकरणामध्ये साक्षीदार काय म्हणतो आहे हे नीट कळायला फार मदत होते व त्याला प्रश्न विचारणेही सोपे जाते. असा विचार मनात असतानादेखील मी इतरांना सांगितले की, मला बिर्ला हाऊसचा परिसर बघायचा आहेच. गांधीजी बिर्ला हाऊसमध्ये कुठे राहात असत, त्यांची हत्या जिथे झाली ते स्थान मला बघायचे आहे. म्हणून २४ जूनला सकाळी मी श्री. डांगे यांच्याबरोबर घटनास्थळी एक 'बघ्या' म्हणून गेलो. जज्ज आत्मचरणजी तेथे आले होते. चार अभियुक्तांनाही आणले होते तेथे. प्रथम जेथे 'बॉम्बस्फोट' झाला ते स्थान बघितले. बिर्ला हाऊसमध्ये मुख्य इमारतीच्या उत्तरेला जे आवार होते त्याच्या पाठीमागे नोकरांना राहण्यासाठी काही खोल्या बांधलेल्या होत्या. त्या खोल्यांच्या पूर्वेला आवाराची भिंत, तीन चार फूट उंचीचीच, आवाराला वळसा घालून मुख्य इमारतीच्या बाजूला रस्त्यापर्यंत गेलेली होती. आवारामध्ये इंच, माती भरलेला चौथरा –त्यावर नोकरांच्या खोल्यांना लागून दक्षिणाभिमुख एक तीन चार खणी दालन होते. त्यामध्ये इमारतीमधून यायला दगडाच्या फरशीची वाट होती. चौथऱ्यावर चढायला तीन चार पायऱ्या होत्या. दालनामध्ये प्रार्थनेच्या वेळी महात्माजी व दहा बारा मंडळी, शिष्यगण व निमंत्रित बडी मंडळी, अशी बसत व समोर चौथऱ्यावर श्रोतृवर्गाचा सत्संगी समाज बसे. सुमारे पाचशे मंडळी बसतील एवढी जागा होती. चौथऱ्यावर यायला–सर्वसाधारण जनतेला यायला–मुख्य फाटकातून पश्चिमेच्या बाजूने वाट होती. या चौथऱ्याच्या ईशान्येला नोकरवर्गाच्या खोल्यांपासून सुमारे वीस पंचवीस फुटांवर आणि महात्माजी जेथे बसत तेथून जवळ जवळ पन्नास फुटांवर आवाराच्या भिंतीला लागून बाहेरच्या बाजूला काही दगड, विटा, माती पसरलेली होती व भिंतीचा काही दोन फुटी बाहेरचा भाग नवीन डागडुजी केलेला दिसत होता. तेथे 'बॉम्बस्फोट' झाल्याचे सांगण्यात आले. दालनांमध्ये मध्यभागी उत्तरेच्या भिंतीमध्ये एक जाळीदार, अंदाजे '१८"×१२" इंच लांबीरुंदीचा सहा फूट उंचीवर झरोका होता. तो झरोका ज्या खोलीसाठी होता ती खोली नंबर तीन होती. त्या खोलीमध्ये जाऊन बघितले तर, तेथे तो झरोका जमिनीपासून नऊ फूट उंचीवर होता. २० जानेवारीला संध्याकाळी प्रार्थनासभेच्या वेळी कोणा अभियुक्ताने फोटोग्राफरच्या वेशाने जाऊन, खोलीत शिरकाव करून घेऊन, झरोक्यातून महात्माजींवर पिस्तुल झाडण्याचा व हातगोळा फेकण्याचा मनसुबा केला होता असे सांगण्यात आले होते. चौथऱ्यावर दालनापुढे पूर्वेच्या बाजूला चढायच्या पायऱ्यांजवळ एक दगडाचे स्मारक होते व त्यावर 'हे राम!' ही अक्षरे खोदलेली होती. आम्ही गेलो, त्यावेळी, तेथे नुकतीच ताजी फुले वाहिलेली होती! त्या ठिकाणी महात्माजींवर पिस्तुल झाडले व तेथेच महात्माजी जमिनीवर कोसळले होते! मुख्य इमारतीत पूर्वेच्या बाजूला एक खोली दाखविण्यात आली तेथे महात्माजी जानेवारी १९४८ मध्ये येऊन राहिले होते असे सांगण्यात आले. हे सर्व बघून जज्ज आत्मचरणजींनी जे निरीक्षण वर्णन लिहिले ते असे 'जाळीदार झरोका क्वार्टर नंबर तीनच्या खोलीमध्ये जमिनीपासून अंदाजे नऊ फूट अंदाजाच्या उंचीवर आहे, आणि दालनामध्ये सर्वसाधारणपणे सहा फूट उंचीवर आहे. 'बॉम्बस्फोटाची' जागा प्रार्थनासभेच्या स्थानापासून 'काही अंतरावर' आहे... ती जागा प्रार्थनासभेच्या जागेतून जवळ जवळ दिसत नाही. प्रार्थनासभेच्या आग्नेय दिशेच्या कोपऱ्यावर बसलेल्यांना दिसेल. स्फोटाच्या जवळचा भिंतीचा भाग नुकताच दुरुस्त

**घटनास्थल निरीक्षणासाठी २४ जून १९४८, सकाळी १० वाजता ही वेळ ठरविण्यात आली**

केलेला दिसला.' इत्यादी. त्या भिंतीला झालेले नुकसान बाहेरच्याच बाजूने झालेले, एखाद्या वाहनाचा धक्का लागून झाल्यासारखे मला बघून वाटले, पण तेथे कोणी काही म्हटले नाही. गोपाळचे वकील बॅरि. मणियार आलेच नव्हते! मी काही म्हणालो तर ते आगाऊपणाचे दिसेल म्हणून मी गप्प राहिलो. पण जज्ज महोदयांनी लिहिलेला तो निरीक्षणलेख वाचून मला जज्ज आत्मचरणजींच्या 'जरूरीपुरते'– सफीशिअन्ट ॲण्ड नेसेसरी' लिहिण्याची पहिली झलक पाहायला मिळाली ! नियमानुसारच का होईना, पण किती तरी अधिक बोलके वर्णन लिहिता आले असते असे मला वाटले. अभियोगपक्षाने घटना स्थळाच्या मानवचित्राची 'नीलप्रत' न्यायालयात दाखल केली होती व आम्हालाही एक एक प्रत दिली होती म्हणून काही उणीव भासली नाही एवढीच समाधानाची जागा होती. कथित 'बॉम्ब' म्हणजे सैन्यात वापरतात तसला, तोडफोड करायला म्हणून वापराचा, बंदुकीच्या दारूचा, ॲसबेसटॉसच्या विणीचा, अंदाजे वीतभर लांब, चार पाच बोटे रुंद व दोन तीन बोटे जाड विटेसारखा तुकडा असतो असे मी वाचले होते, तशी गनकॉटन स्लॅब' होती, पण येथे एवढेच कथन पुरे. याविषयी पुढे अधिक येईलच.

आम्ही दुपारी दोन वाजता कोर्टात जमलो नि अभियोगपक्षाचा पहिला साक्षीदार ईश्वरदत्त पोलिस कॉन्स्टेबल न्यायासनासमोर कथन–जबानी द्यायला आणला गेला. ईश्वरदत्त साक्षीदार ग्वाल्हेरचा होता, हे बघून मी थोडासा हादरलोच. पण तो फरारी अभियुक्त गंगाधर दंडवते, गंगाधर जाधव व सूर्यदेव शर्मा हे पोलिसांनी शोध करूनही अजून सापडले नाहीत हे सांगण्यासाठी ! मी सुटकेचा निःश्वास सोडला. अभियोगपक्षातर्फे ॲडव्होकेट जनरल दफ्तरींनी परीक्षण–तपासणी केल्यावर श्री. डांगे कूटपरीक्षणाकरता उभे राहिले, पण हा शोध कुठे चालला आहे हा प्रश्न त्यांनी विचारला व त्याला उत्तर मिळाले की, हा शोध ग्वाल्हेरलाच चालला होता. एवढे ऐकून श्री. डांगे खाली बसले. नंतर मी कूटपरीक्षणासाठी उभा राहिलो. सात आठ प्रश्न विचारून मी साक्षीदाराकडून हे वदवून घेतले की, त्याला शोध करायला सांगितले म्हणून ग्वाल्हेरमध्ये त्याने फरारी अभियुक्तांना शोधले होते. त्याला अभियुक्तांना फरारी घोषित करायला कायद्याने जे जे करावे लागते, त्याची काही माहिती नव्हती व त्याने त्यांपैकी काही केलेही नव्हते. अधिक काही प्रश्न विचारून 'फरारी घोषित' अभियुक्तांना न्यायालयासमोर आणावयाचा व त्यासाठी अभियोगीपक्षाच्या त्रुटी सिद्ध करण्याचा व या अभियोगाची कार्यवाही थोपवून धरण्याचा आग्रहही नव्हता. म्हणून मीही आपले कूटपरीक्षण आटोपते घेतले. पुढेमागे फरारी अभियुक्त बंदी झाले, नि त्यांच्याविरुद्ध अभियोगाची कार्यवाही झाली तर, त्यावेळी या अभियोगाच्या निर्णयाने त्यांचे नुकसान होऊ नये, एवढेच मला साधायचे होते. मला येथे हे सांगून टाकावेसे वाटते की, माझा हा दृष्टिकोण अंततः फरारी मंडळींच्या हिताचा ठरला ! पुढे हे तीन अभियुक्त प्रकट झाले. पण त्यांच्याविरुद्ध काही अभियोग कार्यवाही चालली नाही ! कारण ग्वाल्हेरच्या डॉक्टर परचुऱ्यांविरुद्ध आलेला या अभियोगातला पुरावा, दोष सिद्धीकरता अविश्वसनीय ठरविला गेला होता! परंतु त्यावेळी एक विचार मात्र माझ्या मनात आल्याशिवाय राहिला नाही. तो असा की, हे महात्मा गांधी खून खटल्याचे अभियोग पर्व ग्वाल्हेरच्या साक्षीदाराने सुरू होत आहे ! पण हेही वाटले की, फरारी अभियुक्तांची नावे चालानमध्ये लिहिली असताना, आरंभीच असा साक्षीदार उभा करणे अभियोग पक्षाला विहीतच होते. मग त्याने मी का विचलित व्हावे ! पण श्री. भोपटकरांचे शब्द या प्रकरणात डॉ. परचुरे अवश्य फाशी जाणार ! हे आठवून पुन्हा विचारचक्र सुरू होई ! परमेश्वरा ! माझ्यावर दया कर ! असे म्हणूनच मला स्वतःला शांत करावे लागले.

अभियोगपक्षाचा पहिला साक्षीदार अशा रीतीने झाल्यानंतर अभियोगपक्षाने दि. २० जानेवारीच्या बॉम्बस्फोटाच्या घटनेविषयी साक्षीदारांची मालिका परीक्षणासाठी आणायला आरंभ केला. त्यामुळे मला मात्र मोकळीक मिळाल्यासारखे झाले. त्याचा उपयोग मी न्यायालयासमोर काही बचावाच्या मुद्द्यांबाबत हरकती अर्ज–ऑब्जेक्शन पिटिशन्स–द्यायला आरंभ करून केला. पहिला अर्ज दिला तो डॉ. परचुरे ग्वाल्हेर संस्थानचे निवासी व नागरिक आहेत, त्यांनी केला असला तरी ग्वाल्हेरच्या बाहेर काही गुन्हा केलेला नाही. त्यांच्यावर आरोप लावायला व त्याची चौकशी करायला या कोर्टाला अधिकार नाही याबद्दल दिला. पण त्याच वेळेस अभियोगपक्षाने भारत शासनाकडून आत्मचरण, स्पेशल जज्ज यांना भारताच्या कोणत्याही भागात व बाहेरही, कोणा अभियुक्ताने या अभियोगासंबंधी हत्त्या किंवा हत्त्येचे प्रोत्साहन करण्याचा अपराध केला आहे, असा आरोप त्या अभियुक्ताविरुद्ध लावण्याची व त्याची चौकशी करण्याची पात्रता देण्यासंबंधी अधिकार देणारे आज्ञापत्र, क्रिमिनल प्रोसीजर कोडच्या धारा२८८या नियमाप्रमाणे प्रथापित केले होते.दुसरा मुद्दा कबुलीजबाबाबद्दल होता. हा अभियोग सुरू झाल्याच्या पहिल्या दिवसापासून मी न्यायालयात कबुलीजबाब दाखल केला की नाही, याबद्दल चौकशी करीत होतो. कारण त्याचे कागद मला बघावयाचे होते व त्यांमध्ये काय लिहिले आहे हे माहीत करून त्यासंबंधी कसा आणि काय आपत्तिअर्ज द्यावयाचा, हे मला ठरवायचे होते. मी प्रत्येक सुनावणीच्या दिवशी रीडरकडे जाई व कबुलीजबाब दाखल झाला का, याची चौकशी करी. पण मला तो अजून दाखल न झाल्याचे सांगण्यात येई. शेवटी आदल्या दिवशी तो कबुलीजबाब दाखल झाला असे मला कळले, म्हणून मी शनिवारी १० जुलैला मुद्दाम कोर्टात गेलो व अर्ज देऊन त्या कबुलीजबाबाचे निरीक्षण केले. परंतु ते निरीक्षण करणे मला फार तापदायक वाटले व ते करताना माझ्या चिडक्या वृत्तीला आवर घालणे मला अती कठीण झाले. त्या कबुलीजबाबामध्ये जे काही लिहिले होते, त्याने मी चिडलो होतो असे मुळीच नव्हे. परंतु ते निरीक्षण जज्ज आत्मचरणजींच्या चेम्बरमध्ये, त्यांच्या टेबलापाशी बसून, त्यांच्या डोळ्यांत तेल घालून बघणाऱ्या नजरेखाली करणे, मला फार अपमानास्पद वाटले.आम्हाला असे निरीक्षण रीडरच्या टेबलाजवळ बसून दफ्तरामध्ये करण्याचा अनुभव होता. पण जज्जमहाशयांनी माझ्यावर, माझ्या दानतीवर, माझ्या हेतूविषयी अविश्वास दाखविण्याचा तो एक आविष्कार होता असे माझ्या मनाने घेतले. मी ग्वाल्हेरला असतो तर, अशा वागणुकीबद्दल तेथल्या तेथे आक्षेप घेतला असता. पण मी दिल्ली येथे लाल किल्ल्यातील कोर्टात, एका खास आय. सी. एस. अधिकाऱ्यासमोर त्याच्या कक्षेमध्ये होतो. तेथे रागवारागवी करून माझेच नुकसान

होणार होते. अशा विचाराने मी स्वतःवर आवर घातला व बाह्यतः शांत चेहऱ्याने, संथ हालचालीने मी ते निरीक्षण संपविले. पण असे करतानाही माझी चीड दाखविल्याशिवाय मला राहवेना. म्हणून मी जज्जमहोदयांच्या टेबलाशी बसताच कोटाच्या खिशातील शाईचे फाऊंटनपेन–झरणी–त्यांच्यासमोर टेबलावर काढून ठेवले. हात, हातरुमालाने पुसून घेतले; एक पेन्सिल फक्त जवळ ठेवली. कबुलीजबाबाचा एकेक कागद हातात घेऊन तो वाचायचा व त्यावेळी हातातली शिशपेन्सिल टेबलावर ठेवायची. टिपणे लिहून घेताना जबाबाचा कागद टेबलावर ठेवायचा ! त्याविषयी माझ्या दृष्टीने उपयुक्त मुद्द्यांवर काही टिपणे लिहून घ्यावयाची ती संक्षेपाने घेतली. कबुलीजबाबाची शब्दशः प्रत उतरवून घेणे नियमाप्रमाणे करता येत नव्हते, म्हणून काही विशेष वाक्ये तेवढीच लिहून घेतली. लिहिताना जबाबाचा कागद टेबलावर ठेवायचा–वाचताना शिसपेन्सिल टेबलावर ठेवायची ! असे करत साधारण तासाभरात ते निरीक्षण संपवले व सर्व पानें गोळा करून अनुक्रमाने पडताळून पाहिल्याचे दाखवून जज्जमहोदयांच्या हातात मी उभे राहून दिली व लवून नमस्कार केला. त्यांच्याशी एक अक्षर बोललो नाही. कबुलीजबाबाचे ते कागद हातात घेताना जज्जमहाशयांनी ताठर, लाल चेहऱ्याने ' थँक यू ' म्हटले नि मी बाहेर निघून आलो. भवनात येऊन मी माझ्या आपत्तीविषयीचा अर्ज तयार केला व श्री. भोपटकरांना दाखविला व त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दुरुस्त्या करून टाईप करवून तो अर्ज १२ जुलैला कोर्टात दाखल केला. कबुलीजबाबाविरुद्ध दिलेला हा अर्ज, मी डॉक्टर परचुरे यांच्या हस्ताक्षरासहित दाखल केला होता. त्यात कबुलीजबाब राजीखुशीने दिलेला नाही, जेथे तो लिहिला गेल्याचे सांगण्यात येते तेथे लिहावयाला मॅजिस्ट्रेटमहोदयांना तसे करण्याचा अधिकार नव्हता आणि कबुलीजबाब अभियुक्ताला दिलेल्या धमक्यांमुळे द्यावा लागला व असा कबुलीजबाब कोर्टामध्ये ग्राह्य होण्याजोगा नाही व तो अभियुक्ताविरुद्ध पुरावा म्हणून विश्वास ठेवण्यायोग्यतेचा नाही वगैरे आपत्ती लिहिल्या होत्या. त्यांवर जज्जमहोदयांनी अशी आज्ञा लिहिली की, ' अभियुक्तास त्याने आक्षेप घेतली ती सर्व परिस्थिती व मुद्दे अभियोगीपक्षाच्या साक्षीदारांच्या कूटपरीक्षणाने किंवा अन्य रीतीने कोर्टासमोर दाखविता येतील की, ज्यामुळे त्याच्याविरुद्ध कबुलीजबाबाची अग्राह्यता प्रकट होईल. '

माझ्या कबुलीजबाबासंबंधीच्या अर्जासंबंधी बोलताना श्री. भोपटकरांनी मला असे बजावले होते की, ' मी कोणत्याही रीतीने बचावपक्षाचा साक्षीदार उभा करण्याची वेळ येऊ देऊ नये, कारण आपल्याला अभियोगपक्षाच्या पुराव्यावर त्यांच्या उहापोहात्मक भाषणाला उत्तर देण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. ' याचा अर्थ असा झाला की, ज्या सत्याला सिद्ध करण्याचा व ज्या असत्याला उघडे करण्याचा माझा प्रयत्न होता, ते आणखी एका रीतीने अवघड झाले. जज्जमहोदयांनी ज्या ' अन्य रीतीने ' आपला बचावपक्ष सिद्ध करण्याची मला संधी दिली होती, ती मजपासून हिरावून घेतली गेली. मला आपला बचावपक्ष केवळ अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या कूट-परीक्षणामधूनच सिद्ध करायचा होता. म्हणजे अभियोगपक्षाचे साक्षीदार कसे बिन भरवशाचे व विश्वास न ठेवण्यासारखे आहेत हेच दाखवायचे ! कबुलीजबाबामुळे आधीच अवघड असलेले बचावपक्षाचे काम, या फतव्यामुळे आणखीच अवघड झाले! या विचाराने मी दडपून गेलो होतो.

मी माझ्या वर वर्णन केलेल्या उद्योगात गढून गेलो असता व माझ्यापुढे उभ्या ठाकलेल्या कामाच्या अवघडपणाने दडपून गेलो असतानाच, ९ जुलैपासून अभियोगपक्षाने त्यांचे साक्षीदार क्रमांक ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३६ व ३७ हे परीक्षणासाठी उभे केले व एक साक्षीदार क्र. ३८, १२ जुलैला उभा केला. हे साक्षीदार या अभियोगातील ३० जानेवारीच्या, म्हणजे महात्मा गांधींची ज्या दिवशी पिस्तुलाच्या गोळ्या घालून हत्या झाली त्यावेळचे व संबंधांचे साक्षीदार होते. या मालिकेतला पहिला साक्षीदार क्र. ३१ अमरनाथ असिस्टंट सबइन्स्पेक्टर पोलिस, पोलिस स्टेशन तुघलक रोडचा होता. त्याला उभा करून त्याचे परीक्षण संपताच नथूराम गोडसेचे वकील श्री. ओक उभे राहिले. मला वाटले, ते कूटपरीक्षण करणार; पण त्यांनी कोर्टाला सांगितले की, त्यांच्या पक्षकाराने त्यांना ह्या साक्षीदाराचे कूटपरीक्षण करायचे नाही असे सांगितले आहे. ते ऐकून जज्ज आत्मचरणजींनी नथूरामकडे बघून त्यालाही विचारले. त्याने तशीच इच्छा बोलून दाखवल्यावर जज्जमहोदयांनी साक्षीदाराच्या कथनाखाली एक टिप्पणी लिहिली ती अशी, टिप्पणी : ' श्री. व्ही. व्ही. ओक सांगतात की, त्यांच्या पक्षकाराची बिर्ला हाऊसमधील ३० जानेवारी १९४८ रोजी झालेल्या घटनेसंबंधीच्या साक्षीदारांना काहीएक प्रश्न विचारावेत अशी इच्छा नाही. टिप्पणी: नथूराम वि. गोडसे सांगतो की, त्याची अशी इच्छा आहे की, बिर्ला हाऊसमधील ३० जानेवारी १९४८ रोजी झालेल्या घटनेच्या साक्षीदारांना काहीएक प्रश्न विचारू नयेत. कूटपरीक्षण काही नाही. ' यानंतर आलेला त्या दिवसाचा प्रत्येक साक्षीदार आपले कथन देऊन ' कूटपरीक्षण काही नाही ' अशी टिप्पणी मिळून परत गेला. तसेच १२ जुलै १९४८ ला आलेल्या साक्षीदार क्रमांक३८चीही कूटपरीक्षण काही नाही अशी टिप्पणी लागून सुटका झाली ! तेथे असलेल्या सगळ्या वकील मंडळींना आणि श्रोतृवर्गाला हे समजण्यास वेळ लागला नाही की, नथूरामचे विधिलिखित अटळ आहे, असा शिक्का अभियोगपक्षाच्या इच्छेप्रमाणे नाही, जज्जमहोदयांच्या निर्णयाप्रमाणे नाही, पण स्वतः नथूरामने ठरविल्याप्रमाणे लागला आहे ! दुपारच्या विश्रांतीकाळात जमलेल्या प्रेक्षकांपैकी बरेचसे लोक चिंतायुक्त चेहऱ्याने आमच्याजवळ आले नि त्यांनी आम्हाला विचारले की, ' आता काय होईल ? काय ? नथूराम फाशी जाईल? ' कोणी काही म्हणे. कोणी आम्हाला दोष देई. काहीजण डोळ्यांत पाणी येऊन नथूरामकडे बघत. आम्ही त्या मंडळींना काय उत्तर देऊ शकत होतो ?

१० व ११ जुलैच्या साप्ताहिक सुटीमध्ये जरी मी स्वतःच्या

## आता काय होईल ? काय ? नथूराम फाशी जाईल ?

कामाच्या काळजीत होतो, तरी एकसारख नथूरामविषयी माझे मन विचार करी. नथूरामचे वागणे पाहून माझ्या मनावर फार परिणाम झाला. नथूराम हत्यारा होता. महात्मा गांधींसारख्या जगत्वंद्य पुरुषाचा बळी घेण्याचा निर्घृण निर्णय त्याने घेऊन त्याप्रमाणे केले होते हे त्रिवार खरे. नथूरामचा निर्णय किंवा कृत्य सर्वस्वी चुकीचे असले, तरी नथूराम मनाने स्वतःशी कोणत्याही तऱ्हेची प्रतारणा करीत नाही, तसा विचारही त्याच्या मनात येत नाही, एवढेच नव्हे तर त्याचे परिणाम भोगायला स्वेच्छेने, शांत मनाने तयार आहे हे बघून मला वकिलाला भारावल्यासारखे झाले !

असेच काही विचार माझ्या मनात १२ तारखेला दुपारपर्यंत, साक्षीदार क्रमांक ३८ 'कूटपरीक्षण काही नाही' अशी टिप्पणी घेऊन परत जात असता घोळत होते, तोच पाहतो तो साक्षीदाराच्या पिंजऱ्यात ग्वाल्हेरचा जगदीश गोयल नावाचा तरुण कथन देण्यासाठी येऊन उभा राहिला. त्याच्याकडे बघताच मी खडबडून जागा झालो. दिनांक २८ जानेवारी ४८ रोजी नथूराम ग्वाल्हेरला आला असता, त्याने बाजारात एक पिस्तुल मिळवले अशी अभियोगपक्षाची कहाणी होती, त्या संदर्भात जगदीश गोयल त्या हत्याऱ्याच्या पिस्तुलाविषयी कथन देणार होता. अभियोगपक्षाने तीस जानेवारीच्या संदर्भातले साक्षीदार चालले असताना, मध्येच एकाएकी ग्वाल्हेरच्या साक्षीदाराला आणून उभे करावे, याचा एकप्रकारे मला रागच आला. जगदीश गोयलचे कूटपरीक्षण करायची सर्व तयारी मी करून ठेवली होती तरी राग आला व आपण याला आक्षेप घ्यावा असेही वाटले. पण शेवटी शांत होऊन साक्षीदाराकडे बघू लागलो. माझ्या स्वतःच्या कामाची जबाबदारी मजवर होतीच. ती मी विसरू शकत नव्हतो. मी चटकन् श्री. डांगे यांना साक्षीदाराचे कथन उतरवून घेण्यास विनवले व मी साक्षीदाराकडे एकाग्र मनाने बघू लागलो. त्याचा चेहरा साधा, गरीब, वैश्य तरुणाचा. पण त्याच्या चेहऱ्यावरले भीतीचे सावट न्यायालयासमोर उभे राहिल्यावरदेखील गेले नाही, हे मला थोड्याच वेळात जाणवले. अॅडव्होकेट जनरल दफ्तरी त्याला प्रश्न विचारीत होते नि तो भीतियुक्त चेहऱ्याने पढविलेले उत्तर दिल्यासारखे इकडे तिकडे बघून उत्तर देत होता. पण माझी एकाग्र दृष्टी त्याच्यावर खिळली आहे हे त्यालाही जाणवायला लागले होतेसे मला दिसले व तो काही तरी न पढविलेलेही बोलण्याचा प्रयत्न करीत आहे असे मी पाहिले. डॉ. परचुऱ्यांचे नाव घेऊन त्यांच्याविषयी बोलताना, आमच्याकडे न बघता भीतियुक्त चेहऱ्याने दुसरीकडे बघत चाचरत तो उत्तर देत आहे, असे मला जाणवले नि मी लगेच त्याला प्रश्न विचारताना आपला आवाज स्थिर ठेवून पण कठोरपणा न दाखवता त्याला विचारायचे असे ठरवले. श्री. दफ्तरी व अभियोगपक्ष या साक्षीदाराला फार महत्त्व देत आहेत व म्हणूनच त्यांनी या अभियोगातली मुख्य घटना न्यायालयासमोर सिद्ध करताना, नथूरामच्या विरुद्ध साक्षीदार उभे करण्याच्या क्रमातच या साक्षीदाराला डॉ. परचुरे यांच्याविरुद्ध उभे केले. श्री. भोपटकरांनी मजजवळ पहिल्या दिवशी नथूराम नि आपटे यांच्याबरोबरच डॉ. परचुऱ्यांचे नाव घेतले ते उगीच नव्हते तर !

जगदीश गोयलचे मुख्य परीक्षण संपताच, अभियुक्त आपटेचे वकील श्री. मेंगळे हे उभे राहिले व त्यांनी साक्षीदाराला दोन-तीन प्रश्न विचारले नि ते खाली बसले ! मला आश्चर्य वाटले ते, या साक्षीदाराला आपटेकडून प्रश्न विचारले जावेत नि नथूरामकडून नाही ! याचा अर्थ काय ? पण त्यावर अधिक विचार करायला त्यावेळी सवड नव्हती. मी उभे राहून डॉ. परचुऱ्यांच्या बाजूने प्रश्न विचारायला सुरुवात केली. साक्षीदाराने आपल्या मुख्य कथनात नथूरामचे पिस्तूल पुराव्यातील वस्तू क्र. ३९ एक छोटेसे 'बरेटा' पिस्तूल हातात घेऊन 'मी दंडवतेला दिलेले हेच ते पिस्तूल' म्हणून ओळखले होते. मी स्वतःही ते पिस्तूल हातात घेऊन बघितले होते. ते नवीन कोरे करकरीत असे शस्त्र होते. त्यावरचा नंबर स्पष्ट दिसत होता. मी शांत मनाने उभे राहून जगदीशला प्रश्न विचारायला सुरुवात केली. लालकिल्ल्यातील न्यायालयात महात्मा गांधी खून खटल्यात, सर्वांचे डोळे मजवर खिळले असताना, साक्षीदाराचे कूट-परीक्षण (क्रॉस) करण्याचा माझा तो पहिलाच दिवस होता. मी वकील म्हणून येथे काय करू शकेन हे साऱ्या जगाला, मलाही बघायचे होते. जज्जमहोदयही माझ्याकडे लक्षपूर्वक पाहत आहेत हे मला जाणवले ! सर्वांची तोवरची समजूत अशी की, खादीचे कपडे व टोपी घालून, धोतर नेसून कोर्टात येणारा ग्वाल्हेरचा हा एक देशी भटजी वकील ! तेथे लालकिल्ल्याच्या कोर्टात आलेल्या बऱ्याचशा सूटाबुटातल्या वकीलमंडळींची नि पोलीस अधिकाऱ्यांची–विशेषतः मुंबईहून आलेल्या मंडळींची–अशीच समजूत होती. तसे एक-दोघा पोलिस अधिकाऱ्यांनी म्हटलेले मी ऐकलेही होते. असो. जगदीश गोयल साक्षीदार क्रमांक ३९ हा २४ वर्षांचा तरुण मॅट्रिकसुद्धा झालेला नव्हता. मला त्याच्याकडून दोन मुद्यांवर विशेष स्पष्टीकरण करून घ्यायचे होते. एक तर वस्तू क्र. ३९ हे पिस्तूल त्याचे नव्हते. अभियोगपक्षाने दिलेल्या कागदांवरून एका नाथीलाल जैन, राहणार अम्बाह, जिल्हा मुरेना, ग्वाल्हेर संस्थान याचे असावे. दुसरा मुद्दा असा की, ज्या दिवशी एप्रिल १९४८ ला जगदीश गोयलला पोलिसांनी झाशी येथे हत्येच्या आरोपाखाली म्हणून पकडले त्या दिवसापासून जगदीश हा पोलिसांच्या कैदेतच होता. अगदी तो कोर्टासमोर उभा राहिला त्या दिवशीही ! त्याला पोलिसांनी झाशी, मुंबई येथे कैदेत ठेवले व आताही लालकिल्ल्यात कैदेत ठेवले होते. जगदीशने स्वतःच्या कथनात हे सांगितले होते की, दि. २८ जानेवारी १९४८ ला त्याची व डॉ. परचुऱ्यांची गाठ पडलीच नव्हती आणि त्याने आपल्याजवळचे पिस्तूल गंगाधर दंडवतेला विकले–दिले होते. माझी खात्री होती की, या अभियोगात गंगाधर दंडवते साक्षीदार म्हणून येणार नव्हता की पकडलाही जात नव्हता !

सुरुवातीसच जगदीशला मी विचारून घेतले की, अम्बाहच्या नाथीलाल जैनला तो ओळखत आहे. पण याबद्दल मी आणखी काही प्रश्न विचारले नाहीत. त्यानंतर लगेच मी जगदीशला, तो झाशीला इंडियन पिनल कोडाच्या धारा ३०२ कलमाखाली कसा पकडला गेला व तेथे काही दिवस राहून नंतर त्याला मुंबईला नेले व तेथे वरळी येथे पोलिसकैदेत ठेवले व आता दिल्ली येथे आणले आहे; या कैदेच्या दिवसांत त्याला एकदाही मॅजिस्ट्रेटसमोर उभे केलेले नाही, असे विचारून जगदीशला मी पुढे, डॉ. परचुऱ्यांबद्दल त्याला काय माहीत आहे हे विचारले. माझ्या लक्षात यायला वेळ लागला नाही की, जगदीश माझ्या प्रश्नांना मोकळेपणाने उत्तर देत आहे.

त्याने कबूल केले की, तो १ फब्रुवारीला ग्वाल्हेरहून पळून गेला होता. त्याने डॉ. परचुरे आणि हिंदूसभाई मंडळींनी दि. २४ जानेवारी १९४८ ला ग्वाल्हेरच्या सचिवालयासमोर नवीन काँग्रेस मिनिस्टरांविरुद्ध निदर्शन केले होते. त्याने हेही कबूल केले की, डॉ. परचुरे यांचे राजकारण ग्वाल्हेरपुरतेच होते. ग्वाल्हेर संस्थानाबाहेरच्या राजकारणाशी त्यांचा संबंध नव्हता. त्याने हेही कबूल केले की, त्याच्याजवळ वस्तू क्र. ३९ पिस्तुलाचे कसलेही कागदपत्र ते त्याने विकत घेतल्याबद्दल, त्याचे लायसेन्स घेतल्याबद्दल, त्या पिस्तुलाचे लायसेन्स कोणाजवळ आहे याबद्दल, त्याला काही माहीत नव्हते. तसेच हे पिस्तुल आपल्याजवळ असल्याचे त्याने कुणाला सांगितलेही नव्हते. तो नथूराम गोडसे याला, पूर्वीपासून पुण्याचा एडिटर व कार्यकर्ता म्हणून ओळखत होता. तो ग्वाल्हेरच्या वॉरफ्रॉफिट टॅक्सच्या अस्थाई कार्यालयात अस्थाई कर्मचारी होता. दि. २८ जानेवारीला त्याची व नथूरामची भेट किंवा बोलणे असे झाले नव्हते. येथपर्यंत मी जी माहिती जगदीशच्या मुखाने कोर्टाच्या नजरेस आणली, त्यावरून कोणतेही न्यायाधीश उघडया डोळयांनी जगदीश गोयलच्या साक्षीवर विश्वास ठेवणार नाहीत हे स्पष्ट होते. ज्याला पोलिसांनी हत्येच्या अपराधाखाली पकडूनदेखील विनापरवाना कैदेत ठेवले आहे, ज्याच्याजवळ कथित पिस्तुलाच्या मालकी किंवा परवान्याचे कोणतेही कागदपत्र नाहीत, ज्याने अभियुक्त नथूराम गोडसे किंवा डॉ. परचुरे यांच्याशी त्या पिस्तुलाबाबत समक्ष असे बोलणे कधीच केलेले नाही आणि जो डॉ. परचुऱ्यांविषयी, त्यांच्या राजकारणाविषयी जी माहिती सांगत होता, त्यावरून डॉक्टरांनी काही आक्षेपजनकवर्तन केल्याचे मुळीच दिसत नव्हते. त्या साक्षीदारावर आधार ठेवायला, डॉ. परचुऱ्यांविरुद्ध कोणताही आरोप सिद्ध मानायला जागा होती कुठे ! मी साक्षीदाराचे कूटपरीक्षण संपविल्यावर श्री. दफ्तरींनी साक्षीदाराला खुलाशाचे काही प्रश्न विचारले नाहीत आणि जगदीश गोयलला कोर्टातून जायला सुटी मिळाली !

जगदीश गोयलच्या साक्षीमुळे कोर्टामध्ये एकदम धक्का बसल्यासारखे दिसले. अभियोगपक्षातील वकीलमंडळी एकमेकांकडे कपाळाला आठया घालीत गंभीर चेहऱ्याने बघत आहेत, पोलिस अधिकाऱ्यांची धावपळ सुरू झाली आहे हे मी पाहिले ! विशेषत: मुंबईचे पोलिस अधिकारी रागावलेले दिसले. जगदीश गोयलनंतर दुसरे काही—माझा संबंध नसलेले—साक्षीदार त्या दिवशी साक्ष द्यायला आले. दोन–तीन दिवसांनी मला कळले होते की, जगदीश गोयलला व नाथीलाल जैनलाही लाल किल्ल्यातील पोलिसांनी आपल्या प्रशस्त नि बळकट अधिकारांची ओळख देऊन लाल किल्ल्यातून परत पाठवले होते !

दुसऱ्या दिवशी अभियोगपक्षाचे साक्षीदार क्र. ४३ गरीबा टांगेवाला व क्र. ४४ जुम्मनखान टांगेवाला या दोघांचे कथन झाले. या साक्षीदारांद्वारा अभियोगाची कहाणी होती की, महात्मा गांधींची हत्या ज्या दिवशी झाली त्याच्या दोन किंवा तीन दिवस अगोदर रात्रीच्या वेळी ग्वाल्हेर स्टेशनवर दोन पाहुणे आले व त्यांना प्रथमश्रेणी प्रवाशांच्यासाठी असलेल्या प्रवेशद्वारापाशी गरीबा टांगेवाल्याने गाठले. त्या प्रवाशांनी आम्हाला डॉ. परचुऱ्यांच्या घरी जावयाचे आहे असे सांगितले. ते ऐकून 'मी तुम्हाला पोचवीन. मला डॉ. परचुरे माहीत आहेत. चला' असे म्हणून स्टेशनबाहेर आणून गरीबाने आपल्या टांग्यात बसविले. परंतु टांगा हाकायला सुरुवात करताच गरीबाच्या टांग्याच्या घोडयाचा पट्टा तुटला. म्हणून आपले प्रवासी त्याने जुम्मनखान टांगेवाल्याला दिले व जुम्मनखानने त्या दोघांना डॉ. परचुऱ्यांच्या घरी नेऊन सोडले. पुढे पोलिसांना हे कळल्यावर पोलिसांनी त्या दोघा टांगेवाल्यांना ते दोन प्रवासी ओळखण्यासाठी म्हणून जवळजवळ एक महिन्याने मुंबईस वरळी पोलिसांच्या नव्या मुख्य कार्यालयात नेले.तेथे काही दिवसांनी ओळख परेड झाली. त्यात गरीबाने व जुम्मनखानने अभियुक्त नथूराम व आपटे यांना ओळखले. माझा प्रथम विचार असा होता की, आपल्या कूटपरीक्षणाचा सारा भर, ओळख पटण्यासाठी पाहुण्यांना बघण्याची फारच थोडी संधी होती, शिवाय ते प्रवासी जानेवारी महिन्याच्या कडक थंडीच्या मोसमात भररात्री गरम ब्लँकेटे पांघरून, डोके-कान झाकून आलेले असणार—वगैरे गोष्टींवर द्यायचा. पण गरीबा टांगेवाल्याचे कथन ऐकताना त्याने ते दोन्ही प्रवासी ग्वाल्हेरला 'बम्बई एक्सप्रेस से आये थे' असे म्हटले ! ते ऐकताच एकदम मी सतर्क झालो व त्याचे कथन अधिक लक्षपूर्वक ऐकू लागलो. ग्वाल्हेर स्टेशनची त्यावेळची परिस्थिती माझ्या परिचयाची होतीच. त्यावेळी ग्वाल्हेर स्टेशनला एकच प्लॅटफॉर्म होता. रेल्वेरुळांवर पूल नव्हता. त्यामुळे दोन्ही बाजूने येणाऱ्या गाडया एकाच प्लॅटफॉर्मवर थांबत. दोन गाडया एकाच वेळी आल्यावर पहिली आलेली गाडी निघून जाईतोवर दुसरी गाडी बाजूच्या रुळांवर थांबे व पहिली गाडी निघून गेल्यावर मग दुसरी गाडी प्लॅटफॉर्मवर येई. तसेच ग्वाल्हेर स्टेशनवर रेल्वेचे हमाल किंवा टांगेवाले हे गाडयांना काय नावाने ओळखतात हेही मला परिचयाचे होते. ही मंडळी आताच्या मुंबई–अमृतसर एक्सप्रेसला बम्बई एक्सप्रेस म्हणत, मद्रासच्या दिल्लीच्या ग्रॅण्डट्रंक एक्सप्रेसला मद्रास एक्सप्रेस म्हणत.त्या दिवसांत रात्रीच्या वेळी ग्वाल्हेरला येणाऱ्या तीनच एक्सप्रेस गाडया होत्या. एक मुंबईच्या बाजूने येऊन दिल्लीला जाणारी त्यावेळची पठाणकोट एक्सप्रेस रात्रीच्या ११·३० ला येई. नंतर दिल्लीहून मद्रासला जाणारी ग्रॅण्डट्रंक एक्सप्रेस रात्री १२·१० ला येई व दिल्लीहून येऊन मुंबईला जाणारी पठाणकोट एक्सप्रेस पहाटे ४·०० वाजता येई. म्हणजे टांगेवाल्यांच्या शब्दांत रात्री 'दो बम्बई एक्सप्रेस और एक मद्रास एक्सप्रेस आती है.' ह्या माहितीच्या आधारावर मी काही करता येण्याजोगे असेल तर ते प्रथम करून पाहावे, म्हणून गरीबाला, टांगेवाले, प्रथमश्रेणी प्रवेशद्वाराजवळ गर्दी करून प्रवाशांना आपल्या टांग्यासाठी घेरण्याचा प्रयत्न करतात हे विचारले, ते त्याने कबूल केले. नंतर प्रथमश्रेणी प्रवेशद्वारातून गाडी कोणत्या दिशेने आली—मुंबईकडून की दिल्लीकडून हे सहज दिसते असे विचारले, तर तेही त्याने कबूल केले व मनाचा हिय्या करून मी त्याला तिसरा प्रश्न विचारला की, तू जे दोन प्रवासी घेरलेस ते कोणत्या बाजूने आले होते ? त्यावर त्याने ताबडतोब उत्तर दिले की, 'बम्बईके साईडसे.' झाले ! मी अभियोगपक्षाचा 'पहिला पत्ता काटला होता !' कारण अभियोगपक्षाची कहाणी होती की, नथूराम व आपटे २७–२८ जानेवारीच्या रात्री दिल्लीहून ग्वाल्हेरला आले होते ! साक्षीदाराचे हे उत्तर त्याच्याच शब्दांत कोर्टाच्या रेकॉर्डवर लिहिले जावे म्हणून मी जज्ज आत्मचरणजींना परोपरीने म्हटले, पण त्यांचा एकच हेका. त्यांनी

' अप ' नि ' डाऊन ' गाड्या असेही न लिहिता ' बॉम्बे-अमृतसर एक्सप्रेस ' असे लिहिले. त्यांचे म्हणणे, ' असे लिहिले म्हणजे मुंबईहून निघणारी व अमृतसरला पोचणारी डाऊन गाडी होते व अमृतसर–बॉम्बे एक्सप्रेस लिहिले म्हणजे अमृतसरहून निघणारी व मुंबईला जाणारी अप गाडी होते. मुंबई–अमृतसर मार्गावरील सेंट्रल रेल्वेच्या गाड्यांचे हे वर्णन ' जरुरीपुरते ' आहे. न साक्षीदाराचे शब्द व अप किंवा डाऊन हे वर्णन लिहिण्याची जरुरी आहे. ' मी जास्त आग्रह न करता गप्प बसलो व साक्षीदाराला पुढले प्रश्न विचारले.- गरीबाने सांगितले की, गांधीजींचा ' कत्तल ' (हत्त्याला उर्दू शब्द) झाल्याच्या काही दिवसांनंतर एके दिवशी पहाटे ' बम्बई एक्सप्रेसने ' म्हणजे दिल्लीकडून येणाऱ्या अमृतसर–बॉम्बे एक्सप्रेस गाडीने ग्वाल्हेरचे मंडलीकसाहेब सी. आय. डी. इन्स्पेक्टर ग्वाल्हेरला उतरले. त्यांना घेऊन त्याने त्यांच्या घरापर्यंत पोचवले. टांग्यामध्ये बोलणे चालले असताना मंडलीकांना त्याने सांगितले की, ' गांधीजीके कत्तलके कुछ दिन पहले एक दिन रातको डॉ. परचुरेसाहबके यहा जानेके लिये दो मेहमान आये थे. मैंने उनकी सवारी ली थी ' (गांधीजींच्या हत्त्येच्या काही दिवसांपूर्वीच्या एके रात्री डॉ. परचुऱ्यांकडे जायला दोन पाहुणे उतरले होते व त्यांना मी माझ्या टांग्यात घेतले होते). पण माझे काम झाले होते ! साक्षीदार जुम्मनखानाला मी फारसे प्रश्न न विचारता थोडक्यात विचारले होते. पोलिसयंत्रणेला असा साक्षीदार मिळाल्यावर चौकशीची चक्रे नेहमीप्रमाणे फिरली होती. एका टांगे-वाल्याचे दोन टांगेवाले साक्षीदार झाले.

गरीब टांगेवाल्याच्या पायांवर सतत प्रवासाचे व वाहनसौख्याचे नक्षत्र पडूनही गावातल्या गावातच हे सौख्य प्रतिदिन भोगायचे नशिबात लिहिल्या गेलेल्या टांगेवाल्यांना फुकटात मुंबईची वारी करायला व नव्या पोलिस सी. आय. डी. हेडक्वार्टरमधला पाहुणचार घ्यायला संधी मिळाली व ओळख-परेडचे आन्हिकही एक महिन्या-नंतर संपन्न झाले. पण वाचक ! पोलिसांना सत्य लपवता आले नाही. साक्षीदाराच्या तोंडून ते ' सत्य ' आपोआप बाहेर उजेडात आले होते. त्या दिवसांत डॉक्टरांच्या घरी खरोखरीचे दोन पाहुणे मुंबईहून आले होते. ते होते मुंबईचे डॉ. फडके व त्यांचे सहप्रवासी डॉ. शेंडे. आणि आश्चर्याची गोष्ट अशी होती की, त्या दोघांचे तोंडवळे नथूराम नि आपटे यांच्या तोंडवळ्याला बरेचसे जुळणारे होते. घोटाळ्याची गोष्ट एवढीच होती की, ते पाहुणे गांधीहत्त्येच्या ३–४ दिवस अगोदर आले होते व त्यांपैकी एकालाही बचावपक्षाच्या साक्षीत आणायचे नाही अशा फतव्याने मी बांधलेला होतो. म्हणून शेवटी श्री. जे. डी. नगरवाला, स्पेशल कमिशनर पोलिस मुंबई चीफ इन्चार्ज महात्मा गांधी खून चौकशी, जेव्हा साक्षीला आले तेव्हा त्यांना मी एवढाच प्रश्न विचारला होता की, तुम्ही तुमच्या चौकशीत मुंबईचे डॉ. शेंडे यांची जबानी घेतलीत का व त्यांचा चेहरा एका अभियुक्ताच्या तोंडवळ्याशी मिळताजुळता आहे का याची चौकशी केली का ? त्यावर त्यांनी ठसक्यात उत्तर दिले होते की, ' डॉ. शेंडे यांचा काय संबंध ? व मी त्यांची चेहरेपट्टीची चौकशी कशाला करू ? ' ते बिचारे त्यावेळी हे विसरले होते की, पोलिसांनी चौकशीमध्ये मुंबईचे डॉक्टर फडके यांची जबानी घेतली होती व त्या जबानीत डॉ. फडक्यांनी सांगितले होते की, त्यांच्याबरोबर डॉ. शेंडेही ग्वाल्हेरला आले होते व डॉ. फडक्यांचे नाव पोलिसांच्या साक्षीदार-सूचीमध्ये होतेही. पण अभियोगपक्षाने डॉ. फडक्यांना आपल्या साक्षीत आणले नाही. श्री. भोपटकरांच्या फतव्याने बांधलेला मी व पोलिसांच्या जबानीने बांधलेले डॉ. फडके ! त्या डॉ. फडक्यांना मी बचावपक्षाचा साक्षीदार म्हणून त्या १९४८ च्या दिवसांत लाल किल्ल्यात व महात्मा गांधींच्या खून-खटल्यात कसे आणू ? नि ' सत्य ' कसे उजेडात आणू ? म्हणून मी ' वकील ' तळमळून म्हणतो की, सत्य हे फार एकाकी असते नि सत्य न्यायालयात सिद्ध करणे महाकठीण काम असते ! अशा वेळी ईश्वरच मदतीला धावला पाहिजे ! एरवी सत्यालाच विधिवत् गळफास लागतो.

¤

दोन टांगेवाल्यांचे कथन झाल्यावर दुसऱ्या दिवशी म्हणजे १४ जुलै १९४८ ला अभियोगपक्षाने त्यांचा साक्षीदार क्रमांक ४९ म्हणून ग्वाल्हेरचे मॅजिस्ट्रेट श्री. सय्यद मंज़रअली यांना साक्षीदारांच्या कठ-ड्यात उभे केले. त्यांनी कोर्टाला सांगितले की, त्यांनी फेब्रुआरी १९४८ मध्ये एके दिवशी ग्वाल्हेरला डॉ. परचुऱ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या घराच्या चौकामधून बंदुकीच्या दारूच्या गोळीचे एक रिकामे खोके मिळविल्याचे, चौकाच्या बाजूच्या भितीवर एक गोळी मारल्याची निशाणी पाहिल्याचे व त्याचा त्यांनी साक्षीदार बोलावून विधिवत पंचनामा केल्याचे सांगितले. डॉ. परचुऱ्यांच्या घरी त्यांना अभि-युक्त आपटेने त्या चौकाकडे नेले व तेथे शोध करता तेथे एक गोळी उडवल्याचे दोन पुरावे मिळाले होते. हा साक्षीदार साधाभोळा, पण मुसलमान मनुष्य होता. या लोकांची साधीशी गोष्ट, बडेजावी पद्ध-तीने रंगवून करायची–सांगायची होस प्रसिद्ध आहे. स्वतःच्या चंद्र-मौळी खोपटाला ' मेरा दौलतखाना ' म्हणणाऱ्यांपैकी ते होते. माझ्या कूटपरीक्षणात दोन मुख्य गोष्टी त्यांनी कबूल केल्या होत्या. एक म्हणजे त्या बंदुकीच्या गोळीच्या रिकाम्या खोक्याचे वर्णण पंचनाम्या-साठी लिहायला म्हणून त्यांनी एका सोनाराला बोलावून रत्ती माश्याच्या मापाने त्या गोळीचे वजन करवले होते. बंदुकीच्या गोळीच्या पितळी खोक्यावर गोळी व्यासाचा जो शिक्का असतो ते पाहिले नव्हते. आणि दुसरे म्हणजे ही ' बरामदगी ' (सर्चबद्दल ग्वाल्हेरचा उर्दू शब्द) संस्थानच्या एक्स्ट्रॉ डायटिंग अधिकाऱ्यांच्या परवानगी शिवा-यच मुंबई पोलिसांच्या प्रेरणेने केली होती. त्यावेळी देशी संस्थानां-मध्ये ब्रिटिश इंडियातल्या कोणत्याही गुन्ह्याची चौकशी करण्यापूर्वी ग्वाल्हेरच्या चौकशी अधिकाऱ्याची मदत घ्यायला संस्थानच्या एक्स्ट्रॉ डायटिंग ॲथॉरिटीची पूर्व परवानगी घ्यावी लागत असे ! महात्मा गांधींच्या खून खटल्यात कशाला हवी कायदापालनाची सक्ती, अशीच त्या ग्वाल्हेरच्या मॅजिस्ट्रेट महोदयांची मुंबई पोलीस अधि-काऱ्यांनी समजूत करून दिली असावी. असो. मॅजिस्ट्रेट महोदयांनी जेव्हा बंदुकीच्या गोळीचे सोनाराच्या ताजव्यात रत्ती माश्याच्या मापात वजन करण्याविषयीचे वर्णन सांगितले तेव्हा आमच्या बचाव, पक्षाच्या विनोदी वकिलांनी उत्स्फूर्त उद्गार काढला, ' शाब्बास ! ' (ओह ! ग्रेट ! ) त्या गंभीर वातावरणात सगळीकडे हशा पिकला व साक्षीदाराच्या काम करण्याच्या पद्धतीने अवघडून गेलेले ॲडव्होकेट जनरल, आमच्याकडे किंचित रागाने–नाराजीने–पाहू लागले ! पण ' बरामदगी 'च्या संदर्भात ह्याहीपेक्षा जास्त विनोदाची बाब पुढल्या साक्षीदाराच्या तोंडून द्यायची होती !

मॅजिस्ट्रेट महोदयानंतर आला अभियोगपक्षाचा साक्षीदार क्रमांक ५० मधुकर काळे! श्री. दफ्तरींनी ज्या साक्षीदाराच्या पुराव्यावर फार भर दिला होता तो साक्षीदार. ह्या साक्षीदाराचे कथन दुपारच्या विश्रांती सुटीनंतर सुरू झाले. आता सुरू होऊन मला सावकाश कूटपरीक्षण करायला वेळ मिळेल की नाही, याची मला काळजी पडली होती. ह्या साक्षीदार सारा बावीस वर्षांचा, सुदृढ बांध्याचा, मावळचा पण तरतरीत चेहऱ्याचा व सतेज मोठ्या डोळ्यांचा, कल्ले ठेवलेला महाराष्ट्रीय तरुण! त्याने सुरुवातीलाच कोर्टाला विनविले की, मला इंग्रजी समजते, पण मी हिंदीत उत्तरे देईन. सगळीजणं व जज्ज-महोदयही त्याच्याकडे आश्चर्याने बघू लागले होते. त्याने आपल्या मुख्य साक्षीत कोर्टाला सांगितले की, २८ जानेवारी १९४८ ला दुपारी साडेबारा-एकच्या सुमारास त्याने आपल्या ऑफिसातल्या 'वरिष्ठ अधिकारीकी अनुमति' घेऊन आपल्या 'व्यक्तिगत कार्य के लिये' थोड्या वेळाची सुटी घेतली होती. त्याला शहरातल्या बँकेमध्ये पैसे काढायला जायचे होते. बँकेकडे जाताना वाटेत त्याने एकाएकी आपली पावले डॉ. परचुऱ्यांच्या घराकडे वळविली व तो एकदम डॉ. परचुऱ्यांच्या घरात शिरला. दिवाणखान्यात जाताच त्याला तेथे डॉक्टरांच्याबरोबर बोलत बसलेले दोन पाहुणे दिसले. त्यावेळी त्या पाहुण्यांची नावे त्याला माहीत नव्हती. तेथे गंगाधर दंडवतेही बसला होता. दोघा पाहुण्यांच्या हातात एक रिव्हॉल्व्हर होता आणि त्याचा घोडा दाबून पाहताना त्या दोघा पाहुण्यांना ते जमत नव्हते. गंगाधर दंडवते म्हणत होता की, 'रिव्हॉल्व्हर चांगल्यापैकी चालते. मी दाखवतो तुम्हाला,' असे म्हणून त्याने रिव्हॉल्व्हरचा घोडा सहजरीतीने दाबून दाखवला. पाहुण्याने म्हटले, 'पण याने गोळी उडवता येते का?' तर तो म्हणाला की, 'तेही मी दाखवतो, चला.' असे म्हणून गंगाधर दंडवतेने त्या दोघा पाहुण्यांना डॉ. परचुऱ्यांच्या घराच्या मागच्या चौकात नेले. तेथे डॉ. परचुरे त्यांच्याबरोबर आले नव्हते. चौकात जाऊन दंडवतेने त्या रिव्हॉल्व्हरमध्ये एक गोळी लावली. साक्षीदार सफाईने व श्री. दफ्तरींच्याकडे बघत उत्तरे देत होता. आता हा, श्री. दफ्तरींच्या प्रश्नांच्या उत्तरात पुढे काय सांगतो, ह्याकडे माझे लक्ष लागले व मी कान टवकारून व विस्फारलेल्या डोळ्यांनी त्याच्याकडे बघत होतो. पण त्याने अगदी सहजरीतीने सांगितले की, दंडवतेने 'आकाश के तरफ लक्ष्य करके गोली चलाई!' त्याच्या-समोर एकदाच हा प्रयोग झाला. त्यानंतर त्या पाहुण्यांनी पुन्हा रिव्हॉल्व्हरचा घोडा दाबण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना तो पुनः नीट दाबता आला नाही. परत दिवाणखान्यात आल्यावर दंडवते डॉक्टरांना म्हणाला की, या मंडळींना रिव्हॉल्व्हर वापरणे जड जाते. तुम्ही आपले पिस्तुल यांना का नाही देत? त्यावर डॉक्टर म्हणाले की, 'मी मूर्ख नाही, माझे लायसेन्स असलेले पिस्तुल यांना कुणालाही द्यायला!' वगैरे. साक्षीदाराचे मुख्य कथन संपले नि कूटपरीक्षणा-करता आपटेचे वकील श्री. मेंगळे उभे राहिले. श्री. मेंगळे यांना साक्षीदाराचे तालीमबाज शरीर, कल्ले ठेवलेला चेहरा, इंग्रजी न बोलता हिंदी बोलण्याची इच्छा वगैरे बघून या मनुष्याचे शिक्षण विशेष झाले नसावे असे बहुतेक वाटले. म्हणून साक्षीदाराचे अडाणी-पण दाखविण्यासाठी त्यांनी साक्षीदाराला त्याच्या स्वतःच्याबद्दल प्रश्न विचारायला सुरुवात केली व एक दोन प्रश्न विचारून विचारले की, तू कितवीपर्यंत शिकला आहेस? त्यावर साक्षीदाराने मोकळ्या मनाने व सहज असे उत्तर दिले की, 'मैं आग्रा विद्यापीठ का स्नातक हूँ!' जज्ज आत्मचरणजींनी स्मित करीत नोंदवले की, 'आय ॲम ए ग्रॅज्युएट ऑफ आग्रा युनिव्हर्सिटी!' साक्षीदाराचे हे उत्तर ऐकताच सगळ्या श्रोतृवर्गाच्या चेहऱ्यांवरही स्मिताची लकेर पसरली व श्री. मेंगळे एकदम खाली बसले. दुसरे कोणी कूटपरीक्षण करायला उभे राहिले नाहीत, म्हणून मी उभा राहिलो. मी घड्याळाकडे बघितले तर जवळ जवळ चाळीस मिनिटे उरली होती वेळ संपायला. म्हणून घाई न करता सावकाश प्रश्न विचारायचे असे मी ठरविले व कूटपरीक्षणाला सुरुवात केली. माझ्या प्रश्नांना उत्तर देताना साक्षीदाराने सांगितले की, त्याचे वडील संस्थानची सरकारी नोकरी करीत होते. साक्षीदाराच्या लहानपणीच त्याचे वडील वारले होते. पुढे महाराजांनी त्याच्या आईला 'हानिपूर्तीका पेन्शन' (कॉम्पेन्सेटरी पेन्शन्) चालू केले होते. त्याच्या मोठ्या बहिणीला 'विद्या अनुवृत्ती' (स्कॉलरशिप) दिली होती. त्याला शिकायला अशीच 'साहाय्यता' केली होती. तो 'स्नातक' (ग्रॅज्युएट) झाल्यावर त्याला महाराजांनी 'सचिवालयात' नोकरीही दिली. तेच काम तो सध्या करीत आहे. त्याची आई 'पक्की कांगरेसी' आहे. तो विद्यार्थिदशेतच डॉक्टरांच्या 'हिंदुराष्ट्र सेने'त 'भरती' झाला होता. राष्ट्रीय स्वयंसेवक दलात गेला नव्हता. पण डॉक्टरांनी सेनेमध्ये त्याला काही अधिकारपद दिले नाही म्हणून तो नाराज होता. पुढे सरकारी नोकरीत शिरल्या-वर डॉक्टरांनी साक्षीदाराला सेनेमध्ये व डॉक्टरांच्या घरी यायला बंदी केली होती. ती बंदी २८ जानेवारीलाही होती. अशी 'बंदी' असतानादेखील तो २८ जानेवारीला दुपारी ऑफिसच्या वेळेत डॉक्टरांच्या घरात शिरला होता व डॉक्टरांच्या पाहुण्यांच्या संभाषणात तो 'सम्मीलित' झाला होता! तू तेथे कशाकरता गेला होतास म्हणून विचारले, तर त्याने उत्तर दिले की, २४ जानेवारीला नव्या कांग्रेसी मिनिस्टरांच्या विरुद्ध डॉक्टरांनी फार 'जोरदार निदर्शन' केले होते. त्यानंतर 'आता पुढे डॉक्टरांचा काय करायचा विचार आहे' असे विचारायला म्हणून तो डॉक्टरांच्या घरात शिरला होता. डॉक्टरांच्या राजकीय हालचाली व कार्यक्रमाबद्दल विचारलेल्या माझ्या प्रश्नांना त्याने उत्तर दिले की, 'डॉक्टरसाहब अपने राजनीतीमें कभी भी अपनी कोई भी चाल हिंसाके सीमा तक नही ले जाते थे!' त्याने कबूल केले की, ग्वाल्हेरमध्ये राष्ट्रीय स्वयं-सेवक संघ आणि हिंदुराष्ट्र सेनेच्या दलात नेहमी 'झगडा' चालत राहिला आहे. डॉक्टरांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी—संघवाल्यांशी काहीही संबंध नसतो. त्याने हेही स्वीकार केले की, त्याला पोलिसांनी तीन फेब्रुवारीलाच पकडले होते व पुढे मंडलीक इन्स्पेक्टरांनी त्याला मुंबईलाही नेऊन ठेवले होते.

येथपर्यंत कूटपरीक्षण करीतच कोर्टाचा वेळ संपला म्हणून मला

## "मी मूर्ख नाही, माझे लायसेन्स असलेले पिस्तुल यांना द्यायला!"

ते थांबवावे लागले. मी श्री. दफ्तरी यांच्याकडे बघितले. पण त्यांचा चेहरा मला थोडासा ' गरम ', ' फुललेला ' दिसला. ते माझ्याशी एक अक्षरही बोलले नाहीत की नेहमीप्रमाणे माझ्याकडे बघून त्यांनी स्मितही केले नाही. मी त्यांना नमस्कार करून त्यांची रजा घेतली. मला वाटले ते रागावले आहेत की काय ? पण तसाच मी भवनात आलो व साक्षीदाराच्या उरलेल्या कूटपरीक्षणाची व इतर पुढे येणाऱ्या साक्षीदारांसंबंधी तयारीची उजळणी करण्याच्या उद्योगात गढून गेलो. दुसरे दिवशी कोर्टात गेलो तो कळले की, श्री. दफ्तरी आज येणार नाहीत व त्यांना कालपासूनच ताप भरला आहे ! अरे काल असे होते तर–तरीच ! मी सुटकेचा निःश्वास सोडला. श्री. दफ्तरींच्याऐवजी श्री. एन्. के. पेटीगारा काम करणार होते. काम सुरू होताच मी मधुकर काळेचे कूटपरीक्षण पुढे चालू केले. साक्षीदाराने माझ्या प्रश्नांना उत्तर म्हणून आणखी बऱ्याचशा गोष्टी कोर्टाला सांगितल्या. त्याने कबूल केले की, गंगाधर पटवर्धन पोलिस 'च्या ' मुखबिरा 'चे ( इनफॉर्मर ) काम करतो. या पटवर्धनानेच मधुकरला काँग्रेसी होममिनिस्टर श्री. घुले यांच्या घरी नेले होते. गंगाधर पटवर्धन ज्या घरात राहतो त्याच घरात मधुकर खिरेही राहतो. ( हाच साक्षीदार पुढे येणार होता. ) मधुकर काळे व मधुकर खिरे हे दोघे ३० जानेवारीला संध्याकाळी महात्मा गांधींच्या हत्येचे वर्तमान ऐकून डॉक्टरांच्या दवाखान्यात गेले होते. तेथे डॉक्टरांना त्यांनी ती ' बातमी ' सांगताच डॉक्टरांनी आपले डॉक्टरीचे काम थांबवून दवाखाना बंद केला होता व तेथून ते तिघे घरी यायला म्हणून निघाले. येताना मधुकर काळे पेट्रोल पंपापर्यंत म्हणजे राजपूत बोर्डिंगच्या इमारतीपर्यंत डॉक्टरांबरोबर आला व तेथे मधुकर खिरे राजपूत बोर्डिंगमध्ये शिरला व डॉक्टर सरळ घरी परत आले. त्याने हेही कबूल केले की, पोलिसांनी डॉक्टरांचे मोठे बंधू श्री. कृष्णराव परचुरे यांना व डॉक्टरांचा मुलगा नीलकंठ परचुरे यांना फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यातच पकडले होते व पोलीस स्टेशन गिर्द ग्वाल्हेर येथे ठेवले होते. त्याने हेही कबूल केले की, मुंबई-पुण्याकडला कोणी बडा मनुष्य अथवा महाराष्ट्रीय मनुष्य ग्वाल्हेरला आला तर तो डॉक्टरांच्या घरी उतरतो किंवा एकदा तरी येऊन जातोच व डॉक्टरही त्याचे उचित स्वागत करतात.

येथे मी मधुकर काळेचे कूटपरीक्षण संपवले होते. पुढल्या साक्षीदारांची ' गोष्ट ' सांगायला सुरुवात करण्याआधी मला येथे एक गोष्ट सांगाविशी वाटते ती ही की, मधुकर काळे साक्षीदाराला पुष्कळसे प्रश्न मी, माझ्या पक्षकाराला ज्यात धोका होऊ शकेल असेही विचारले होते ते अर्थातच साक्षीदार आपलाच आहे, आपल्या पक्षकाराला ' मिळालेला ' आहे अशा विश्वासाने मुळीच विचारले नव्हते. माझे प्रश्न साधे, सरळपणे विचारलेले, ज्या गोष्टी खऱ्या आहेत त्या गोष्टींबद्दल विचारले होते व मधुकर काळेसारखा स्वच्छ वृत्तीचा कोवळा तरुण कोर्टासमोर खोटे बोलणार नाही असे माझ्या मनाने घेतल्यामुळे विचारण्याचे धैर्य मी केले होते. साक्षीदाराला बचावपक्षाने ' फोडले ' असा आरोप कुणावरही–साक्षीदारावर किंवा वकिलावर करणे फार अन्यायाचे झाले असते. जास्तीत जास्त एवढे म्हणता येईल की मी विचारलेल्या अशा काही गोष्टी साक्षीदाराबद्दल किंवा डॉ. परचुऱ्यांबद्दल असू शकतील असे चौकशी अधिकाऱ्यांना स्वप्नातसुद्धा वाटले नसावे. माझ्या प्रश्नांच्या बाबी चौकशी अधिकाऱ्यांना अगदी ' नवीन ' होत्या. त्या बाबींच्या प्रश्नांना काय उत्तरे द्यायची याचा बंदोबस्त पोलीस कोठडीत करायला चौकशी अधिकाऱ्यांना संधीच मिळाली नाही. साक्षीदार मधुकर काळेला लाल-किल्ल्यातील आरक्षीगृहातून कशा समारंभाने निरोप देण्यात आला हे मला कळले नाही.

यानंतर त्या दिवशी श्री. पेटीगारा यांनी अभियोगपक्षाचे साक्षीदार क्रमांक ५१ मधुकर खिरे, क्रमांक ५२ रामदयालसिंग व क्रमांक ५३ जगन्नाथसिंग अशा तीन साक्षीदारांचे कथन करवले व त्यांचे एकेकांचे कूटपरीक्षणही मी केले. ह्या तीन साक्षीदारांबद्दल मी या कहाणीत जास्ती काही महत्त्व देण्यासारखे नाही अशा विचारात होतो. कारण हे तिघेही साक्षीदार अगदीच क्षुल्लक व खूनखटल्यामधील आरोपसिद्धीच्या दृष्टीने व्यर्थ, असंबद्ध अशा घटनांबाबत होते. गांधीजींच्या हत्येनंतर त्या दिवसांत सामान्य लोकांचा एक उद्योगच झाला होता की, आपल्या विरोधी माणसाबद्दल असे म्हणायला सुरुवात करायची की, हा हिंदुमहासभाई, आर. एस. एस. वाला आहे, याने गांधीजींची हत्या झाल्याचे ऐकून आनंद झालेला दाखवला, मिठाई वाटली, घरी दीपोत्सव केला व मग त्या मनुष्याविरुद्ध हेही म्हणायला सुरुवात करायची की, तो मनुष्य गांधीजींच्या खुनाच्या कटात एक कटवाला होता ! त्या धर्तीचेच हे तिघे साक्षीदार होते. त्यांचे यथायोग्य व यथाशक्ती परीक्षणही मी केले. दोन गोष्टीच सांगण्यासारख्या की, साक्षीदार मधुकर खिरेने सांगितले की, डॉक्टरांच्या दवाखान्यातून निघाल्यावर आमच्याबरोबर मधुकर काळेही शेवटपर्यंत होता. फक्त तो बोर्डिंगमध्ये शिरला नाही, पण पुढे अगदी डॉक्टरांना त्यांच्या घरी पोचवीपर्यंत आमच्याबरोबर होता. मधुकर खिरेने सांगितले की, तो गंगाधर पटवर्धनच्या घरात राहतो हे खरे, पण गंगाधर पटवर्धन काय करतो हे त्याला माहीत नाही ! दुसरे दोघे राजपूत साक्षीदारही गांधींच्या हत्येची बातमी ऐकून डॉक्टरसाहेब ' खूश ' झाले होते, ते गांधीजी ' औरंगजेबाचा अवतार ' होते असे म्हणाले होते, वगैरे म्हणाले. पण या तिघांनीही त्याबद्दल पोलिसात रिपोर्ट करण्यासारखी साधी व पहिली गोष्ट करायला कधीच पाऊल उचलले नव्हते. साक्षीदार जगन्नाथसिंगने तर गंमतच केली. कोर्टात साडेतीन वाजून गेले होते. श्री. पेटीगारांनी साक्षीदार जगन्नाथसिंगच्या कथनाच्या शेवटी साक्षीदाराला रीतसर विचारले की, ' तू अभियुक्ताला–डॉ. परचुऱ्यांना–ओळखतोस असे सांगितलेस तर ते अभियुक्त येथे आहेत का, ते दाखवशील का ?' साक्षीदाराने होय म्हटले नि राजपुती ताठ्याने मिशांवर हात फिरवीत अभियुक्तांच्या पिंजऱ्याकडे तो चालत गेला व श्री. सावरकरांसमोर उभा राहिला व सावरकरांकडे बोट दाखवून कोर्टाला त्याने सांगितले की, ' हे डॉ. परचुरे !' जज्ज आत्मचरणजींनी रीतसर नोंदवले–' टिप्पणी : साक्षीदार व्ही. डी. सावरकर यांच्याकडे बोट दाखवतो व म्हणतो की, हे डॉक्टर परचुरे. ' साक्षीदार परत साक्षीदारांच्या पिंजऱ्यात जाऊन उभा राहिला नि मी कूटपरीक्षणाला उभा राहिलो नाही तोच, श्री. पेटीगाराच स्वतः उभे राहिले नि कोर्टाला अजीजीने सांगू लागले की, साक्षीदार गोंधळला आहे, कोर्टात

अंधारले आहे, संध्याकाळची उन्हाची तिरीप वरच्या झरोक्यातून डोळ्यावर येत आहे. साक्षीदाराला बरोबर दिसले नसावे. साक्षीदाराला पुन्हा डॉ. परचुऱ्यांना ओळखायला संधी द्यावी ! पेटीगारांचा अजीजीचा स्वर व साक्षीदाराचा राजपूत ठाकुराचा 'बेफिक्र' चेहरा पाहून जज्जमहोदयांना कीव आली की काय ते मला सांगता येत नाही. मी जोराजोराने निवेदन करीत होतो की, पुन्हा ओळख दाखविण्याला संधी देण्याला काही वैध कारण नाही. तरी पण जज्ज आत्मचरण यांनी श्री. पेटीगारांचे म्हणणे मानून साक्षीदाराला पुन्हा डॉ. परचुऱ्यांना ओळखून काढायला संधी दिली. ह्या वेळपर्यंत जगन्नाथसिंग ठाकुरमहाशयांच्या हे लक्षात आले होते की, आपण काही 'गलती' केली आहे. म्हणून जज्ज महोदयांनी पुन्हा संधी देताच ठाकुरसाहेबांनी 'एकदा आपल्या उजव्या कानाचे पाळे हाताने धरले व काही आठवल्यासारखे दाखवून व हां म्हणून आरोपीच्या पिंजऱ्यापाशी जाऊन तेथे बसलेल्या अभियुक्तांना सावरकरांपासून आरंभ करून एक-दोन-तीन-चार... मोजून साक्षीदार आठव्या क्रमांकाच्या अभियुक्ताजवळ गेला व निरखून पाहिल्यासारखे दाखवून त्याने म्हटले, 'ये है डॉक्टर परचुरे !' जज्ज आत्मचरणनी पुन्हा रीतसर टिप्पणी जोडली, 'साक्षीदार नंतर डॉ. डी. एस. परचुरे यांच्याकडे बोट दाखवतो व म्हणतो, हे डॉ. परचुरे !'

जज्जमहोदयांचा व माझा नेहमी वाद चालायचा की, रेकॉर्डवर जे कोर्टात घडते बोलले जाते, न्यायाधीश जे पाहतात–ऐकतात त्याचे बोलके वर्णन देणारी नोंद केली जावी. पण जज्जमहोदयांना 'जरूरी-पुरते' पलीकडे काही कबूल नसे. साक्षीदार जगन्नाथसिंगच्या कथनामध्ये दोन टिप्पण्या लिहिल्या गेल्या. 'साक्षीदार बोट दाखवून...' व 'साक्षीदार नंतर...बोट दाखवून...' या दोन नोंदीमध्ये 'नंतर'चे अंतर असले तरी, त्या दिवशी कोर्टात जे वास्तवत: घडले त्याचे कितीसे ज्ञान या 'नंतर'ने आपल्याला मिळते ? न्यायाधीशाबरोबर ज्यूरीची माणसे असती तर, त्यांनी या तिघांही साक्षीदारांवर किंचिदमात्र भरंवसा ठेवला नसता !

मधुकर खिरे, रामदयालसिंग व जगन्नाथसिंग या तिघांच्या साक्षीमध्ये एकमेकांत पुष्कळ गोष्टींचा फरक होता व मधुकर खिऱ्याने मधुकर काळेच्या सांगण्याविपरीत राजपूत बोर्डिंगचा प्रसंग सांगितला होता. मधुकर काळेच्या म्हणण्याप्रमाणे डॉ. राजपूत बोर्डिंगमध्ये आत शिरलेच नव्हते व तो व डॉक्टर सरळ घरी आले होते व मधुकर खिरे एकटाच राजपूत बोर्डिंगमध्ये गेला होता !

ह्या दिवसांत सौ. परचुरे दिल्लीला आल्या होत्या व त्या हिंदुमहासभाभवनामध्ये उतरल्या होत्या. त्या रोज कोर्टातही येत असत. मला १३-७-४८ ला च पुढे कोणते साक्षीदार येणार याची सूचना मिळाली होती. त्यामधले पाच साक्षीदार आतापर्यंत येऊन गेले होते. बाकी उरलेल्या साक्षीदारांमध्ये गंगाधर पटवर्धन, माननीय श्री. घुले, होममिनिस्टर ग्वाल्हेर, भिकू पवार व श्री. राजबहादूर अटल, मॅजिस्ट्रेट यांची नावे होती. पण १५ जुलैला श्री. दफ्तरी यांच्या अनुपस्थितीत व श्री. पेटीगारा यांच्या संचालनाखाली साक्षीदारांचा जो फज्जा उडाला होता त्यामुळे की काय, १६ जुलैला उरलेल्या साक्षीदारांपैकी कोणीच आले नाही व भलतेच–माझ्या केसशी संबंध नसलेले–दोन जुजबी साक्षीदार कोर्टासमोर आले व त्यांची परीक्षणे थोड्याच वेळात–म्हणजे लंच-विश्रांतीच्या अगोदर संपली व १६ हा शुक्रवार असल्याने आमची आठवड्याची सुटी शुक्रवारी दुपारीच सुरू झाली. अभियोगपक्षाने माझ्या पुढील कामाच्या तयारीला जणू जादा वेळ दिला होता.

पण याच अडीच दिवसांत मला एक दिवस तातडीने ग्वाल्हेरला जाऊन येणे अती आवश्यक वाटले. कारण ८ जुलैला दुपारी आमच्या घरी नव्या बाळाचा जन्म झाला होता. ते वर्तमान ता. ८ ला रात्रीच मला कळले होते. पण ८ जुलै ते १६ जुलै पर्यंत मला दिल्लीतच कसे कामात अडकून राहणे आवश्यक झाले हे सर्व वर सांगितलेच आहे. म्हणून मी ह्या अडीच दिवसांच्या सुटीत एक दिवस ग्वाल्हेरला जाऊन आलो ! माझे ग्वाल्हेरच्या वास्तव्यातले अन्यमनस्कतेचे वागणे माझ्या पत्नीला जाणवले. पण माझी मनस्थिती त्यांनी समजून घेतली होती. माझ्या मनात श्री. अटल महोदय व इतर होममिनिस्टरादी साक्षीदारांबद्दलचे विचार सारखे चालूच होते. ग्वाल्हेरच्या प्रवासात, तसेच हिंदुमहासभाभवनामध्ये आपल्या खोलीत टेबलाशी बसून साक्षीदाराला काय व कसे प्रश्न विचारायचे याचा मी सारखा विचार करीत होतो, जमवलेल्या माहितीच्या मुद्द्यांची उजळणी करीत होतो. मला सर्वांत जास्त काळजी होती मॅजिस्ट्रेट अटलजींच्या साक्षीची ! मला घाबरल्यासारखे होई. आपल्याकडून हे काम नीट रीतीने पार पडेल की नाही अशा शंकेने माझा आत्मविश्वास डळमळायला लागे ! आणि माझ्या दृष्टीसमोर हिंदुमहासभाभवनात वावरत असलेल्या सौ. परचुऱ्यांना बघितले की, माझ्या मनातल्या अविश्वास, भीतीच्या टोचण्या आणखीच जास्त तीव्रतेने जाणवत !

[ क्रमश: ]


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

पुस्तके

एक रुचिर आत्मकहाणी

# पानाआडचे फूल

सामान्यतः माणसे आत्मचरित्र लिहितात, तेव्हा त्यांना आपल्या आयुष्यात काही-तरी सांगण्यासारखे आहे असे वाटत असते. स्वतःच्या कर्तबगारीचा अभिमान असतो, स्वतःच्या दुःखाची तीव्र जाणीव असते. आपण केलेले साहस किंवा धाडस दुसऱ्यांनी ऐकावे असे त्यांना वाटत असते. असे काही ना काही सांगण्यासारखे वाटूनच माणसे आत्म-चरित्र लिहायला घेतात. अशा वेळी अलिप्त-पणे स्वतःकडे बघणे हे जवळ जवळ अशक्य होऊन बसते. आपल्या लेखनात अलिप्तता यावी, म्हणून दुसऱ्यांच्या दृष्टीने स्वतःकडे बघत आहोत, असा भास निर्माण केला, तरी ती तटस्थवृत्ती दगाच देते आणि निर-र्थक किंवा फसवे भारूड लिहिल्यासारखे वाटायला लागते. स्वतःकडे अलिप्त होऊन बघणे तसे सोपे नाही. कारण स्वतःमधला 'मी' वेगळा होणे तशी अवघड गोष्ट आहे.

आत्मचरित्राच्या संदर्भात लक्ष्मीबाई टिळकांची 'स्मृतिचित्रे' ही एक श्रेष्ठ दर्जाची कलाकृती मानली जाते. आपण कुणी एवंगुणविशिष्ट आहोत ही भावनाच त्यांच्या मनात नाही. स्वतःच्या अवती-भवती त्या अतिशय खेळकरवृत्तीने नि तादात्म्याने बघतात. आयुष्याचा खेळ, हा खेळ म्हणून त्या पाहत राहातात. घडणाऱ्या घटनांचे सुख-दुःख त्यांना आहे, पण ते संयमात आहे. त्यांच्या अनुभवांच्या कक्षाही कित्येकदा कौटुंबिक जीवनाहून व्यापक होतात. शेकडो वर्षांपासून स्वतःला पुसून टाकणाऱ्या, निरक्षर अनामिक स्त्रियांनी, ज्या प्रौढतेने संसारातील सुखदुःखे ओव्यांतून किंवा स्त्रीगीतांतून गायिली, त्या प्रगल्भतेचा वारसा लक्ष्मीबाई-कडे आला आहे. त्या प्रौढ, निरक्षर, अनामिक स्त्रियांच्या शब्दांतील माधुर्य, कोमलता, सहजता, जीवनाची खोल जाणीव यांचा वारसाही लक्ष्मीबाईंकडे आला आहे.

माणसे दुसऱ्याचे हात लागून जन्माला येत असतील,पण जगतात मात्र स्वतःच्या श्वासाने. प्रत्येक माणसाच्या अंगठ्याचे ठसे जसे एक-सारखे नसतात, तसे प्रत्येकाच्या जीवनातले सुखदुःखाचे अनुभव हे सारखे नसतात. सुख-दुःख सांगताना संयम असला की, साहानुभूती वाटते. जाणीवपूर्वक संयमापेक्षाही नैसर्गिक संयम हा आदरणीय वाटतो. ''पानाआडच्या फुलात' नैसर्गिक संयम दिसून येतो.

...' मी एक सामान्य अशिक्षित बाई. माझा संसार, माझी मुले हेच माझे चिमुकले विश्व. त्यातच रमणारी मी. बाहेरचे जग काय आहे, कसला म्हणून गंधबोध मला नाही... माझ्या आयुष्याची कहाणी मी तुम्हाला सांगायची, नंतर तुम्ही ती माझ्याकडून लिहून घ्यायची... मी तशी अबोलच आहे. पत्रात जितके मोकळेपणाने लिहिले तसे प्रत्यक्षात तुमच्यासमोर मी बोलू शकेनच असे नाही... '

सौ. आशालता सावे यांचा अगदी सहज आणि निर्हेतूक असा पत्रव्यवहार सुरू झाला, तेव्हा खुद्द त्यांनाही कल्पना नसेल की, आपल्यातल्या सुप्त लेखनबीजातून एक अतिशय रुचिर आत्मकहाणी जन्म घेणार आहे म्हणून. या साध्या, अनहंकृत आणि घरगुती भाषेतल्या पत्रांना अगदी अभावित-पणे एका वेगळ्याच शैलीचा स्पर्श झाला आहे.

'पानाआडच्या फुला'मागे लेखिकेला खरोखर आपण अल्पशिक्षित आहोत ही जाणीव आहे. तिचे लक्ष्मणरेषेतील चिमुकले विश्व आहे, लहानपणापासूनच सुसंस्कारांनी पोसलेले मन प्रगल्भ असूनही त्याची तिला जाणीव नाही. प्रत्येक लहान मोठ्या घटना, प्रसंग यांच्याकडे लेखिका एकरूप होऊन पाहाते. तिच्या आयुष्यात– तिच्या सान्निध्यात आलेल्या व्यक्तिमात्राची ती थोडक्यात पण स्पष्ट शब्दरेखा निर्माण करते. त्यातही आई, आजी, आजोबा, पती यांच्या व्यक्तिरेखा चित्तवेधक रंगवते. पिढ्यान् पिढ्या अविभक्त कुटुंबात कामाच्या ओझ्याखाली स्त्रिया ह्या दबून गेल्या आहेत. त्याच परंपरेतील लेखिका सारे विसरून ' माझा संसार, नवरा, मुले हेच माझं चिमुकले विश्व आणि इतर कसला म्हणून गंधबोध मला नाही ' असे म्हणते. स्वतःच्या संसारात ती स्वतःचे अस्तित्व विसरून जाते. लग्न होणे– पती-पत्नींची पहिली भेट– मुलाच्या जन्माच्या दारुण वेदना असे कित्येक प्रसंग लेखिकेने विना-संकोच पण प्रगल्भ मनाने सांगितले आहेत. प्रसंगांचे वर्णन करताना लेखिका कुठेही भावनाविवश झालेली नाही. सुसंस्कृत मनाचा नैसर्गिक संयम तिला आहे. दोन पिढ्यांचे सासर–माहेर शब्दांकित करताना एका विशिष्ट समाजाचेही स्पष्ट चित्र वाचकांच्या नजरेपुढून सरकते ते नित्यशः घडत असलेल्या संस्कारांसह.

इंग्रजी भाषेच्या आवडीने आणि संस्का-रांनी अनेक मराठी लेखक भाषेचा गोडवा गमावून बसतात. ज्यांच्यावर असे संस्कार नाहीत त्यांची भाषा या मराठी मातीत रुजल्यासारखी आहे. तिच्या मनात संकोचाचे अडसर नाहीत. ज्या गोष्टी सामान्यतः एक स्त्री दुसऱ्या स्त्रीजवळही बोलणार नाही, किंबहुना ज्याबद्दल लेखिका पतीजवळही बोल-ताना संकोचली ते प्रसंग निःसंकोचपणे आणि तरीही संयमाने लेखिकेने चरित्रात लिहिले आहेत. परंतु वाचकांना एक गोष्ट खट-कते ती म्हणजे, हे सारे आत्मचरित्र विस्ताराने न लिहिता केवळ आपली कथा या स्वरूपात लिहिले असते तर ? ही कथा दुसऱ्याच्या आग्रहाने आणि भक्तिभावाच्या प्रेरणेमुळेच लिहिली गेली हे खरे, परंतु गुरुस्थानी अस-लेल्या प्रेरकानेच दरवेळचा 'सप्रेम नमस्कार' आणि स्वतःबद्दलच्या भक्तिभावाची पहिली पाने वगळण्यास शिष्येस सुचवले असते तर ? परंतु काही दोष वगळता या आत्म-चरित्राची सर्वस्वी नवीन घाटणी, त्यातील अनुभवांचा ताजेपणा आणि त्याहूनही आगळी, वेगळी आणि मोकळी कथनशैली यांमुळे ही आत्मकथा कुणालाही निःसंशय मोहून टाकील.

**–लता किणीकर**

'पानाआडचे फूल'
लेखिका–सौ. आशालता सावे
पॉप्युलर प्रकाशन
पृष्ठे—२५७
किंमत–२० रुपये.

रंगभूमी

मीना देशपांडे

# 'मदर करिज्'च्या निमित्ताने!

स्थळ आहे मुंबईच्या एका प्रख्यात कॉन्व्हेंट शाळेच्या चौकातील पटांगण. न्यूयॉर्कच्या दि परफॉर्मन्स ग्रुपतर्फे बर्टोल्ट ब्रेख्त ह्या सुप्रसिद्ध जर्मन नाटककाराच्या 'मदर करिज् अँड हर चिल्ड्रेन' ह्या रूपांतरित इंग्रजी नाटकाचे ओळीने चार प्रयोग लावले जातात. नाटकाच्या मोठाल्या जाहिराती देऊनसुद्धा मुंबईचा लहरी नाट्यरसिकवृंद पहिल्या दोन प्रयोगांना गैरहजेरी लावून आपली उदासीनता व्यक्त करतो. नाट्यरसिकांना काहीतरी खमंग, चुरचुरीत अन् तरीसुद्धा फार अनपेक्षित नसलेले विषय पाहिजे असतात. त्यामुळे नाटककंपन्या जुनेच विषय निरनिराळ्या तऱ्हेने मांडतात इतकेच. कारण, दारू जितकी जुनी तितकी चांगली किंवा जुने ते सोने वगैरे! नाटकांची तंत्रे बदलली, विषय बदलले, हेतू बदलला अन् रंगभूमीमध्ये आमूलाग्र क्रांती होत आहे, नवीन प्रेक्षकवर्ग निर्माण केला जात आहे, वगैरे हुली मधूनमधून उठल्या तरी, प्रेक्षकवर्ग जुन्या साचाच्या नाटकांना धमाल गर्दी करतो. त्यामुळे 'महापूर' वगैरेसारखा अभिनव विषय, नावीन्यपूर्ण रीतीने हाताळलेल्या नाटकांना, प्रेक्षकवर्ग हाक्या करून बोलावून आणावा लागतो, ही गोष्ट नाट्यरसिकांच्या वर उल्लेखिलेल्या वृत्तीचेच द्योतक आहे. एकूण काय, माणसामध्ये मूळ धरून असलेल्या प्रवृत्ती सहजासहजी बदलणे शक्य नाही.

कधी कधी मात्र माणूस हा आपल्या लहरी वृत्तीची झलक दाखवून जातो. इतरांनी जे कधी पाहिलेले नाही, तेच पाहण्याचे–निदान आपण असे काहीतरी पाहिलेले इतरांना सांगून, त्यांच्यावर आपला वरचढपणा सिद्ध करण्यात मिळणाऱ्या आनंदामुळे म्हणा–कुतूहल माणसांमध्ये कधी कधी निर्माण होते. माणसाची ही नाडी अचूकपणे ओळखणारा एका इंग्रजी वृत्तपत्राचा नाट्यसमीक्षक, 'अत्यंत अद्भुत', 'लोकविलक्षण', 'कधी कुणी जन्मात पाहिले नसेल असे', 'आतापर्यंत असे कधी झाले नाही असे' वगैरे शब्दांची स्तुतिसुमने नाटकावर उधळतो. झाले! प्रेक्षकांना दिशा दाखविणारा फक्त कुणीतरी पाहिजे! नाटकाच्या बुकिंग ऑफिसवर माणसांची प्रचंड गर्दी उसळते. गर्दी आली म्हणजे निळ्या पोशाखातला पोलिस आलाच! दोन दिवस ओस पडलेल्या नाटकाला इतकी बेफाम गर्दी कशी काय उसळली, ह्याचा तोही अचंबा करतो. 'काय तरी 'वार' (वॉर) बीरचं हाय् म्हनत्यात. बाकी काय न्हाय त्येमंदी, अन् आपनास्नी काय समजतबी न्हाय्,.काय त्ये लोकांचं वींग्रजी!' दंडुका फिरवीत खास गोटातली बातमी तो चौकसबुद्धीच्या मराठी माणसांना पुरवतो. खाकी कनातीवरून दोन-चार डोकी कुतुहलाने आत डोकवायचा प्रयत्न करतात. शाळेच्या चौकामध्ये गोरी सडपातळ नटमंडळी, शरीर लवचिक ठेवण्यासाठी कवायतीचे हातवारे करीत असतात. बघता बघता 'हाऊसफुल्ल'चा बोर्ड झळकतो, अन् तिकीट मिळालेल्या व न मिळालेल्या माणसांची गर्दी थोपवता थोपवता शाळेचे बंद फाटक मोडायच्या बेतात येते. अचानक 'मित्रहो ऽ ऐका!' असे अमेरिकन इंग्रजी शब्द कुठूनतरी कानांवर पडतात. प्रेक्षकांच्या नजरा त्या आवाजाचा मागोवा घेतात. आतल्या जिन्यावर उभा राहिलेला एक गोरापान, किंचित पोट सुटलेला, हसऱ्या मुद्रेचा गृहस्थ टाळ्या वाजवून सर्वांचे लक्ष वेधून घेतो. त्याने खादीचा रंगीत नेहरूशर्ट अन् मळका पांढरा पायजमा घातला आहे. खांद्यावर एक कॅमेरा अन् एक पिशवी लटकते आहे.

'मित्र हो, मी या नाटकाचा दिग्दर्शक आहे. मला सांगायला वाईट वाटते की... (म्हणजे एवढी धडपड करून तिकिटे मिळवली अन् आता प्रयोग रद्द का काय?) आजचा प्रयोग हाऊसफुल्ल असल्यामुळे... (हात्तीच्या! मग त्यात वाईट वाटायचं काय कारण?) आता कुणाला तिकीट मिळणार नाही. माझे प्रत्यक्ष वडील किंवा भाऊ आला तरीसुद्धा त्यांना तिकिटे मिळणार नाहीत. कारण आतमध्ये जागा नाही. (अन् वहीण आली तर?–एक चावट प्रेक्षक विचारतो.) तेव्हा ज्यांना तिकिटे मिळाली नाहीत, त्यांनी कृपया इथे थांबून गर्दी करू नये.' दिग्दर्शक खाली उतरतो. चला, म्हणजे नाट्यसमीक्षकाने जाहिरात केल्याप्रमाणे अभिनव अन् अपूर्व अशा नाट्यप्रयोगाची सुरुवातसुद्धा किती नावीन्यपूर्ण रीत्या होते!

शाळेचे फाटक किंचित किलकिले करून एकेका माणसाला आत सोडले जाते. मधल्या चौकामध्ये बिल्डिंगचे बांधकाम चालू असल्यासारख्या बऱ्याचशा दुमजली लोखंडी परांच्या बांधलेल्या–त्याच्यावर फळकुटे टाकलेली. इकडून तिकडून वर जायला बऱ्याचशा शिड्या! एका परांचीपासून दुसऱ्या परांचीपर्यंत अनेक दोरखंडे बांधलेली. दोरखंडावर लोंबकाळणाऱ्या अनेक शिड्या, टोपल्या, मळकी फडकी वगैरे जुनाट टाकाऊ सामान. एका कोपऱ्यात निकामी टायर्सचा ढिगारा. त्यांतच इलेक्ट्रिक वायर्सची रबरी भेंडोळी अन् वरून डोकावणारी डिमर्स, स्पॉट लाईट्स् वगैरे विजेरी दिव्यांची अनेक काळी डोकी! एका कोपऱ्यात एक लहानसे पंचकोनी स्टेज. त्यावर जुनी शेल्फ, स्टूले वगैरे. दोरीवर टांगलेले अनेक मळके रंगीबेरंगी कपडे. त्यामध्ये प्रेक्षकांकडे पाठ करून एक स्त्री चक्क कपडे बदलतेय्! हेच नाटकाचे सेटिंग. आलेले प्रेक्षक, जिथे जागा दिसेल तेथे बसतात. परांचीवर लावलेल्या शिड्यांवरून चढताना, पायघोळ झगे घातलेल्या स्त्री-प्रेक्षकांची फारच धांदल उडते. जिथे जागा सापडेल तिथे लोक बसतात. काही तर स्टेजवरच्या पायऱ्यांवरसुद्धा! अन् तेसुद्धा १० रु. चे तिकीट काढून! आपल्या रिझर्व्ह खुर्च्या असतील अशा समजुतीने, उशिरा

आलेल्या प्रेक्षकांची फारच पंचाईत होते. अन् ही सगळी गंमत ३ रु. तिकीटवाल्यांना शाळेच्या वरच्या बाल्कनीत उभं राहून बघायला मिळते.

गर्दी एकसारखी वाढतेच आहे. एक इंच भरसुद्धा बसायला कुठे जागा नाही. 'इंच इंच लढवू' अशी लढाई चालू आहे. स्वतः जातीने सर्वांची बसण्याची व्यवस्था यजमानांच्या अगत्याने बघणाऱ्या, बिचाऱ्या दिग्दर्शकाला चांगलाच घाम फुटलाय. नाटकाचे दिग्दर्शन करायचे अन् प्रेक्षकांना बसविण्याचेही करायचे म्हणजे फारच झाले. हाही एक अभिनव प्रकार !

प्रेक्षकांची उत्सुकता आता शिगेला पोहोचलीय् तरी नटमंडळी अजून मळक्या कपड्यांत उघडी वाघडी फिरताहेत. दिग्दर्शकाचा चेहरा फारच केविलवाणा झालाय् ! अचानक ड्रमचा आवाज येऊ लागतो. पटांगणाच्या मध्यभागी एक स्त्री व एक पुरुष ड्रम वाजवताहेत. युद्धाला सुरुवात झाली आहे असा सूचित करणारा ड्रमचा आवाज, रोमहर्षक नसून अत्यंत उदासवाणा, भीतीदायक वाटतो. एखादी प्रेतयात्रा चालली असावी असा भास निर्माण करणारा. सगळीकडे भयाण शांतता पसरते.

तेवढ्यात दिग्दर्शकमहाशय हातात एक धारदार सुरा परजित येतात अन् प्रेक्षकांना निरनिराळ्या सूचना देत राहतात. 'ह्या ठिकाणी प्रेक्षक बसलेले आहेत त्यांना दुसऱ्या प्रवेशाचे वेळी तिथून उठायचे आहे. तिथून एक बाई जोरात पळत येणार आहे, अन् वरच्या परांचीवरच्या लोकांनी तिसऱ्या प्रवेशाचे वेळी खाली उतरायचे, कारण तिथे एक माणूस हा खतरनाक सुरा घेऊन नाच करणार आहे...वगैरे. जागा मिळवून नुकतेच 'हुश्श्य' करून बसलेल्या प्रेक्षकांमध्ये बरीच खळबळ माजून जाते अन् त्यांचे चेहरे फोटो काढण्यालायक होतात. एक नटी येऊन पटापट फोटो काढतेसुद्धा. हा सर्व इंटिमेट थिएटरचाच एक भाग असावा !

एक नटी हातात कार्ड घेऊन येते अन् सांगते–सन १६२४ चा वसंत ऋतू. स्थळ–स्वीडन. गस्टॉव्ह राजा लढाईची पूर्व तयारी करण्यासाठी सैन्यात भरती करीत आहे...

सैन्यात भरती करण्याच्या कामगिरीवर असलेला एक अधिकारी व एक सैनिक येतो. भरती करण्यात येणाऱ्या प्रत्येक माणसामागे त्यांना बक्षिसी मिळते. पण माणसं मोठी बिलंदर. त्यांच्या हातावर तुरी देऊन ती पळून जातात. त्यामुळे दोघेही चांगलेच वैतागलेले आहेत. अधिकारी वैतागून म्हणतो, 'छे, छे ! ह्या जगात प्रामाणिकपणा, विश्वास, नेकी काही काही म्हणून राहिलेले नाही. मनुष्यजातीवरचा विश्वासच उडालाय् आपला !'

'अन् ह्याला उपाय म्हणजे युद्ध ! शांततेच्या काळात लोकं एकजूट म्हणजे काय ही चीज विसरून गेलेत. त्यांच्यामध्ये ऐक्य निर्माण करायला युद्धच व्हायला पाहिजे.' सैनिक त्याची री ओढतो.

'अन् शांततेच्या काळात मनुष्य आपले अस्तित्वच मुळी विसरतो. युद्धात कशी प्रत्येक माणसाची नोंद केली जाते. हूं : लोकं काय युद्धाला घाबरतात ? एकूण त्यांना नवीन गोष्टींची भीती वाटते हेच खरे !'–

तेवढ्यात ॲना फिअरलिंग, ऊर्फ कँटीन ॲना ऊर्फ मदर करिज् आपली मालाची गाडी हाकत गाणे म्हणत येते. तिला तीन मुले आहेत–आयलिफ, स्वीस चीझ अन् कॅथरीन्. गाडीचे घोडे मेल्यामुळे दोन्ही मुलांना गाडीला जुंपलेले आहे. मदर करिज्चा धंदा म्हणजे सैन्याला मालाचा पुरवठा करणे. त्यामुळे लढाई असली की, तिचा धंदा तूफान चालतो. युद्धकाळात ती अतिशय खूष. आपला माल विकत घेण्यासाठी ती सैनिकांना आवाहन करते, 'या, या सैनिकांनो, माझी दारू विकत घ्या अन् मरायच्या आधी भरपूर पिऊन घ्या. तलवारीचे घाव पचविण्यासाठी आधी माझी दारू पचवा. मेल्यानंतर जमिनीचा खड्डा बुजविण्याआधी पोटातील भुकेचा खड्डा बुजवून काढा. या, या सैनिकांनो, दारू प्या !'

मदर करिज्ची दोन तगडी जवान मुले पाहिल्यावर अधिकाऱ्याच्या तोंडाला पैशाच्या लोभाने पाणी सुटते. सैनिकाचे आयुष्य हे किती चांगले आहे, हे तो तिला परोपरीने पटवून देण्याचा प्रयत्न करतो. लढाई करण्यासाठी इतरांना आघाडीवर पाठवून, आपण मागे राहून जीव वाचवायचा, हे गुपित तिला सांगतो. युद्धावर आपला उदरनिर्वाह चालविणारी मदर करिज् आपली मुले लढाईवर जाऊ नयेत, म्हणून प्राणपणाने झटते. लढाईवर जाऊन शौर्य गाजविण्यासाठी तळमळणारा आयलिफ मात्र आईचा डोळा चुकवून पळून जातो अन् युद्धामध्ये शत्रूंची गुरेढोरे पळवून मोठे नाव कमावतो !

–मदर करिज्चा प्रवास पुढे चालूच राहतो. धाकट्या मुलाला सैन्यातील लोकांना पगार वाटणाऱ्या कारकुनाची नोकरी मिळते. कारण तो मूर्ख असला तरी, प्रामाणिक असल्यामुळे पैशाची पेटी नीट सांभाळेल, असा अधिकाऱ्यांचा त्याच्यावर विश्वास बसतो.

युद्ध बंद असल्यामुळे मदर करिज्चा धंदा मंदीत आहे, त्याचप्रमाणे सैनिकांना शरीरविक्रय करून पैसे कमावणाऱ्या इव्हेटचा पण ! जुन्या प्रियकराच्या आठवणी काढत ती दारू पीत बसते अन् तिचा संपर्क आपल्या निष्पाप मुलीला लागू नये म्हणून मदर करिज् मुक्या कॅथरीनला जपते अन् अचानक युद्ध सुरू होते ! इव्हेटचा धंदा तेजीत चालतो. तिची पर्स पैशांनी गच्च भरते अन् पैशाची पेटी लपवून ठेवण्याच्या प्रयत्नात मूर्ख पण प्रामाणिक स्वीस चीझ अधिकाऱ्यांच्या हातांत सापडतो. इव्हेटचा उपयोग करून घेऊन, अधिकाऱ्यांना लाच देण्याचा प्रयत्न करून मदर करिज् त्याचे प्राण वाचविण्यासाठी धडपडते. लाच दिली की सारे काही व्यवस्थित होते, अशी तिची प्रामाणिक समजूत ! 'नशीब, परमेश्वरकृपेने माणसं लाचखाऊ आहेत म्हणून ! खरी माणुसकी आहे त्यांना ! जगात लाचखाऊगिरी आहे म्हणून काही धडगत आहे. त्यामुळेच तर गरीब निरपराधी माणसं संकटातून वाचण्याची शक्यता आहे !' पण मदर करिज्चा अंदाज चुकतो ! कारण लाच देण्यातसुद्धा तिचा धंदेवाईकपणा आड येतो. मुलाचे प्राण मोलाचे ? का आपल्या उपजीविकेचे साधन असलेली आपली मालाची गाडी मोलाची ? ह्या मानसिक द्वंद्वात ती लाच देण्यात येणाऱ्या रकमेतही सौदा करू पाहते ! अन् ह्या भानगडीत स्वीस चीझला आपले प्राण गमवावे लागतात. त्याची ओळख पटवून द्यायला अधिकारी त्याचं प्रेत मदर करिज्समोर घेऊन येतात. कारण सैन्यातील प्रत्येक माणसाचा हिशोब लागला पाहिजे ! स्वतःचे प्राण वाचविण्यासाठी ती प्रत्यक्ष आपल्या लाडक्या मुलाची ओळख दाखवत नाही अन् मुलाचे बेवारशी प्रेत कचऱ्याच्या

ढिगाऱ्यावर फेकून दिलेले उघडया डोळ्यांनी बघण्याचा प्रसंग तिच्यावर येतो.

—तरीही तिचा प्रवास पुढे चालूच आहे. राहता राहिली मुकी विचारी कॅथरीन. मनातल्या अतृप्त इच्छा बोलू न शकणारी. स्वतःला नवरा, मुलेबाळे असावीत, ही तिची स्त्रीसुलभ भावना फक्त शांततेच्या काळातच फलद्रूप होण्यासारखी आहे, असे मदर करिज् तिला बजबजावून सांगते. युद्धकाळात ह्या भावनेला थारा नाही. त्यावेळी फक्त धंदा अन् पैसे हे महत्त्वाचे. तरीसुद्धा तिच्या भावना मदर करिज् जपते अन् तिच्या अब्रूला तडा जाऊ नये म्हणून धडपडते. तिलाही अखेर धक्का पोहोचतो. कॅथरीनवर सैनिक हल्ला करतात. 'ही जखम लवकरच भरून निघेल' म्हणून मदर करिज् तिला समजावते; तरी स्वतः पूर्णपणे भंगून जाते. प्राणापेक्षा प्रिय असलेल्या अब्रूच्या चिंधडया झाल्या म्हणून 'खड्डयात गेली ती लढाई' अशी शिव्यांची लाखोली वाहते. अन् ह्या एका क्षणापुरती तिला आपल्या आयुष्याच्या फोलपणाची जाणीव होते. पण फक्त एकदाच !

युद्धात पराक्रम करून नाव कमावलेला तिचा मुलगा एका शेतकऱ्यावर हल्ला केल्याच्या गुन्ह्यावरून फाशी दिला जातो. एका गावातील लहान मुलाबाळांना अन् म्हाताऱ्याकोताऱ्यांना शत्रूच्या हल्ल्यापासून वाचविण्यासाठी कॅथरीन शेतातल्या झोपडीवर चढून ढोलकं वाजवून गावाला सावध करण्याचा प्रयत्न करते. अन् शत्रूच्या गोळ्यांना बळी पडून शूराचं मरण पत्करते अन् मदर करिज्चा प्रवास एकाकीपणानं चालूच राहतो !

अन् पुढे काय ? पुढे काय ? हे प्रश्नचिन्ह प्रेक्षकांच्या मनात उभे राहते. कोणत्याही गोष्टीला शेवट हा कधी नसतो. एका परिणामातून दुसऱ्या परिणामांची साखळी सतत चालू असते. दुष्ट प्रवृत्तींचे विदारक चित्र अत्यंत परिणामकारकरीत्या डोळ्यांसमोर उभे करून प्रश्नाचे उत्तर प्रेक्षकांनीच आपल्या मनात शोधून काढावयाचे असे ब्रेख्तच्या नाटकाचे वैशिष्टय सांगता येईल.

ग्रिमेल हाऊसेन ह्या लेखकाच्या १७ व्या शतकातील ऐतिहासिक कादंबरीचे हे ब्रेख्तचे नाटयरूपांतर सद्यःस्थितीवर झगझगीत प्रकाश टाकते. ब्रेख्तने नाटयविषय अन् नाटयतंत्र ह्यांत क्रांती घडवून आणण्याची महान् कामगिरी केली आहे. त्याच्या 'कॉकेशिअन चॉक सर्कल' ह्या नाटकाचे 'अजब न्याय वर्तुळाचा' हे मराठी रूपांतर करून साहित्यसंघाने मराठी नाटयरसिकांना ब्रेख्तची ओळख घडवून आणलेली आहे.

१८९८ साली जर्मनीमधील आऊसबुर्ग ह्या गावी एका सधन कुटुंबात जन्म घेतलेला ब्रेख्त, मार्क्सवादी विचारप्रणालींचा पुरस्कर्ता म्हणून ओळखला जातो तरी, त्याची खरी ओळख शांततेचा पुरस्कर्ता म्हणूनच करून देता येईल. वैद्यकीय व्यवसायाचा अभ्यास करत असताना पहिल्या महायुद्धात प्रत्यक्ष भाग घ्यावा लागल्यामुळे, युद्धाचे परिणाम किती भयंकर असतात हे त्याने प्रत्यक्ष अनुभवलेले आहे. म्हणूनच त्याच्या प्रत्येक नाटकातून कोणत्याही प्रकारची तडजोड न करता, स्वीकारलेली शांतता हेच तत्त्व त्याने मांडलेले आहे. 'मदर करिज् आणि तिची मुले' ह्या नाटकाचा मूळ उद्देश म्हणजे, युद्ध हेच उपजीविकेचे साधन असणाऱ्या मदर करिज्सारख्या व्यक्तींचा मूढपणा निदर्शनास आणणे. मदर करिज्चे आयुष्य विरोधाभासांनी भरलेले आहे. अनुभवानेसुद्धा शहाणं न होण्याचा तिचा मूर्ख अट्टाहास आहे. मदर करिज् म्हणजे प्रत्यक्ष धैर्याची जननी असावयास पाहिजे, पण तिच्या धैर्याचे वर्णन तिच्याच शब्दांत सांगायचं तर, एका महाभयंकर युद्धाच्या वणव्यातून तिने अत्यंत धैर्याने आपली गाडी हाकलली. का तर, तिच्या गाडीतले पावांचे ढिगारे कुजून चालले होते अन् कसेही करून ते खपवायला पाहिजे होते. नाही तर धंदा बुडाला असता ! मदर करिज्चे धैर्य म्हणजे गरजेपोटी निर्माण केलेले उसने अवसान ! असे धैर्य की, ज्याच्यामध्ये आदरणीय अशी कसलीही भावना उत्पन्न करण्याचे सामर्थ्य नाही. तरीसुद्धा संकटातून डोके वर काढण्याची तिची केविलवाणी धडपड मनात कणव उत्पन्न करते. मदर करिज्ची तीन मुले म्हणजे माणसाला प्राणप्रिय असणाऱ्या तीन उदात्त भावना—शौर्य, प्रामाणिकपणा अन् अब्रू ! पण युद्धाच्या वणव्यात ह्या गुणांना काहीही मूल्य राहत नाही. त्या भावना खाक जळून गेल्यानंतर अखेर शिल्लक राहते ते फक्त पोट ! अन् ते पोट भरण्यासाठी युद्ध चालूच राहीले पाहिजे ही धंदेवाईक दृष्टी.

शांततेशिवाय ह्या जगाला तरणोपाय नाही हे तत्त्व प्रस्थापित करण्यासाठी, युद्ध किती क्रूर असते हे जीव तोडून पटविण्याचा ब्रेख्तचा प्रयत्न आहे. युद्धपिपासू वृत्ती जोपासणाऱ्या राष्ट्रांमागची 'राष्ट्र' ही कल्पना मूळातूनच उपटून टाकली पाहिजे ही मार्क्सवादी विचारांची तत्त्वप्रणाली त्यामागे आहे.

ब्रेख्तची नाटके अत्यंत लवचिक आहेत. त्यामुळे त्याच्या नाटकांचे अर्थबोधन करणे हे बरेचसे नाटकाच्या दिग्दर्शकावर व कलाकारांवर अवलंबून असते. त्यामुळे परफॉर्मन्स थिएटरने सादर केलेला 'मदर करिज्...' ह्या नाटकाचा प्रयोग प्रायोगिक अशा अर्थाने आहे की, नाटकाचा प्रत्येक प्रयोग हा अक्षरशः प्रयोगच असतो. अभिनय ही कलाच अशी आहे की, ती न संपणारी व सतत चालू असणारी एक क्रिया असते. त्यामुळे प्रत्येक प्रयोगातून एक निराळाच अर्थबोध होऊ शकतो. कलाकार आपल्या अभिनयाचे निरनिराळे पैलू दाखवू शकतात, अन् कसलेल्या नटाचे हेच वैशिष्टय आहे की भूमिका तीच असली तरी, लवचिक अभिनयाने भूमिकेचे निरनिराळे पैलू उकलवून दाखवायचे. असाच अभिनय खराखुरा जिवंत वाटतो. ब्रेख्तची नाटके ही कलाकारांच्या अभिनयाला एक प्रकारची आव्हानेच आहेत.

परफॉर्मन्स ग्रुपच्या कलाकारांचा अभिनय अत्यंत जिवंत होता, अन् मुख्य म्हणजे त्यांच्यामध्ये जी एकतानता निर्माण झाली होती, ती खरोखरच वाखणण्यासारखी होती. कारण त्या कलाकारांना केवळ अभिनयच करावा लागत नाही, तर इतर सर्व कामे—म्हणजे प्रॉपर्टी उचलणे, एकमेकांना कपडे बदलण्यास मदत करणे, निरनिराळी वाद्ये वाजवून संगीताची बाजू सांभाळणे, बदलत्या दृश्यांच्या सूचना वाचून दाखवणे— वगैरे सर्व गोष्टी कराव्या लागतात. त्यामुळे केवळ अभिनय करण्यापुरते ते एकत्र न येता संपूर्ण नाटक हे आपलेच आहे ही भावना त्यांच्यात निर्माण झालेली दिसली अन् त्यामुळेच नाटकाच्या एकरूपतेला मदत झाली. फक्त ७–८ कलाकारांनी मिळून जवळ जवळ ३२ भूमिका पार पाडल्या त्या त्यांच्या हालचालींवर संपूर्ण नियंत्रण असल्यामुळेच. इतर

वेळी ही नटमंडळी प्रेक्षकांमध्ये अगदी सहजपणे मिसळत होती, हसत खिदळत होती. प्रेक्षक अन् नाटक ह्यांमध्ये जवळीक उत्पन्न होण्यासाठी हाही एक महत्त्वाचा भाग असावा. औपचारिकपणाची भिंत ढासळून टाकून कलाकार व प्रेक्षक ह्यांना समान पातळीवर आणण्याचा हा एक समाजवादाचाच प्रयोग म्हटला पाहिजे.

नाटकामध्ये सेटिंगऐवजी दोरखंडाचा केलेला उपयोग विविध प्रकारचा होता. मदर करेज्च्या गाडीला जुंपण्यासाठी उपयोगात आणलेल्या दोऱ्या मदर करिज्च्या मुलांना फाशी देण्यासाठीही उपयोगात आणल्या गेल्या. दोरीला बराच वेळ लटकत राहिलेल्या प्रेतांचे चित्तथरारक दृश्य बघून प्रेक्षकांमध्ये क्षणभर खळबळ माजून राहिली. कॅथरीन झोपडीवर चढून ढोलके वाजवते हे दृश्य दाखविण्यासाठी केलेला दोऱ्यांचा उपयोग अत्यंत विलक्षण परिणामकारक होता. नाटकाचा प्रयोग करताना आसपासच्या इतर अनेक गोष्टींचा उपयोग करून घेण्याची दिग्दर्शकाची कल्पकता कौतुकास्पद होती. उंच घरे दाखविण्यासाठी शाळेच्याच निरनिराळ्या मजल्यांचा मजेदार उपयोग करून घेतला होता. युद्ध संपून शांतता सुरू झाली आहे हे दाखविण्यासाठी, शाळेच्या दुसऱ्या मजल्यावरच्या घंटेला मोठी दोरी बांधून संपूर्ण प्रवेशभर ती खालून वाजविण्यात आली. मात्र शाळेच्या घंटेच्या आवाजाने शांततेचा भास निर्माण करण्याऐवजी शाळेत असल्यासारखे वाटण्याची भावना निर्माण झाली अन् कलाकारांच्या संवादातील शब्द घंटेच्या आवाजात बुडवून टाकले हेही तितकेच खरे. खालून दुसऱ्या मजल्यावरची घंटा वाजविण्यापेक्षा घंटेखाली उभे असलेल्या ३ रु. तिकीटवाल्या एखाद्या प्रेक्षकालाच ती घंटा बडवायला सांगितली असती म्हणजे प्रेक्षक व नाटक ह्यांमध्ये जास्तच जवळीक उत्पन्न झाली असती. अखेर दिग्दर्शकाच्या कल्पनाशक्तीलाही काही तरी मर्यादा असतात हेच खरे!

थोडेसे जाणवले हे की, नसते दोऱ्याविऱ्यांचं अवडंबर माजवून अन् त्यामुळे नटमंडळींना मेहनतीची कामे करायला लावून त्यांना वैतागून सोडण्यापेक्षा केवळ अभिनयावरच भर दिला असता तरी चालले असते. कमीत कमी साहित्य वापरून अधिकाधिक परिणाम साधणे हे प्रायोगिक रंगभूमीचे तत्त्व असावयास पाहिजे. प्रायोगिक रंगभूमी म्हणजे अशा दोऱ्याविऱ्यांच्या सर्कशीसारखे प्रयोग करण्याची जागा नसावी. (असा प्रयोग मराठी रंगभूमीवर न येवो म्हणजे झाले!) त्या दृष्टीने कसल्याही प्रकारचे साहित्य न वापरता उत्कट परिणाम साधणाऱ्या 'जुलूस' ह्या नाटकाची प्रकर्षाने आठवण येते. नाटकात प्रॉपर्टी किंवा सेटिंग असले, तर ते अभिनयाला अडथळा आणणारे न ठरता पोषकच व्हावे इतपत असावे.

नाटकाचे दिग्दर्शक रिचर्ड शेश्नर हे अभिनव कल्पनेचे निरनिराळे प्रयोग करण्याच्या कल्पनेने फारच भारावून गेल्यासारखे दिसतात. स्वतःच्या नवीन नाटकाबद्दल बोलताना त्यांनी परवा एका मुलाखतीत सांगितले की, नाटकाच्या प्रयोगाच्या वेळी सर्व प्रेक्षकांनी आत येण्यापूर्वी आपल्या चपला-बूट वगैरे पादत्राणे बाहेर ठेवून मगच आत यायचे असा एक प्रयोग ते करून बघणार आहेत. कारण का तर, निदान ह्या एका बाबतीत तरी सर्व प्रेक्षकांत समानता निर्माण होईल. वा, समाजवाद प्रथापित करण्याची काय सुंदर कल्पना आहे. रोज नवीन नवीन सुधारणा अमलात आणणाऱ्या राज्यकर्त्यांनी ही कल्पना तत्काळ उचलण्यासारखी आहे. (श्री. शेश्नर हे भारतीयांच्या बुद्धिमत्तेविषयी जरा अज्ञानी आहेत. त्यांना माहीत नाही की, मोठमोठ्या मैफिलींना जाताना आपली पादत्राणे पिशवीत घालून स्वतःजवळ सुरक्षितपणे ठेवणारा अनुभवी भारतीय प्रेक्षक किती हुशार असतो ते. परंतु श्री. शेश्नर भारतात बरेच दिवस राहून निरनिराळ्या गोष्टींचा अभ्यास करणार आहेत, तेव्हा त्यांना भारतीय प्रेक्षकांच्या हुशारीचे दर्शन लवकरच घडेल अशी आशा आहे.) श्री. शेश्नरची पुढची कल्पना फारच विलक्षण आहे. प्रेक्षकांनी बाहेर काढून ठेवलेली पादत्राणे नाटकामध्येच प्रॉपर्टी म्हणून वापरायची. झालं! म्हणजे नटमंडळींना नाटक संपल्यानंतर वहाणांचा प्रसाद खायची पाळी यायची! तर एकूण काय श्री. शेश्नर ह्यांच्या रोमारोमात समाजवाद भिनलाय. त्याचा आणखी एक प्रत्यय नाटकाचे मध्यंतराचे वेळी येतो. मध्यंतरात पोटापाण्याची व्यवस्था करण्यासाठी शिड्यांवरून खाली उतरण्याची प्रेक्षकांची एकच धांदल उडते. अन् पोटे भरल्यानंतर पुन्हा जागा पकडण्यासाठी!

खाऊन पिऊन तृप्त झालेला एक गृहस्थ मोठ्या हुशारीने दोन शिड्या चढून दुसऱ्या मजल्यावरच्या आपल्या जागेकडे येतात तो काय, त्याची जागा एका बाईने पटकावलेली असते! तो बराच आरडाओरडा करून तिला हुसकावतो व मोठ्या विजयी चेहऱ्याने आपल्या आसनावर स्थानापन्न होतो न होतो तोच, खालून एका खड्या आवाजात 'यू देअर!' असे शब्द ऐकू येतात. क्षणभरात सगळीकडे शांतता पसरते अन् प्रेक्षकमंडळी कोकाकोला प्यायचे विसरतात अन् बघतात तो काय, प्रत्यक्ष नाटकाचे दिग्दर्शक त्या गृहस्थाला एक भले मोठे व्याख्यान सुनावतात, 'खाजगी मालमत्तेवर आमचा विश्वास नाही, म्हणूनच ह्या ठिकाणी रिझर्व्ह जागा नाहीत! आमची जी तत्त्वे आहेत, त्याचे आपण विरोधक आहात! यू आर मदर करिज् विदाऊट करिज्!!' अशी ही टाळ्यांची वाक्ये फेकल्यावर प्रेक्षकांसकट सर्व नटमंडळीसुद्धा होऽऽ असा प्रचंड आवाज काढून त्या गृहस्थाची हेटाळणी करतात अन् त्या बिचाऱ्याचा चेहरा फोटो काढण्यालायक होतो! मनात मात्र कुठेतरी जाणवते की, दिग्दर्शकाने जाणूनबुजून केलेला हा एक स्टंट असावा; की नाटक किती परिणामकारक आहे व त्याचा प्रेक्षकांवर किती झटपट परिणाम होतो त्याचे हे प्रात्यक्षिक होते? अन् ह्या ठिकाणी एका प्रचंड विरोधाभासाची जाणीव प्रकर्षाने होते, ती म्हणजे अलीकडची जी प्रायोगिक नाटके असतात, ती प्रस्थापित सत्तेविरुद्ध बंड पुकारण्याचे आव्हान देणारी असतात; सामाजिक व इतर अनेक अन्यायांना वाचा फोडणारी असतात, उच्चभ्रू समाजाच्या दांभिकतेवर बोट ठेवणारी असतात, अन् ज्या उच्चभ्रू समाजाच्या दांभिकतेचा बुरखा फाडण्यासाठी ही नाटके धडपडतात ती नाटके मोठ्या आवडीने पाहाणारा समाज नेमका उच्चभ्रूच असतो! सवयीने आपल्या दोषांच्या प्रतिबिंबाचा आस्वाद घेतात, अन् ज्या सामान्य माणसाच्या अन्यायाला वाचा फोडण्याची अशा नाटकांची धडपड असते, तो सामान्य माणूस अशा नाटकाकडे ढुंकूनसुद्धा बघत नाही असे मोठे विलक्षण दृश्य आपल्याला पाहावयास मिळते, अन् वाङ्मयाने मतपरिवर्तन, जनजागृती वगैरे गोष्टी साधल्या जातात किंवा नाही असा प्रश्न पुन्हा मनामध्ये उभा राहातो. 'मदर करिज्...' ह्या नाटकाच्या दिग्दर्शकाला 'मदर करिज् विदाऊट करिज्' अशी वृत्ती असलेला एक माणूस बोट दाखवायला सापडून गेला. त्या बिचाऱ्याचा नाहक बळी गेला हा भाग निराळा. पण इतर आलेल्या उच्चभ्रू प्रेक्षकांमधील अनेक माणसे अशा वृत्तीची असू शकतील! अन् तीच माणसे 'बाहेरची' बनून 'आतल्यां'ची हेटाळणी करण्यात सामील झाली होती!

एकूण काय 'मदर करिज्...' मध्ये सर्व काही आहे. ज्याला जे पाहिजे ते! अगदी 'ब्ल्यू' फिल्ममधल्या दृश्यांसारखी दृश्येसुद्धा! मघाशी सांगितले त्याप्रमाणे ब्रेख्तची नाटके इतकी लवचिक आहेत की, त्यात रंग भरणारा दिग्दर्शक पाहिजे. बस्स्! ☐

# परंतू दादा कोंडके सोंगाड्या इतुके झाले!



नंदू राजे

## लेखांक चार

पण दादाचा सोंगाड्या कसा जन्मला, वाढला–आकाराला आला ह्याचा माग घेण्यापूर्वी दादाचा प्रथम सिनेमात प्रवेश आणि त्याला मिळालेले दणदणीत अपयश ह्याचाही विचार करायला हवा. एक प्रकारे पुढल्या सोंगाड्याच्या जन्माची बीजे या अपयशात सामावलेली आहेत. या सोंगाड्याच्या जन्माला चॅप्लिन, किटनच्या सोंगाड्यांना मिळालेल्या इन्संट यशाचं बूड नाहीय्.

चार्ली चॅप्लिन हा एक प्रकारच्या अपघातानं, जास्त पैशाच्या जाणीवेनं सिनेमात आला, तर बस्टर किटन या माध्यमाच्या आकर्षणातून या माध्यमाचं पुढं निर्माण होणारं सामर्थ्य जोखून...

एकोणीसशे तेरा सालच्या डिसेंबर महिन्यात, निळ्याभोर, उदास पण देखण्या चेहऱ्याचा, केवळ चोवीस वर्षांचा एक तरुण मॅक सेनेटच्या किस्टोन स्टुडिओत आला...ह्याचं नाव होतं चार्लस् चॅप्लिन, निर्माता मॅक सेनेटनं त्याला भेटायला बोलावलं होतं. काही काम मिळण्याचाही संभव होता.

'मला बघून सेनेटला तर शॉकच बसला–' चार्लीनं लिहून ठेवलंय. 'त्याला वाटत होतं मी वयानं बराच मोठा असेन. मलाही तेव्हा आठवलं की, सेनेटच्या चित्रपटांतले सोंगाडे बरेच म्हातारे वगैरे असत. म्हणून मीही भीत भीत मिशा लावून म्हातारा होईन असं सांगितलं. मॅकला याबद्दल काय वाटलं हे आजतागायत मला ठाऊक नाही. पण माझ्या सिनेमा–जीवनाची सुरुवात अशी भिकारडी होती. अनेक दिवस मी स्टुडिओत नुस्तीच पायपीट करत फिरत होतो. सेनेट माझ्यासमोरून जात-येत असला तर, माझ्याकडे ढुंकूनही पाहायचा नाही. सेनेटला बहुधा मला बोलावण्यातली चूक लक्षात आली असावी.'

सेनेटनं काही वर्षांखाली चॅप्लिनला एका वॉडेविल संचात दारुड्याच्या भूमिकेत पाह्यलं होतं, न मनात ठरवलं की, कधी काळी कंपनी काढलीच तर या दारुड्याला बोलावून घ्यायचं. कंपनी स्थापन करण्याचं सेनेटचं हे केवळ दिवास्वप्नच होतं. कारण त्यावेळी सेनेट डब्ल्यू. डी. ग्रिफिथच्या कंपनीत रोजानं पाच डॉलर्सवरचा एक्स्ट्रॉ होता. चॅप्लिनच्या नंतरच्या अमेरिकन दौऱ्यात त्याच्या संचाच्या व्यवस्थापकानं चार्लीच्या पुढ्यात एक तार टाकली. ही तुझ्यासाठी आहे का बघ म्हणून. तार कुणा चॅप्लिनच्या नावानं चौकशी करणारी होती. हा चॅप्लिन या संचात असेलच तर त्यानं ताबडतोब केसेल व बॉमन यांच्याशी त्यांच्या ब्रॉडवेच्या पत्त्यावर संपर्क साधायचा होता.

चार्लीला वाटलं, कुठल्या लांबच्या आत्यानं त्याला मरणोत्तर पैसे ठेवले असतील, पण प्रत्यक्षात सेनेटनं त्याला हप्त्याला १५० डॉलर्सवर काम देऊ केलं होतं. प्रसिद्ध किस्टोन कॉमेडीत काम करण्याचं आकर्षण आणि हप्त्याला १५० डॉलर्स म्हणजे त्यावेळी चार्लीला लॉटरी तिकीट लागल्याचं भाग्य वाटलं. 'एक वर्षभर या रॅकेटमध्ये काम करू या न वॉडेविलमध्ये आंतरराष्ट्रीय नट म्हणून परतू या,' असं केवळ ठरवून चार्ली स्टुडिओत गेला होता.

**विच्छाचं यश**
**त्यामुळं मिळालेला पैसा आणि लोकप्रियता**
**पाठीशी उभा असलेला दादा कोंडके हा इसम**
**सिनेक्षेत्रात शिरला तो माध्यमाच्या**
**आकर्षणानं नाही, अपघातानं नाही**
**तर धंदा, व्यवसाय करण्यासाठी,**
**तो राबवण्यासाठी अत्यंत योग्य माध्यम**
**म्हणजे सिनेमा या धूर्त, हिशेबी**
**पण निश्चित जाणीवेने.**

---

बरेच चित्रपट काढल्यानंतरही सेनेट चार्लीला हाकून देणार होता, याचं मुख्य कारण त्यावेळची किस्टोन नाईक मॅबेल नारमॅण्डबरोबर चार्लीचं पटत नसायचं. बहुतांशी पटांचं दिग्दर्शन मॅबेलच करत असे. सेनेटच्या न्यूयॉर्क कचेरीत 'चॅप्लिनचे पट ताबडतोब व सातत्यानं पाठवा' अशी तातडीची तार आली नसती तर, चॅप्लिनचा अवतार कदाचित तेव्हाच संपला असता.

ज्या एकोणीसशे तेरा सालात चॅप्लिन सिनेमात आला, नेमक्या त्याच सालात बिल हर्स्टनी, किटन पिता-पुत्रांना जिग्सची 'ब्रिंगिंग अप फादर' या सिनेमात काम करण्यासाठी पाचारण केलं होतं. पण बस्टर किटनच्या वडिलांनी ही ऑफर धुडकावून लावली. किटन कुटुंबाला चार्लीसारखी पैशाची वानवा नव्हतीच. चांगलेच सधन होते ते. पण एकोणीसशे सतरापर्यंत सिनेमात शिरणं बर्टनच्या पक्कं डोक्यात बसलं होतं. त्याचा एजंटदेखील बस्टरला सल्ला देऊन होता की, 'सिनेमात शिर आणि सर्व काही शिकून घे...हे माध्यम फारच मोठं वाढणार आहे.' आणि याच सुमारास एक कर्मधर्मसंयोग, भेट झाली.

'मी ब्रॉडवेवर सहज फिरत चाललो होतो तर मला एक जुना वॉडेविल दोस्त भेटला.' बर्टननं त्याच्या आत्मचरित्रात लिहिलंय्. 'त्या दोस्ताबरोबर रोस्को (फॅरी) अरबुकल होता. मित्र म्हणाला की सध्या त्यानं मेकअप उतरवलाय आणि पिक्चर कंपनी सुरू केलेय. रोस्कोला सेनेटकडून बाहेर काढून त्याच्याशी करार पण केलाय आणि रोस्कोनं मला विचारलं की, मी कधी पिक्चरमध्ये काम केलंय का म्हणून. मी नाही म्हणालो, तर तो म्हणाला, उद्याला वेळ असला तर स्टुडिओत फेरी मार आणि माझ्याबरोबर एक-दोन सिनस्ची तालीम कर आणि बघ कसं काय वाटतं ते. मलाही वेळ होता नि मी स्टुडिओत गेलो आणि...आणि असा मी सिनेमात आलो.'

चॅप्लिन व किटन या दोघांच्याही सिनेमातला हा भयानक कॅज्युअल प्रवेश, त्यातला कर्मधर्मसंयोगाचा भाग, मला नेहमीच स्तिमित करतो. यातला अपघाती भाग सोडल्यानंतरच्या काही गोष्टी मात्र सूर्यप्रकाशासारख्या लख्ख आहेत. पैशाच्या चणचणीमुळे अधिक आणि झटपट पैसे मिळवण्याचा मोह चार्लीला निश्चित होता. या माध्यमात आपण बसू की नाही, स्थिरावू की नाही ही शंकाही होती. शिवाय नट म्हणून किस्टोन स्टुडिओतलं आपलं स्थान बहुधा दुय्यमच असणार ही जाणीव.

फक्त त्या सुमारास हे माध्यम अत्यंत प्रथमावस्थेत आहे हेही चॅप्लिनला ठाऊक होतं. शिवाय वर्षभराचं कॉन्ट्रॅक्ट त्याच्या खिशात होतंच. त्या मानानं बस्टरचा प्रवेश जरासा उशीराच झाला. वयानं तो बावीसचा म्हणजे चॅप्लिन शिरला त्यापेक्षा दोन वर्षांनी लहानच होता. पण बस्टरच्या मागं त्याची सोंगाड्या म्हणून थोडीफार कीर्ती आणि मुबलक पैसा होताच. आणि दरम्यानच्या पाच वर्षांच्या काळातली कॉमेडी सिनेमांची थोडीफार का होईना पण परंपरा मौजूद होती. पण हे माध्यम खूप वाढणारं आहे हे सिनेतंत्राचा डोळ्यांनी अभ्यास करणाऱ्या बस्टरला ठाऊक होतं. स्वतःच्या मेकॅनिकल इंजिनीअरिंगचं कौशल्य सिनेमात फार उपयोगी पडेल हेही त्याला ठाऊक होतं. (अनेक भन्नाट यंत्रअवजारं निर्माण करून बस्टरनं त्यांचा केलेला कॉमेडी उपयोग याची साक्ष आहे.) या माध्यमातच किटनला प्रचंड इंटरेस्ट होता. नाही तर वॉडेविलमधले मिळणारे हप्त्याला ३०० डॉलर्स सोडून तो ४० डॉलर्सवर सिनेमात आला नसता.

विच्छाचं यश, त्यामुळं लाभलेला पैका व् लोकप्रियता पाठीशी उभा असलेला दादा कोंडके हा इसम सिनेक्षेत्रात शिरला ते माध्य-माच्या आर्कषणानं नाही, अपघातानं नाही, तर धंदा, व्यवसाय करण्यासाठी, तो राववण्यास अत्यंत योग्य माध्यम म्हणजे सिनेमा ह्या धूर्त, हिशेबी पण निश्चित जाणीवेनं. इट वॉज जस्ट ए मॅटर ऑफ कॅशिंग हीज् टॅलण्ट, पैशासाठी, लोकप्रियतेसाठी...अधिकात अधिक पैका, पॉप्युलॅरिटीसाठी आणि कदाचित कामगार वस्तीत, कनिष्ट मध्यमवर्गात जन्माला आलेल्या एका वांड पण गुणी, संवेदन-शील पोराच्या दिवास्वप्नपूर्तीसाठी ! 'Chaplin played it safe, Buster heavily gambled but Dada instinctively calculated !'

स्वतःच्या आताच्या स्थानाबद्दल रास्त अभिमान (अहंकार) दादाच्या वागण्या–बोलण्यात उघडपणे आढळत नाही, पण निश्चितपणे जाणवतो. ग्लॅमरस सुपरस्टारचे उघडेबोडके नखरे याच्यात दिसणार नाहीत, पण आताच्या त्याच्या वागण्याबोलण्यात, इतरांना वागवण्यात या स्वयंभू सत्तेचे तरल दबाव बारकाईनं आढळतात......ते बारकावे सोयीनुसार, जाणीवपूर्वक लपवण्याचे सुप्त प्रयत्न एखाद्या न्यू वेव्ह चित्रपटातल्या जम्प कटिंग करून घातलेल्या इनसर्टसारखे क्षणकिंचित दिसतात, नाहीसे होतात !

दादा सिनेमात येण्यापूर्वी, व्यावसायिक मराठी चित्रपटांची परंपरा –खरं तर घाट–होता ग्रामीण तमाशा बोलपटांचा, कौटुंबिक मेलोड्रामाचा आणि मध्यमवर्गीय इम्पोर्टेड विनोदी चित्रपटांचा–(व्यावसायिक सिनेमा असा शब्दप्रयोग करणं इथं आवश्यक आहे कारण 'सिनेमा इक्वल टू धंदा' हे बेकंबेच्या पाढ्यासारखं दादाच्या डोक्यातलं फिट्ट गणित आहे.) मुंबई, पुणे, नागपूर...मग कोल्हापूर, सांगली हे शहरी यश, त्यांत घाटा होऊन मिळणारा पैका हा मराठी सिनेमा नव्हे हेही दादानं हेरलं होतं. सिनेमा ही जमिनीवरल्या तमाशासारखी खेडोपाडी रुजलेली, रुतलेली गोष्ट–माध्यम वगैरे शहरी बकवास नाही–हेही ! रुक्ष, व्यवहारी व्यावसायिक नजरेनं दादाच्या चित्रपटांकडे पाहिलं तर त्याने आपले सर्वच बोर्लपट या खेड्यातील प्रेक्षकवर्गाला समजतील, रुचतील, रिझवतील; त्यांत या प्रेक्षकांना स्वतःचं काहीना काही स्वयंप्रतिबिंब दिसेल याच घाटानं बेतलेले दिसतील. शहरामधल्या प्रेक्षकांसाठी एक शहरी दुय्यम कथानक जरी त्यांत नीटपणे ठेवलेले असले तरीदेखील हा सोंगाड्या खेडूतच दिसेल–अगदी पांडू हवालदारमधला जणू काही नुकताच गावास्न आलेला सखाराम धरून–वागेल, बोलेल. पण थोडंसं चिकित्सक–समीक्षक नजरेनं पाहिलं तर हा सोंगाड्या जणू काही खेड्यातल्या मातीत पुरलेली तमाशाच्या सोंगाड्याची नाळ शोधत जातो आहे असा भास होतो. मराठी चित्रपटाच्या व्यावसायिक यशासाठी चित्रकथानकाला असा ग्रामीण जमिनीचा तक्ता असावा हे त्याला कळायला तांबडी माती, भालजी पेंढारकरनिर्मीत–दिग्दर्शित–ह्या दादाच्या पहिल्यावहिल्या चित्रपटाचं प्रचंड अपयश उपयोगी पडलं नाही, पण या अपयशानं दादा आणि त्याचा सोंगाड्या पुढं झेपावला हे निश्चित. ह्या चित्रपटाबद्दल बोलायलादेखील दादा थोडासा रिलक्टंटच वाटतो. बोललाच तर जुजबी काही बोलतो.

> 'दादा, नट म्हणून तांबडी मातीतलं तुझं अपयश नेमकं का आलं असं तुला वाटतं ?'
>
> 'नेमकं सांगणं कठीण आहे. पण त्यातले संवाद मी फार भरभर बोललो असं मला वाटतं आणि त्यातल्या माझ्या हालचाली जास्त मोजून मापून होत्या.'
>
> 'म्हणजे नाटकातल्यासारख्या आखीव रेखीव ?'
>
> 'हो ना, आयला आम्हाला बोर्डावर मोकळंढाकळं वागायची सवय. हे इथंन तिथं जावा, तिथं थांबा, इतकंच मेजकं हाला हे काय जमले नाही बघ.'

तांबडी मातीच्या या वैयक्तिक अपयशाबद्दल दादा फारसं बोलायला मागत नाही याचं एक कारण दादाच्या प्रकृती स्वभावाला अपयश मानवत नाही हेच बहुधा असावं. म्हणूनच टोलवाटोलवी करून तो हा विषय टाळतो. 'माझं तांबडी मातीतलं फेल्यूअर माझ्यापेक्षा बाबांनाच– भालजी पेंढारकरांनाच–लागलं' असं जरी तो आता वरवर म्हणाला तरी त्याच्या स्वभावाला हे अपयश खरंखुरं झोंबलं असावं असं मला वाटतं. स्वतःच्या प्रकृतीच्या विरुद्ध वळणाचा अभिनय केला तर, आपण यशस्वी होणार नाही ही जाणीव त्याला त्यावेळी नसणार असं मला वाटत नाही. या माणसाला स्वतःच्या अभिनयगुणांबद्दल अजिबात अहंकार नाही. आहे ती नीटपणे त्यांच्या मर्यादांची आखीव राखीव, स्पष्ट जाणीव. शिवाय स्वतःला हवंय ते दुसऱ्याच्या गळी उतरवण्याची टॅक्टदेखील याच्याकडे मुबलक उपलब्ध आहे. दादाच्या 'एकटा जीव सदाशिव' या बोलपटाच्या वेळीदेखील दिग्दर्शक गोविंदराव कुलकर्णी व लेखक वसंतराव सबनीस यांच्या हट्टाखातर चित्रपटाचा शेवट संपूर्ण बदलायला दादानं मान्यता दिली होती. एकटा जीव सदाशिव हे चित्रपटाचं नाव आहे तर याचं शेवटी लग्न लागून हॅपी एन्डिंग होता कामा नये असं अत्यंत सरळ लॉजिक दादाच्या डोक्यांत फिट्ट बसलं असतानाही दादानं शेवट असाच चित्रित करायला मान्यता दिली. दादाच्या कारकीर्दीत तांबडी माती आणि एकटा जीव सदाशिव या दोनच वेळा दादा स्वतःच्या नैसर्गिक इंस्टिंक्टविरुद्ध वागला, त्यानंतर त्यानं ती चूक पुन्हा केली नाही.

> 'पण इतका उघड, ढोबळ चुकीचा शेवट करायला तू तयार कसा झालास ?' एकटा जीवच्या संदर्भात मी त्याला टोचलं.
>
> 'साला एव्हढी मोठी माणसं हे असं बोलताहेत तर त्यांचंच बरोबर असेल, आपलंच काही चुकत असेल असं मला वाटायला लागलं.'

हेदेखील अर्धसत्य आहे असं मला ठामपणे वाटते. दादाला त्याच्या इन्स्टिंक्टमध्ये शंभर टक्के विश्वास तांबडी माती व एकटा जीवच्या वेळी असेलच अशातला भाग नाही. पण माझ्या अंदाजानं उगा उगा फालतू संघर्ष यावेळी नकोत या बेरकी जाणिवेनंच दादानं या तडजोडी केल्या. एकटा जीवनंतर गोविंदराव कुलकर्णी वा वसंतराव सबनीस दादाच्या सेटअपमध्ये राहीले नाहीत, ही मोठीच बोलकी गोष्ट आहे.

मी स्वतः तांबडी माती हा चित्रपट पाहिलेला नाही; हा केव्हा लागला आणि केव्हा उडाला हेही नेमकं आठवत नाही. किंबहुना

दादा कोंडकेनं तांबडी माती नावाच्या चित्रपटात काम केलं होतं ही गोष्ट बहुतांशी मराठी प्रेक्षकवर्गाच्या गावीदेखील नाही. पण तांबडी माती या चित्रपटाबद्दल बोलताना 'दादा कोंडकेची विच्छा माझी पुरी करा मधली लोकप्रिय प्रतिमा उराशी बाळगून तांबडी माती बघायला गेलेल्या मुठभर प्रेक्षकांना दादाची त्यातली भूमिका हा मोठाच धक्का होता.' असं ठामपणे प्रतिपादन करणाऱ्या एक नामवंत सिनेसमीक्षकाचे मत ग्राह्य असावं असंच मला वाटतं. तांबडी मातीचं कथानक एका आखाड्यातल्या पहिलवानाभोवती गुंफलं होतं आणि दादाला ह्यात दुय्यम, साहाय्यक भूमिका होती! तांबडी मातीनंतर इतर कुणाच्या चित्रपटात भूमिका स्वीकारायची नाही असा ठाम खडा दादानं कानाला लावून घेतला तो आजतागायत. त्याचा पुतण्या –आणि कदाचित दादाच्या सर्वांत जवळचा माणूस ह्य आजमितीला स्वतंत्र चित्रनिर्मिती करणार असला, तसे चित्रपट कदाचित दादाच्याच बॅनरखाली निर्माण होण्याची शक्यता असली तरी, त्यात दादाची भूमिका नसेल. स्वतःच्या टॅलंटवाईज् जे काही करायचं ते स्वतःचं स्वतःच हे दादानं तांबडी मातीच्या अपयशातून ठरवलं. त्याच्यानंतरच्या पहिल्यावहिल्या चित्रपटात जन्माला आलेला सोंगाड्या, त्याचं स्वरूप आणि त्याची पुढली रूपं या काळात रोवली गेली नव्हती, पण तांबडी मातीच्या चित्रपट अनुभवात त्यानं सिनेव्यवसायाचे आर्थिक, व्यावसायिक बारकावे दादान हेरून ठेवले. मुळातच हिशेबाला पक्का असलेला हा इसम सिनेनिर्मितीच्या आर्थिक व्यवहारात लागणारे दोरीझुलतं कौशल्य, त्यातला बेभरवशाचा पण हिशेबी जुगार 'डोक्शात नीट घुसवत होता.'

मला आठवतं, आंधळा मारतो एक डोळा या चित्रपटाच्या प्रेस शोनंतर दादानं एक शराब पार्टी केली होती... त्या पार्टीच्या अनौपचारिक समारंभात कुणा पत्रकारानं दिग्दर्शक प्रभाकर पेंढारकर– कै. बाबुराव पेंढारकरांचे सुपुत्र– यांची खास स्तुती केली होती. पार्टीत दादानं प्रभाकरला नोकरी सोडून स्वतःच्या कंपनीत यावं असं दोस्त आवाहनही केलं होतं. पण त्याच्या पुढल्या चित्रपटाचं– पांडू हवालदारचं दिग्दर्शन मात्र त्यानं प्रभाकर पेंढारकरावर सोपवलं नाही.

'आंधळा मारतो किती शिफ्टस्‌मध्ये पुरं झालं, ठाऊक आहे.' प्रभाकर पेंढारकरसंबंधी मी दादाला विचारलं तर त्यानंच प्रश्न केला.

'नाही.'

'एकूण ऐंशी शिफ्टस् लागल्या.' दादानं माझ्या नाकासमोर बोट रोखलं.

'नॉन्सेन्स'

'कुणालाही विचार. प्रभाकर गुणी दिग्दर्शक आहेय्, त्याच्या कुटुंबाशी माझे जवळचे संबंध आहेत. पन्नासाच्यावर एक तरी शिफ्ट मराठी निर्मात्याला परवडते काय?'

आणि हे आंधळा मारतोनं रौप्यमहोत्सवी यश मिळवलं तरी! प्रत्येक चित्रपट हा एक स्वतंत्र, नवा जुगार. ह्याचं अर्थशास्त्र आणि त्याच्या आधीच्या चित्रपटाचं आर्थिक यश याचा परस्परसंबंध नाही. पण अमाप यशानंतर हा तोल सांभाळणं सोपं नाही. तांबडी मातीचं अपयश जसं यांनी पचवलं तसंच पुढल्या यशांनंही हा शेफारलां नाही.

'बाबारे! हे काही आडाखे ठरलेले असतात. नटनट्यांचं बजेट घे. तीस हजारांवर एक तांबडा पैसा खरचलास की उलथलाच बघ निर्माता.'

आणि नेमका हाच तोल, त्यानं तांबडी मातीतलं अभिनयाचं अपयश धुपवण्यासाठी राबवला. कॅमेऱ्यासमोरदेखील तमाशाबाजाची मोकळीठावळी लवचिक हालचालच करायला हवी आणि आपल्या खजुरी आवाजाची स्पष्टपणे रजिस्टर्ड न होण्याची मर्यादा– बोर्डावर संवाद रिपोर्ट करण्याची सोय इथं नाही हे जाणून– डॉयलॉग स्लो बोलण्याची, स्वतःची खास ढंगाची, स्वतःला चपखल बसणारी, सुबोध संवादस्टाईल त्यानं निर्माण केली.

'मी कुठल्या तऱ्हेचा सोंगाड्या रंगवणार आहे याची मला अजिबात जाणीव नव्हती...' चॅप्लिननं त्याच्या आत्मचरित्रात लिहलंय, 'पण डोकं खाजवून विचार केला तेव्हा मला माझ्या लहानपणीच्या पाहिलेल्या 'इंग्लिशमेन'ची आठवण झाली... त्यांच्या छोट्या काळ्या मिशा, घट्ट कपडे, त्यांच्या हातातल्या काळ्या हॅट...' किडस् ऑटो रेससाठी पत्रकाराचं सोंग काढू नये म्हणून मॅक सेनेटनं चार्लीला सांगितलेलं :. मेकप, कपडे देखील काय घालावेत ह्याची चार्लीला स्पष्ट कल्पना नव्हती... 'मला संपूर्ण विसंगती हवी होती... भोंगळ पॅण्ट... घट्ट कोट, लहान हॅट तर अजस्र बुट... मॅकला माझं तरुण दिसणं खटकायचं म्हणून वय बदलण्यासाठी ओठावर मोठ्या मिशा डकवल्या... आणि ज्याक्षणी मी आरशात पाहिलं त्याचवेळी मी जन्माला आलो.' ही भलीथोरली पॅण्ट नेमकी फॅटी अरबुकलची होती... चार्लीच्या पॅण्टीचा आणि बस्टर किटनचा जनक अरबुकल हा अनेक अर्थांनी एकूणच सिनेमातील स्लॅपस्टिक कॉमेडीचा गॉडफॉदर मानायला हवा. मागाहून चॅप्लिनची मिशीदेखील कमी कमी होत हिटलरी वळणावर थांबली.

सत्रा साली किटन सिनेमात शिरला, तेव्हा त्याच्या मागं चॅप्लिनचं पाच वर्षाचं यश होतं. त्यानं उभा केलेला सोंगाड्या हा एकदम टाय, सूट, बोलर हॅटवाला इलेगण्ट अमेरिकन होता. चॅप्लिनच्या हलत्या-बोलत्या, थोड्याशा चेहऱ्याच्या स्नायूंच्या अतिशयोक्ती करून केलेल्या हालचालींच्या नेमकं उलट, म्हणजे पोकर चेहऱ्यावर कुठलाही हावभाव, हालचाल नसणारा मढंवत चेहरा त्यानं धारण केला आणि स्वतःच्या मातीचा शोध घेणाऱ्या इंग्लिश चॅप्लिन व अमेरिकन किटनसारखाच दादाचा अनवाणी, भोळसट पण तरीही बेरकी; सोंगाड्या तद्दन मराठीमोळाच्या खेड्यातल्या धरतीपुरल्या नाळेचा वेध घेत गेला!

'दादा, ही तुझी गबाळी हाफपॅण्ट तुझ्या डोक्यात कशी शिरली?'

'तिच्या आयला, हाफपॅण्ट डोक्स्यात कशी शिरली, ती तर..'

'दादा. प्लिज; बि सीरिअस' हा ट्रॅक बदलेल म्हणून

मी त्याला घाबरून थांबवलं.

'आम्ही बोलत बसलो होतो बघ...मी बाबा...आणिक कोणी मंडळी होती. सोंगाड्यानं कापडं काय घालावी याचा विचार करत होतो...माझ्या टकुऱ्यात आयडिया सणकली, तसाच उठून ड्रेस डिपार्टमेंटमध्ये गेलो आणि मोठ्यातली मोठी हाफपॅण्ट चढवली.'

विच्छातल्या सोंगाड्यानं धोतर फेडलं होतं...राजेरजवाड्यांच्या भालदार-चोपदाराला नोकरी उरली नव्हती. तो गावाकडं घराला परतला होता !

चॅप्लिनला मॅक सेनेटनं हेरून उचललं पण चॅप्लिनच्या ट्रॅपचा जनक तो स्वतःच होता. किटनच्या मागं फॅटी अरबुकलचं जिनिअस होतं, तर दादाच्या मागं भालजी पेंढारकर. 'दादा हा मोठा हुशार आणि लबाड मनुष्य आहेय्' असं बाबा मला अलीकडेच कोल्हापुरात म्हणाले. पण त्यांच्या या बोलण्याला प्रेमाचा, स्नेहाचा बाज होता. त्यात उतारवयात येणारी परिपक्वतेची सहनशीलता होती. पोराच्या डोक्यावर स्नेहाळ हात ठेवणारी आर्द्रता होती आणि म्हणूनच कुणातही कधीही न गुंतणारा दादा कोंडकेसारखा इसम, इतक्या यशानंतरही कोल्हापुरात शुटिंग करण्यासारखी अव्यवहारी गोष्ट करतो याचं मला आश्चर्य वाटत नाही.

दादानं चॅप्लिन वाचला किंवा कुणाकडून वाचून घेतला की काय हे मला ठाऊक नाही. चार्लीच्या 'बॅगी ट्राऊझर्स' बहुधा बाबांनी कापून ती हाफपॅण्ट दादाला चढवली देखील असेल...

तरीही दादानं या सोंगाड्याला एक थोर लेणं चढवलं. त्याला तोड नाही. या सोंगाड्याला दादानं, कमर्शिअल सिनेमाला अपरिहार्य, आवश्यक का होईना पण एक अत्यंत पारंपरिक कवचकुंडल दिलं... रादर ते कुंडलं काढून घेतलं,नाही.

दादानं या सोंगाड्याला...गाणं दिलं...संगीत दिलं !

तमाशातला जमिनीवरला सोंगाड्या, लोकनाट्याच्या सहा फुटी बोर्डावर चढला होता तो आता आणखी वर चढत पडद्यावर गेला... पण बोर्डावर विरलेलं गाणं...जमिनीवरून पडद्यावर नेलं गेलं..

हे दादानं इन्स्टिंक्टीव्हली केलं, अपरिहार्य हिशेबानं केलं...की हे अपघातानं घडलं, ह्याचं नेमकं कारण शोधण्याची मला जरूरी भासत नाहीय्... (क्रमशः)


# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | शतपावली | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १५ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १६ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १७ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १८ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १९ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| २० | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| २१ | मॅक्झिम गॉर्की | सुमती देवस्थळे | १० – ०० |

'सूत्रधार'चे

# 'नगरी अंधेरा'

विद्या जपे

मुंबईतील 'सूत्रधार' या संस्थेतर्फे माक्स फ्रिश या विख्यात जर्मन नाटककाराचे 'आंडोरा' हे गाजलेले नाटक 'नगरी अंधेरा' या नावाने शुक्रवार दि. १६ एप्रिल रोजी रंगमंचावर येऊन गेले आहे. मराठीतील सुप्रसिद्ध नाटककार रत्नाकर मतकरी यांनी या नाटकाचा मराठी अनुवाद केला आहे. जर्मन रंगभूमीवरील अनुभवी आणि अभ्यासू दिग्दर्शक डॉ.नॉर्बर्ट मायर यांनी या नाटकाचे दिग्दर्शन केले आहे. रत्नाकर मतकरींच्या 'बालनाट्य' संस्थेतील दिलीप प्रभावळकर, वसंत सोमण, अजित देशपांडे, मीनल जोशी, प्रतिभा मतकरी इत्यादी गुणी कलावंतांच्या संचात हे नाटक रंगभूमीवर, मॅक्समुल्लर भवन या जर्मन सांस्कृतिक संस्थेच्या सहयोगाने 'सूत्रधार' ही संस्था या नाटकाचे प्रयोग करील.

माक्स फ्रिशच्या मते नाटक हे समाजातील अन्यायांना, शूद्रपणाला, सांस्कृतिक आणि वांशिक भेदभावामुळे होणाऱ्या अल्पसंख्याकांच्या छळाला वाचा फोडण्याचे प्रभावी माध्यम आहे. नव्हे, अशा तऱ्हेचा सामाजिक आशय व्यक्त करणे हाच रंगभूमीचा हेतू आहे. कलेचा हेतुनिरपेक्ष आविष्कार त्याच्या मते नाट्यकलेचा हेतू होऊ शकत नाही.

'आंडोरा' या नाटकातून माक्स फ्रिशची ही विचारसरणी प्रभावीपणे व्यक्त होते. 'आंडोरा' या काल्पनिक पण प्रातिनिधिक देशात घडलेली 'ज्यू'च्या छळाची आणि नाशाची कथा यात सांगितली आहे.एक साधा-सुधा ज्यू तरुण, सर्वसामान्य माणसासारखे आयुष्य जगण्याची धडपड करीत आहे. पण त्याची साधी स्वप्ने, साध्या आकांक्षा, हीदेखील त्याच्याभोवतीच्या, त्याचा ज्यू म्हणून द्वेष करणाऱ्या माणसांमुळे पूर्ण होऊ शकत नाहीत. त्याला वेगळा आणि पर्यायाने हीन, नालायक ठरविण्यासाठी सारे त्याच्या अंगी काल्पनिक दोष चिकटवितात. त्याच्याविरुद्ध लोकमत तयार करतात आणि अखेर शेजारच्या देशांतून काळ्या लोकांचा हल्ला आल्यावर आपली सुटका करून घेण्यासाठीच त्याचा बळी देऊन मोकळे होतात. कथानकामध्ये मधूनमधून त्यामधील अपराधी व्यक्तींची निवेदने, कोर्टातील जबान्यांप्रमाणे दाखवून फ्रिशने समाजातील अन्यायकारक घटनांवर भाष्यच केले आहे. ईस्ट जर्मन नाटककार बर्थोल्ड ब्रेश्ट याच्याशी याबाबतीत माक्स फ्रिश हा साम्य दाखवितो.

यातील सामाजिक आशयामुळे हे नाटक फक्त एका ज्यूच्या छळाचे राहात नसून स्थलकालातीत होते. जिथे जिथे म्हणून आंधळ्या स्वार्थासाठी, सुरक्षिततेसाठी, स्वतः-मधील अपराधीपणाची भावना झाकण्यासाठी, समाजातील प्रतिष्ठितांकडून, बहुसंख्यांकाकडून त्यांच्या तथाकथित आदर्शांच्या विरुद्ध जाणाऱ्या अल्पसंख्यांकांचा छळ होतो, तिथे तिथे 'आंडोरा' आहे. असे हे, समाजाच्या तथाकथित आदर्शांना, नियमांना तोकडे पडणारे कुणीही असू शकतात. नीग्रो असू शकतात. ज्यू असू शकतात, मागासलेले आदिवासी असू शकतात, दलित असू शकतात. कर्मठ समाजात समाजसुधारणेचा प्रयत्न करणारे मूठभर उदारमतवादी असू शकतात किंवा जुलूमी राज्यकर्त्यांचा निषेध करणारे देशप्रेमीही असू शकतात. या साऱ्यांची, हातात सत्ता असणाऱ्यांकडून पारध होते. प्रत्येक समाजाचा त्याने ठरविलेला एक 'ज्यू' बळी असतो. सततच्या छळाने अखेर त्याला स्वतःलाही स्वतःचे 'मी'पण पारखे होते. हेच फ्रिशला या नाटकातून सांगायचे आहे. ज्यू तरुण, त्याचा मानलेला शिक्षक बाप, त्याची प्रेयसी आणि त्याची पदोपदी हेटाळणी करून अखेर त्याचा मृत्यू घडवून आणणारा सैनिक ही चार प्रमुख पात्रे व प्रातिनिधिक स्वरूपाची (सुतार, डॉक्टर, पाद्री, बारमन, आई वगैरे) इतर दहा-बारा पात्रे यांच्या परस्परसंबंधांतून त्याने हे प्रभावीपणे सांगितले आहे.

रत्नाकर मतकरी यांनी हे नाटक मराठीत आणताना ते जाणीवपूर्वक ते भाषांतराच्या स्वरूपात ठेवले आहे. कारण मूलभूत मानवीमूल्यांना हात घालणारी ही प्रातिनिधिक कथा तिच्या परदेशी स्वरूपात जरी आपल्या (किंवा कुठल्याही) प्रेक्षकवर्गासमोर मांडली तरी ती त्यांच्या समाजातील 'ज्यू'चा विचार करायला लावील आणि माक्स फ्रिशचे नाटक हे प्रेक्षकांच्या भावना हेलावणारे असण्यापेक्षाही अधिक करून त्यांचे विचार जागविणारे आहे. यासाठी ते जशाच्यातशा स्वरूपात मराठीत आणले आहे.

या नाटकाचे दिग्दर्शक डॉ. नॉर्बर्ट मायर हे जर्मनीतील प्रमुख नाट्य-अभ्यासकांपैकी आहेत. म्युनिच येथे चिल्ड्रेन अँड यूथ थिएटर याचे ते चार वर्षे संचालक होते. १९७० पासून ते म्युनिच, वेस्ट बर्लिन आणि व्हिएन्ना येथील युनिव्हर्सिट्यांमधून व्याख्याने देत आहेत. परदेशांमधूनही त्यांनी अनेक शिबिरे, व्याख्याने, परभाषांमधून नाट्यप्रयोग यांचे आयोजन व संचलन केले आहे.

'सूत्रधार' ही संस्था रत्नाकर मतकरींच्याच 'बालनाट्य' या गेली तेरा वर्षे रंगभूमीवर नवनवीन प्रयोग करीत असलेल्या संस्थेमधून निर्माण झालेली आहे. रत्नाकर मतकरींच्या मार्गदर्शनाखाली, या संस्थेने आजवर मुलांच्या नाटकांव्यतिरिक्त 'प्रेमकहाणी', 'आरण्यक', 'चुटकीचं नाटक' आदि प्रायोगिक नाटके सादर केली आहेत. रत्नाकर मतकरींची लेखनप्रतिभा व सुजाण, कुशल दिग्दर्शन यांचा सुरेख मेळ असल्यामुळे या संस्थेची नाटके दीर्घकाळ स्मरणात राहणारी असतात. 'आंडोरा' (नगरी अंधेरा) या नाटकाने या संस्थेच्या लौकिकात अधिकच भर पडेल अशी खात्री बाळगायला हरकत नाही.

□

चित्र चक्कर

नीलेश कुमार

## शशीचे प्राणशी भांडण ?

शशी कपूर आणि प्राण यांचे भांडण म्हणजे या मायानगरीतला चमत्कारच म्हणायचा. या दोघा महाभागांचे एकमेकांशी काही वाकडे यावे असे प्रसंग एकूण फारच कमी, आणि त्यातून ही दोन्ही नावे फिल्मी दुनियेत भांडण, मारामाऱ्यांसाठी फारशी प्रसिद्ध नाहीत. पण तरी हे नवल वर्तले. दोघेही चक्क भांडले. शशी तर इतका रागावला की, प्राणबरोबर यानंतर भूमिकाच करणार नाही, अशी चक्क प्रतिज्ञा करून बसला. आता बोला.

खरं तर शशी या मायानगरीत टिकून राहिलाय तो त्याच्या अभिनयापेक्षा, चांगल्या, नम्र वागणुकीमुळे. त्याच्या भूमिकांबद्दल कोणाची काहीही मते असोत, त्याच्या लयभऱ्या नाचण्यांबद्दल कोणी त्याचे कौतुक करो वा चॉकलेट हिरो भूमिकांना न्याय देत नाही अशा तक्रारी करो त्याच्या वागणुकीबद्दल कोणाचीच आजवर तक्रार नव्हती. मिळेल ती भूमिका पत्करावी, आपल्या परीने चांगली वठवावी. बस्स्. बाकी इतर कोणाच्या ना आध्यात ना मध्यात. पण असा हा सोज्वळ गडी इतका का रागवला आणि तेही प्राणवर. अजबच आहे

पण हे अजब वर्तले. शंकरदादा फिल्मचे शूटिंग चालू होते प्रसंग लिहून घेणे, बदलणे, स्वतःसाठी खास डायलॉग लिहून घेणे असल्या भानगडीत शशी कधी पडत नाही. दुसरा कोणी तसे उपद्व्याप करीत असला तर, तिकडे फारसे लक्षही देत नाही. पण शंकरदादाचे बाबतीत कहरच झाला. शंकर दादाचा टायटल रोल शशीने करावा हेच मुळात प्राणला खपले नव्हते. म्हणून त्याने डायलॉग बदलून घेतले. त्याने बदल केले ते साधारण असे.

प्राण—तुम कौन हो ?

शशी—मैं हूँ शंकर

प्राण—अगर तूम शंकर हो तो मैं शंकरदादा हूँ.

शशीला हा प्रकार चमत्कारिक वाटला. काही तरी वेगळेच घडले असे वाटले. पण प्रथम त्याने फारसे गंभीरपणे लक्षच दिले नाही. पण मग जसजसा पिक्चरचा क्लायमॅक्स जवळ आला तसा सारा प्रकार त्याच्या लक्षात आला. क्लायमॅक्सचे सारे खोचक डायलॉग तर प्राणने आपल्याकडे घेतले होतेच, पण सारा क्लायमॅक्स आपल्यावरच केंद्रित होईल अशी अदलाबदल त्याने करून घेतली होती. यात डबल रोल करणाऱ्या शशीला मात्र छान फांदी मारण्यात आली होती.

खवळलेल्या शशीने चौकशी केली तर, हे सारे बदल प्राणच्या सांगण्यावरूनच झाल्याचे त्याला कळले. धर्मामध्ये की रोल करून प्राणने धर्माचे यश खेचून आणले असल्याने बिचारा प्रोड्यूसर त्याचेच पायी लोटांगण घालता झाला. चित्र प्राणवर केंद्रित केले तर अपूर्व यश मिळेल असे त्यालाही अचानक वाटू लागले. आणि मूळचे स्क्रिप्ट बाजूला राहून नवेच लिहले जाऊ लागले. झाले. शशी प्राणची चांगलीच जुंपली. भांडण विकोपाला गेले. शेवटी काय शशीचे प्राणबरोबर काम बंद.

शशीचे प्राणशी असे वितुष्ट येत असताना तिकडे आणखी एक भानगड झाली. 'चांदीसोना'च्या शूटिंगच्या वेळी प्राण आणि प्रेमनाथची बोलाचाली झाली. दोघेही एकमेकांवर धावून गेले. युनिटवाल्यांना त्यांना आवरता आवरता नाकी दम आला. या संघर्षाचा शेवटही अखेर तोच झाला. प्रेमनाथने प्राणबरोबर भूमिका करायला चक्क नकार दिला आहे. या दोन अचानक उद्भवलेल्या भांडणांनी फिल्म इंडस्ट्रीत प्रचंड खळबळ माजून राहिली आहे. *

## चित्रपट आणि पटकथा

या भांडणावरून आठवण झाली. हिंदी चित्रपटवाल्यांना पिक्चरच्या कथेचे कौतुक एकूण कमीच. हाणामाऱ्या, लव्हसीन, बेडसीन, नायक नायिकेची गाणी, कॅबेरे इतका सगळा मालमसाला असल्यावर मग तोंडी लावायला एक ढोबळ सूत्र म्हणून कथा, एवढीच त्यांच्या लेखी त्याची किंमत. राजा ठाकुरांनी एकदा हिंदी फिल्मचे वर्णन मोठे सुरेख केले होते. सर्वसाधारण १४-१५ रिळांच्या या चित्रात ६ रीळे फाईट कंपोचरसाठी असतात, ६ रीळे गाण्यासाठी राखून ठेवलेली असतात आणि मग उरतील त्या रिळांत कथेचा इतर भाग उरकून टाकायचा की, झाला हिंदी पिक्चर तयार. असले पिक्चर पैशाला पासरी झाले म्हणून तर हिंदीची अशी दयनीय स्थिती झाली आणि म्हणून मग गुलजार, बासूदा, हृषिकेष, बेनेगल आदी नव्या मंडळींची चित्रे जरा वेगळी वाटतात. तशी फारशी ग्रेट वगैरे नसूनही पाहावीशी वाटतात, कौतुकास पात्र ठरतात.

हिंदीवाल्यांचे एक जाऊ दे. मराठीचे काय ? मराठीतही अशीच निम्मी रीळे लावण्यासाठी खर्ची पडतात. उरलेल्यांत गावच्या पाटलाशी होणारा तथाकथित संघर्ष वगैरे. पण हे सगळे बरे म्हणायची माझ्यावर एकदा वेळ आली. प्रसंग होता राजा शिवछत्रपती या चित्राच्या शूटिंगचा. दिग्दर्शक चंद्रवदन. शिवाजीसारखा विषय हाताळायचा, म्हणजे किती ताकदीचा माणूस पाहिजे याचा विचार करा. तर याची पटकथा लिहिली फिल्म इन्स्टिटयूटच्या एका कर्तृत्ववान विद्यार्थ्याने : नाव प्रदीप दीक्षित. हा म्हणजे एक लेखणीचा जबरदस्त माणूस. इन्स्टिटयूटमध्ये फिल्म केली तर, जिनेव्हाला जाऊन आंतरराष्ट्रीय पारितोषिक घेऊन आला. अशी ताकद. त्या वेळी तो मुंबई टी. व्ही. ला एकमेव स्क्रिप्टरायटर होता. तर अशा या माणसाने खूप परिश्रमाने पटकथा लिहिली. आम्ही बऱ्याचजणांनी ती ऐकली, वाचली होती. खरंच 'दॅट वॉज ग्रेट' म्हणून कुतुहलाने शूटिंगला गेलो तर तिथला प्रकार अजबच.

शूटिंगच्या वेळी दिग्दर्शक महाशय प्रसंग ऐकायचे आणि मनाप्रमाणे फेरबदल करून घ्यायचे. शब्दच काय, वाक्येच्यावाक्ये बदलली जायची. प्रसंगाच्या टेम्पोचे पार दिवाळे वाजायचे. पण हा नवोदित कथाकार बिचारा करणार काय ! दुःखितपणे आपल्या कथेचे हे हाल पाहात राह्यचा. पण हा खास प्रकार

अगदी सुरुवातीच्या काळातला. चित्राला फारसा वेग आला नव्हता तेव्हाचा. पण नंतर घडत गेले ते तर अतर्क्यच. प्रसंगाच्या चित्रिकरणापूर्वी दिग्दर्शक, दीक्षितांना तो वाचायला सांगायचे. प्रसंग समजून घेतला की मग, स्क्रिप्ट चक्क बाजूला सारून त्या प्रसंगाची गोळाबेरीज समजाऊन सांगायचे. आणि आपणच आपल्या पदरची वाक्ये कलाकारांना वाटून द्यायचे. एवढे झाले की शूटिंग सुरू. खरोखर ही वार्ता जर शिवाजी-महाराजांना कळती तर, 'नका नका चंद्रवदन-साहेब अशी आमची विटंबना करू नका' असे सांगण्यासाठी प्रत्यक्षच अवतरले असते. असे चित्र आपटले तर, तो पटकथाकार काय रडणार ? ✻

## 'त्यांना धडा शिकवीन'–केटी

केटी मिर्झा हे नाव इंडस्ट्रीत घेतले जाते ते केवळ सेक्स बॉम्ब म्हणूनच. विविध फिल्मी नियतकालिकांत तिची झळकणारी अर्धनग्न चित्रे व चित्रपटांतून तिने आजवर दिलेली उत्तान दृश्ये यांमुळेच तिची अशी इमेज आज तयार झाली आहे. सुरुवातीला तिला या इमेजचे काहीच वाटत नसे. किंबहुना फिल्म-मध्ये चांगला रोल मिळवायचा तर, असे काहीतरी स्फोटक दर्शन आपल्याला घड-वायलाच हवे अशी एक सोयीस्कर समजूत तिने करून घेतली. गल्लाभरू चित्रपटनिर्माते अशा सुंदऱ्यांची वाटच पाहात असतात. त्यांनी तिला सेक्स बॉम्ब म्हणून भरपूर प्रसिद्धी मिळवून दिली. केटीनेदेखील इमाने-इतबारे आपल्याजवळ होते, ते सारे दाखव-ण्याचा प्रयत्न केला, पण त्यामुळेच तिचा विचार इतर कोणत्याच भूमिकांसाठी होईना. इंडस्ट्रीतले लोक चक्क विचारू लागले, 'आता केटीजवळ दाखवण्यासारखे राहिलंय काय ?'

सेक्स बॉम्ब म्हणूनच केवळ आपल्याकडे पाहणाऱ्या या चित्रनिर्मात्यांचा तिला विलक्षण राग आहे. ती स्पष्टच म्हणते की, माझे अभिनयसामर्थ्य दाखवण्याची संधी मला द्यायला निर्माते घाबरतात. त्यांचेही ठीक आहे. हे भलतेच साहस करून त्या चित्राचा येळकोट झाला म्हणजे धंद्यात उभे राहायची पंचाईत यायची. त्यापेक्षा तिच्या शिव्या खाल्लेल्या परवडल्या.

पण केटीही काही कमी नाही. हिंदी फिल्म इंडस्ट्रीत आपली डाळ शिजत नाही हे पाहताच, तिने वेगळीच युक्ती अवलंबिली. तिने चक्क परदेशी धाव घेतली आणि एका रशियन चित्राची नायिका झाली. 'सनराईज ओव्हर द गँगीज' या नुकत्याच पूर्ण झालेल्या रशियन चित्रात ती चक्क पारंपारिक भारतीय स्त्रीच्या रूपात वावरते आहे. आता यात तिची भूमिका कशी झालीय हे कळायला अवकाश आहे, पण रशियनांनी हे धाडस केले एवढे मात्र खरे. म्हणूनच ती विचारते की, 'परदेशी चित्रांची जर मी नायिका बनू शकते, तर भारतात असे का घडू नये.' हा सवाल तर बिनतोड खराच. आता समजा तिला आणखी २१३ रशियन चित्रं मिळाली तर, हिंदीवाल्यांना तिचे हे नवे ग्लॅमरही हवेसे वाटू लागेल हे निश्चित.

रशियन चित्रातील भूमिका आणि हिंदी-वाल्यांना फटकारणाऱ्या मुलाखती यांनी केटी गाजत असतानाच तिच्यासंबंधी आणखी एक स्फोटक बातमी येऊन पोचली आहे. ती बातमी म्हणजे तिच्या विवाहाची. सनराईजमध्ये तिच्याबरोबर काम करणाऱ्या एका नामवंत रशियन नटाशी ती विवाहबद्ध झाली असे कळताच मुंबापुरीत धूम माजली. काही क्षणांत वार्ता सर्वत्र पसरली. केटीने जणू एकावर एक धक्के द्यायचाच निर्णय घेतला होता. ही अफवा तर नव्हे ना, असे वाटून कोर्टाकडे चौकशी केली तर, तिने चक्क अर्धवट होकार दिला. मिस्किल हसत ही बया म्हणते, 'आमची एंगेजमेंट झाली एवढे खरे असले तरी, एवढ्यात लग्न करायचा मात्र आमचा विचार नाही.' आणि यावर पुन्हा त्या रशियन नटाचे–व्हिक्टर सोल्स्की याचे गुणवर्णन.

हिंदीवाल्यांना त्यांच्याच पद्धतीने धडा शिकवीन अशी गर्जना एका खास मुलाखतीत केटीने केली आणि लगोलग या साऱ्या वार्ता धडकल्या. तेव्हा आता रशियन भूमीवरून हिंदीवाल्यांवर केटी शरसंधान करणार असे दिसते. पाहू या. □


✤

या आनंदयात्रेत जे पाहिलं त्याची ओझरती टिपणं म्हणजे हा लेखसंग्रह. रूढ अर्थानं ही प्रवासवर्णनं नाहीत. माणसं, त्यांची गुदमरलेली आणि फुललेली प्रवाही मनं, अखंड पालवणारं ऋतुचक्र आणि वज्रलेप नियती ह्यांच्या नातेसंबंधांची गुंफण माझ्या नजरेत कशी झाली, त्याचा हा विलक्षण घाईगर्दीत उरकलेला आलेख.

**आनंदाच्या दाही दिशा**

रवींद्र पिंगे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

किमत : दहा रुपये